२६५०० श्रीगणपती याचे भाद्रपद मासांतील व श्रीव्यंकटेशाचे अश्विन मासांतील पेस्तर साल सन तिसा मयातैन, शके १७३० विभव नामसंवत्सराचे उत्साहनिमित्त दर उत्साहास दररोज पाचशें असामींचें ब्राह्मणभोजन त्यास, व एकादशीस फराळ करावयाचे त्यांस साहित्य. साखरभात, व दुसरें पक्वान्न पुरणाच्या पोळ्या, अथवा उत्तम पक्वान्न असेल तें, व दहा भाज्या, व दहा कोशिंबिरी, व केळींचीं पानें, व वरकड भोजनाचें साहित्य चांगलें; व कुलपी विडा पिकले दहा पानांचा, विड्यांत सामान दोन लवंगा, व दोन वेलदोडे, व कातगोळ्या दोन, व चुना, व शिरस्तेप्रमाणें सुपारी, व आचारी, व खटपटे, व वाढणारे ब्राह्मण, यांचा बदल मुशाहिरा; व ब्राह्मणांस केशरी गंध, व कस्तुरीची अक्षता, व कुंकवाची रांगोळी, व उदबत्या, व दक्षणा दर असामीस शिवराई पैसा येक, याप्रमाणें यथास्थित मशारनिल्हेनीं करावयाचें कबूल केलें त्यास ब्राह्मण भोजनाचे रोज.

28. The food expenses of 125 persons, who daily took their dinner and supper at the principal palace, including the expenses of feeding 1000 additional men, every month was farmed for Rs. 29000 a year.
A. D. 1807-1808.

29. The food expenses during the Ganapati and Vyankatesh festivals in the month of Bhadrapad and Ashwin, when 500 people were to be served with dinner for 26 days, were farmed for Rs. 16500 (26500) ? The menu was specified.
A. D. 1807-1808.

१४ श्रीगणपतीचे उत्साहनिमित्त ब्राह्मणभोजन दररोज ५०० प्रमाणें.
१२ श्रीव्यंकटेशाचे उत्साहनिमित्त दररोज ब्राह्मण ५०० प्रमाणें.

२६

सवीस रोजा, सदरहु प्रमाणें ब्रिलकूल बेगमीचे रुपये, खाशाकडील थोरले वाड्यांतील पंगतीकडे छ १२ जिलकाद पौष शुद्ध १४ साल मजकूर सन समान मयातैन, शके १७२९ प्रभवनाम संवत्सरें तागाईत छ २३ जिलकाद पौष वद्य १० पेस्तर साल सन तिसा मयातैन शके १७३० विभवनाम संवत्सरें पावेतों, भोजन खर्चा बदल व भोजन दक्षणा, वगैरे बिलकूल बेगमीचे, बदलमुशाहिरा, वगैरे सुद्धां शुक्रवारचे वाड्याप्रमाणें रुपये

२६५०० सवीस हजार पांचशें रुपये प्रांत जुन्नर निसबत मशारनिल्हे याजकडे साल मजकुरचे रसदेचा ऐवज येणें, त्यापैकीं देविले असेत तरी घेणें. मजुरा पडतील म्हणोन वरातेत लिहून देविलें.

रुपये.

५००० मार्गशीर्ष शु॥ १ चे.
५००० पौष शु॥ १ चे.
५००० माघ शु॥ १ चे.
५००० फालगुन शु॥ १ चे.
५००० चैत्र शु॥ १ चे.
१५०० वैशाख शु॥ १ चे.

२६५००.

३०।२१० बदल देणें, खाजगत खर्चाबद्दल, खाशांकडील खाजगीकडे २००००० वीस लक्ष रुपये, कमावीस नजरे बदल विठ्ठलराव नरसिंह यांजकडे. सबबकीं नरसिंह खंडेराव यांचे नांवें जातीस व फौजेचे बेगमीस व किल्ले सरंजामचे गांव सुद्धां निसबतीस व इनाम गांव, व जमीनी चालत आहेत. त्यास ते मृत्यु पावले. पोटीं पुत्र नाहीं याजकरितां नरसिंह खंडेराव यांचे चुलत आजे त्रिंबकराव शिवदेव यांचे पणतु तुम्हीं, सबब नरसिंह खंडेराव यांस तुह्मांस दत्त पुत्र देऊन तुमचे नांवें पेशजीप्रमाणें जातीस व फौजेचे बेगमीस सरंजाम व किल्ले सरंजामाचे गांव सुद्धां निसबतीस व इनाम गांव, व जमीनी, करार करून देऊन तुह्मांस सरदारीचीं वस्त्रें व बहुमान दिल्हा त्यासंबंधें सरकारचे नजरेचा ऐवज सालगुदस्तां सनसबा मयातैनांत घ्यावयाचा करार केला त्यापैकीं देविले.

इ० स० १८०७–०८ समान मया तैन व अलफ. मोहरम २५.

रुपये.

30. There is a debit of 20 lacs of rupees for the private expenses of the Peshwa. The amount was received from Vithal Narsinh, as Nazar for sanction to his adoption as son of Narsinh Khanderao, and to his succeeding to his father's estate.

A. D. 1807-1808.

तुम्हांस दत्त पुत्र घेण्याबद्दल नरसिंह खंडेराव यांणीं सरकारांत वीस लक्ष येक रुपया नजर बाळाजी लक्ष्मण यांचे विद्यमानें द्यावयाचे करार केले, ते वीस लक्ष रुपये तुम्ही बाळाजी लक्ष्मण याचे गुजारतीनें सरकारांत भरले, ते हुजुरचे खासगीकडे पावले असेत. म्हणोन विठ्ठलराव नरसिंह यांचे नांवें खासगीकडून जाब दिला आहे.

इ० स० १८०७–०८ समान मयातैन व अलफ. मोहरम २९.

३१।२११ बदल देणें. खासगत खर्चाबद्दल, खाशाकडील खासगीकडे रसानगी १७९७६९ रुपये.

इ० स० १८०८–०९ तिसा मयातैन व अलफ. जिलकाद ११

३२।२१७बदल देणें, विद्यमान जीवनराव पंडित सुमंत यांजकडे रसानगी यादी. रुपये.

३८९३९ इमारती खर्च. वाडा शुक्रवार शहर पुणें याचे लगत उत्तरेच्या आंगें पूर्वेस नाची दिवाणखाना चापेखण सुद्धां तेरा खणीं उत्तर दक्षण लांबी तेहतीस गज व रुंदी आठ गज; व पूर्वेच्या आंगचे नाची दिवाणखान्याचे बोलीनें उत्तराभिमुख दुघई, पूर्व पश्चम करावयाची त्याचे चापेखण चार. या प्रमाणें इमारत येक मजला पूर्वेकडील लांबी दक्षण उत्तर गज ४१ येकेचाळीस व रुंदी पूर्वपश्चम इमारत मांडण गज ८ आठ, येणें प्रमाणें इमारतीचें कामाचा खर्चाचा बिलकूल मक्ता जीवनराव पंडित सुमंत यांणीं करार केला त्या प्रमाणें. रुपये.

३२६५० पूर्वेकडलि नाची दिवाणखाना खांब, लगा, व तातरे, गलथा, व तुळया, पाटणीस सोट व तक्ते घालून, लांबी दक्षण उतर गज ३३ तेहतीस, मधील खण ११ अकरा, दरखणीं लांबी गज २। सवा दोनप्रमाणें, येकूण गज २४।।।., पावणे पंचवीस. चापेखण २ दोन दक्षण उत्तर दर चोपखण गज ४८३ प्रमाणें गज ८। सवा आठ येकूण लांबी गज तेहतीस, चापेखण सुद्धां खण १३ तेरा, पूर्वेचे रस्त्याचे आंगें वाड्यास जोतें माठीव आहे त्या मासल्याचें व कोरेंचें काम, पश्चमेचे आंगें जोतें दोन गळथे व पेटी सुद्धां उंची गज .॥. आर्धा व पाठथऱ्या व खुर्च्या पूर्वेच्या रस्त्याचे आंगें जोत्यावरील सुद्धां नामी, वाड्याचे दक्षणेस पूर्वाभिमूख सोप्यास जोतें व खुरच्या आहेत त्या मासल्याप्रमाणें, व शिंदी व अस्तर गाऱ्या व गिलावे व गच्या मुंढेऱ्या, व छज्ये सुद्धां मक्ता.

६२८९ उत्तराभिमुख दुघई लांबी पूर्वपश्चम, पैकीं पश्चमेकडील भिंतीचा असार जिने वगैरे करावे लागतात, सबब गज १॥ खेरीजकरून गर्भी जागा अजमासें लांबी कमकसर गज २८॥। पावणें येकू-

A. D. 1807-1808. 31. Rs. 179769 are debited in the name of the Peshwa, on account of his private expenses.

A. D. 1808-1809. 32. A hall and room to the North side of the Shukrawar palace was built at a cost of Rs. 40000. The work was executed by Jivanrao Pandit, Sumant, by contract.

णतीस. पूर्वेचे आंगें चापेखण २ प्रमाणें दर दालनास येकूण खण चार, दर चापेखण गज चार प्रमाणें चतुरस्त्र व गर्भीचे खण ७ सात दर खण गज कमकसर २।३॥ सवा दोन गज साडेतीन तसुप्रमाणें गज १६|||. पावणेसतरा; पश्चमेकडील चापेखण दर दालन चतुरस्त्र गज ४ चार प्रमाणें जोतें व खुरच्या कोरेच्या वगैरे कुलकाम सुद्धां मक्ता. २८१२९ रुपये.

पैकीं पूर्वेचे आंगें नाची दिवाणखान्याची रुंदी गज ८ आठ याचे वेलेंचे लगतीस काम दुघईपैकीं चापेखण दर दालानास २ प्रमाणें, दर चापेखण गज ४ चार चतुरस्त्रप्रमाणें चापेखण ४ दुघईस येकूण चतुरस्त्र गज ८ आठ कोरेच्या जोत्याखेरीज कुलकाम. सदरहू कामाचे आकारपैकीं आकार हिशेबानें करून मक्ता रुपये.

३८९३९

येकूण अडतीस हजार नऊशें येकूणचाळीस रुपये. सदरीं काम लिहिल्याप्रमाणें मक्ता गौंडीकाम पाये, टाकीचे खडकापर्यंत खांदून नामी भरून व गर्भीं पुरवणी मातीचे गाऱ्यांत गडगल आटकी चवाळीनें भरून वर येक थर चुन्यांत त्यावर मुरुम घालून, व सिंदी अथवा पडद्या यांस गिलावे, अस्तरगाऱ्या, व गच्ची, व मुंढेरी व छज्या, खंगर विटाचे थर देऊन वर नामी चुन्याची गच्ची मजबूद, व दगडी संगत राशी काम माठीव, पूर्वेचे आंगें जोते गज ४१ येकेचाळीस, सरकार वाड्यास रस्त्याचे आंगें आहे त्या मासल्याप्रमाणें, व कोरेचें काम सरकार वाड्याचे दक्षणेस पूर्वाभीमूख सोप्यास जोतें, व खुरच्या, व पाटथरा आहे त्या मासल्याप्रमाणें, दिवाणखाना नाची यास जोतें उंची गज ·||· आर्धा, दोहीं आंगें गलथा, मध्यें पेटी याप्रमाणें व पाटथरा व खुरच्या पूर्वेचे रस्त्याचें आंगचें माठीव जोतें नवीन सुद्धां; व सुतारकाम, लांकूड सागवानी सालगुदस्ताचे तोडीचें वाळलेलें, बीन दरज बीन कोप गांठाळ खेरीज करून नामी मजबूद सरकारवाडा लगत याचे खालील मजल्याचे तसुवादी प्रमाणें लाऊन. सदरहू काम करावयाच्या मुदती. इमारत पाटणी पर्यंत इस्तकबील पौष शु॥ १३ शके १७३० विभवनाम संवत्सरें ते अधीक आषाढ शु॥ १३ शके १७३१ शुक्लनाम संवत्सरे पर्यंत कुल करावी; व गच्ची मुंढेरी व छज्या इस्तकबील, आषाढ शु॥ १३ तागाईत श्रावण शु॥ १३ पर्यंत करावें. याचे लागवड व मजुरीचे वगैरे खर्चास मक्ता रुपये.

१०६१ तसलमात पंडित मशारनिल्हे याजकडे जाजती सदरील काम खेरीज रुपये.

४००००

चाळीस हजार रुपये परगणें, जंबूसर प्रांत गुजराथ निसबत त्रिंबकजी डेंगळे याजकडे साल मजकुरचे रसदेचा व पोतें चालीचे बस्याबाबत ऐवज येणें त्यापैकीं देविले. रुपयें.

३३।२१९ बदल देणें. मुदबखखर्च, वाडा शुक्रवार व वाडा विश्रामबाग शहर पुणें येथील व स्वारींतील स्नानाचें पाणी तापवावयास लांकडें जळाऊं, व पाणके ब्राह्मण व कामाठी यांस तैनात भाडें खेरीज करून, इस्तकबील पौष शुद्ध द्वादशी छ ११ जिलकाद साल मजकूर सन तिसा मयातैन, तागाईत मार्गशीर्ष अखेर छ २८ जिलकाद पेस्तरसाल सन आशर मयातैन, पावेतों अधिक आषाढ मास सुद्धां बारा महिने आठरा रोजांचे बेगमीचा मक्ता गंगाधर बाळकृष्ण मराठे यांनीं कबूल केला त्याप्रमाणें मराठे यांजकडे रसानगी यादी छ २६ जिलकाद. १३०० रुपये.

इ० स० १८०८–०९
तिसा मया तैन व अलफ.
रबिलाखर २०.

एक हजार तीनशें रुपये इजाफत जमा, खाशांकडील खासगीपैकीं जमा धरून देविलें रुपये.
गुजारत त्रिंबकजी डेंगळे.

३४।२२३ जनार्दन नारायण कारकून शिलेदार यास सरकारांतून ताळुके व महाला निहाय येथें नवऱ्या पहावयास पाठविले आहेत त्यांस डोल्या व घोडीं व शिपाई वगैरे सरंजाम मशारनिल्हे तुम्हांस सांगतील त्याप्रमाणें देऊन व यांचें पत्र घेऊन पुणीयास पोहचाऊन देणें.
म्हणोन कमाविसदार ताळुके व माहालानिहाय यांचे नांवें. सनद. १.
रसानगी.

इ० स० १८०९–१०
आशर मयातैन व अलफ.
सवाल १२.

३५।२३० बदल देणें, पुत्रोत्साह खर्च राजश्री बाबासाहेब यांस आश्विन वद्य पंचमी सौम्यवार छ १७ रमजानीं पुत्र जाहला. सबब पुत्रोत्सहनिमित्त ते दिवशींच रात्रौ पुण्यांत मुहूर्तानें येकूणतीस ब्राह्मणांस व दोन सुवासिनी बायकांस शिधा दिल्हा. दुसरे दिवशीं आश्विन वद्य शष्ठी गुरुवार छ १८ रमजानापासून मौजे पर्वती तर्फ हवेली प्रांत पुणें येथील रमण्यांत ब्राह्मणांस व ब्राह्मणांच्या बायका व मुलें यांस शिधा कार्तिक शुद्ध प्रतिपदा इंदुवार छ २९ मिनह्र पावेतों बारारोज दिल्हा. व कार्तिक शुद्ध सप्तमी मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव नाम ठेविलें. ते दिवशीं येक रोज शिधा व दक्षणा रमण्यांत दिल्ही. व जोशी, आश्रित वगैरे ब्राह्मणांस वस्त्रें दिल्ही. त्यांची किंमत व शूद्राच्या वगैरे सुवासिनी बायका यांणीं सरकारचे शुक्रवारचे वाडयापुढें पाण्याचे हेल घातले त्यांस शिधा व साखर, चोळखण वगैरे येक

इ. स. १८१०–११
इहिदे अशरमयातैन व अलफ,
सफर १७

---

33. A contract of supplying wood for heatingwater for bathing purposes, in the Shukrawar and Vishrambag palace and in camp, (including the labourers for heating water &c.) was given for Rs. 1300 a year.
A. D. 1808-1809.

34. Janardan Narayen was sent into the country to choose brides. The officers of the various mahals were directed to supply him with any palanquins, horses, or guards that might be required for getting the brides and their relations to Poona.
A, D. 1809-1810.

35. A son was born to the Peshwa on 17th Ramjan. He was named Wamanrao. The expenditure in honour of his birth came to Rs. 178641.
A. D. 1810-11.

रोजा पर्वतीस रमण्यांत, व कांहीं बायकांस चोळखण मात्र पुण्यास दिल्हे, व शहर पुणें व मौजे पर्वती व मौजे भांबवडे येथें घरोघर साखर घाटली. व कारकून व हरकामीं ब्राह्मण पर्वतीस रमण्यांत शिधा वाटावयास व शिध्याचे व दक्षणेचे फेरबंदीस पांचा दरवाजांस व रमण्यांतून होते त्यांस खर्चाबदल व रमण्यांतील शिध्याचे प्रारंभीं व रमण्यांतून ब्राह्मण व हेलकरणी बाहेर निघतेसमयीं चौदा रोजा तोफांचे बार पर्वतीस केले त्यांस मिळोन खर्च जाहला. तो गुजारत चिंतो वामन सिधये कारकून निसबत दप्तर. रसानगी यादी. रुपये.

शिधा येकूण.

रुपये.

आश्विन वद्य पंचमी सौम्यवार छ १७ रमजानीं पुत्र जाहला ते दिवशीं रात्रौ पुण्यांत मुहूर्तानें व आश्विन वद्य षष्टि गुरवार छ १८ रमजानापासून कार्तिक शुद्ध प्रतिपदा छ २९ मिनहू पावेतों बारारोजा मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा दिल्हा. त्या शिध्यास येकंदर

असामी.

२८६४५७ ब्राह्मण.
८०२९६ बायका व मुलें.
३६६७५३

यांसी शिधा दररोज असामीस द्यावयाची नेमणूक बितपसील.

१ वजनी, वजन. पक्के

- ००॥. तांदूळ आंबेमोहोर साडिक.
- ०००९ दाळ तुरी.
- ००।९ गहूं.
- ००१

१ जिनसांचे ऐवजी खुर्दा टके.

- ०६ तूप.
- ०६ साखर.
- ०३ मीठ व पत्रावळ.
- ०३ हिंग, जिरे, मिरे, वगैरे.
- ०३ भाजी व आंबसुल मिळोन.
- ०३ लांकडे जाळाऊं.
- -॥-

१ सुवासिनी बायकांस कुंकु सुगंध तेल घाळून लावावयाचें.

१ विडा दर असामीस सुमार १ यासी साहित्य.

- १ पानें विड्याचीं हिरवीं चुनपटी सुद्धां ७.
- १ सुपारी फोडीव.
- १ लवंग.

१ वेलदोडा.
१ कातगोळ्या २ येकूण.
१ चुना चुनपटींत.

६

१ दक्षणा खुर्दा. टके ३.
१ गंध, केशरी ब्राह्मणांस साखळीनें लावावयाचें.
१ कस्तुरींची अक्षता लावावयाची.

खर्चाबरहुकूम रुपये.
४२५११।- गल्ला चौशेरी बारुलें मापें केली खंडी. येकूण रुपये.
५९९८८८≡। खुर्दा, दर असामीस तपसील सदरीं लिहिला आहे त्याप्रमाणें टके ·॥३ प्रमाणें आकार २०६२९८॥३ टके पैकीं वजा खुर्दा वाटतेसमयीं वहिवाटीमुळें कमी खर्च जाहला ते ८०॥६ टके.
बाकी खर्च. २०६२१७॥९ टके.
येकूण रुपये.
४३३।- गंधाकडे खरेदी सामान येकूण रुपये.
८॥- सुवासिनी बायकांस कुंकु सुवासिनी बायकांकडून लावविलें त्याची किंमत. रुपये.
१६२३ विड्यांकडे विडे सुमार.

१०४३३४।≈ (वरील रकमांत चूक आहे.)

शूद्राच्या वगैरे सुवासिनी बायका यांणीं सरकारचे शुक्रवारचे वाड्यापुढें पाण्याचे हेल बारा रोज घातले त्यांस कार्तिक शुद्ध द्वितीया भौमवार छ १ सवालीं मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा दिल्हा ते बायका व मुलें. असामी.

२४९१० बायका.
३०६२ मुलें.

२७९७२

यांसी शिधा दर असामीस द्यावयाची नेमणूक. बितपसील.

१ वजनी. वजन. पक्के.
तांदूळ, डाळ तुरी, गहूं, साखर, मीठ, वगैरे. येकंदर ८८१८६॥.
१ हळदकुंकु. टके ८३
१ तुपाचे ऐवजीं खुर्दा.
१ विडा दर असामीस सुमारे १

खर्चाबरहुकूम. रुपये.

३२१४॥ गल्ला चौशेरी बारुलें मापें कैली खंडी. येकूण रुपये.

६२२॥।॰ साखर दर असामीस वजन. पक्कें ८८८४॥.

२०॥॰॥ सुवासिनी बायकांस हळदकुंकू दिल्हें.
त्याची किंमत. रुपये.

४९१॥।॰ खुर्दा तुपाचे ऐवजीं दर असामीस टके ८३.

९२॥।॥ विडयाकडे. विडे. सुमारें २७९७२.

४४४२॥

कार्तिक शुद्ध सप्तमी मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव मांव ठेविलें त्या निमित्त ब्राम्हणांस व ब्राम्हणांच्या बायका व मुलें यांस मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा दिला ते असामी.

३०११८ ब्राह्मण.
६८६८ बायका.
३६९८६

यांसी शिधा दर असामीस द्यावयाची नेमणूक. बितपशील.

१ वजनी. वजन. पक्कें.
तांदूळ, दाळ तुरी, गहूं, वगैरे येकंदर ८८१.

१ जिनसांचे ऐवजी खुर्दा टके.
तूप, साखर, भाजी वगैरे ॰॥॰

१ भोदनदक्षणा खुर्दा. टके. ८३.

१ विडा दर असामीस. सुमारें १.

१ गंध केशरी साखळीनें लावावयाचें.

१ कस्तुरीची अक्षता लावावयाची.

१ सुवासिनी बायकांस कुंकु सुगंध तेल घाल्लून लावावयाचें.

खर्च बरहुकूम रुपये.

४१८४।॰ गल्ला चौशरीं बारुलें मापें कैली खंडी येकूण रुपये.

३८ गंधाकडे खरेदी सामान केलें, तें ब्राह्मण असामी. किंमत रुपये.

१८≡ कुंकु सुवासिनी बायकांस सुवासिनी बायकांकडून लावविलें त्याची किंमत. रुपये.

५९०१॥॰ खुर्दा दर असामीस तपसील सदरीं लिहिला आहे त्याप्रमाणें टके ॰॥३.

१३७।॰ विड्याकडे.

१०२६२।=

१०४३३४।= बारारोजा शिधा दिल्हा त्याची किंमत. रुपये.
४४४२॥ हेलकरणी बायकांस येक रोजा शिधा दिल्हा त्याची किंमत. रुपये.
१०२६२।= नामकरणानिमित्य येक रोजा शिधा दिल्हा त्याची किंमत.

११९०३९।.

कापड येकूण. रुपये.

कार्तिक शुद्ध ७ मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव नांव ठेविलें ते समयीं उपाध्ये व शास्त्री व पंडित व वैदिक व जोशी यांस बहुमानांचीं वस्त्रें पेशजीचे दाखल्याअन्वयें दिल्हीं त्यांची किंमत. रुपये. १४१५८=

पैकीं वजा मखलासी समयीं सूट घातली ते रुपये ८= बाकी रुपये. १४१५

शूद्राच्या वगैरे सुवासिनी बायका यांणीं सरकारचे शुक्रवारचे वाड्यापुढें पाण्याचे हेल घातले त्यांस चोळखण दिल्हे ३०७३९ असामी.

कार्तिक शुद्ध सप्तमी मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव नांव ठेविलें त्यानिमित्त ब्राह्मणांस, ब्राह्मणांच्या बायकांस व मुलें यांस मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा देऊन दक्षणा दिल्ही ते. ३६९८६ असामी.

येकूण दर असामीस रुपया एक प्रमाणें. ३६९८६ रुपये.

बदल मुशाहिरा. रुपये.

बारा रोजा शिधा दिल्हा सबब कामकाजास माणसें ठेविलीं त्यांस. रुपये.

३७८= कामाठी, रमण्यांत पांचा दरवाज्यांवर शिध्याच्या जिनसांचे दास्तानाकडे नेहमीं कामकाजास व रमण्यांतील चौसोपींत दररोज झाडलोट व सारवण करावयास ठेविले त्यांस चाकरी बरहुकूम दिल्हे. रुपये.

३२॥।- कोठवळे, पांचा दरवाजांत शिध्यांचे जिनसांचे मापास ठेविले ते आसामी येकूण. रुपये.

२६। ब्राह्मण रोजकरी, केशरी गंध, व कस्तुरीची अक्षता उगाळावयास ठेविले आसामी १० इस्तकबिल छ १८ रमजान तागाईत छ २९ मिनहू रोज ८१२ पैकीं वजा छ १८ रोजीं प्रथम दिवशीं कुंकुवाचें गंध लाविलें रोज ८१, बाकी रोज ८११ येकूण. रुपये.

२॥ सुतार, रमण्यांत पांचा दरवाज्यांवरील सोप्यांचे दागदोजीचें कामकाजास ठेविले.

२ गवंडचे, रमण्यांत पांचा दरवाज्यांवरील व चौसोपींतील दागदोजी करावयास ठेविले.

१७॥=॥ रोशनाईचे कारखान्याकडे हिलाल धरावयास.

१९ लोक, माजी सातारकर रमण्यांत पांचा दरवाज्यावर, व पुण्यांत जिनसांचे दास्तानाचे रखवालीस ठेविले त्यांस.

१७।≡॥ तैवज खर्चाकडे.

५ कामाठिणी व मराठ्या बायका गव्हांत व डाळींत गदळ होतें तें पाखडून नीट केलें त्यांस मजूरी.

१५९॥।=

नामकरणानिमित्य शिधा दिल्हा. सबब कामकाजास माणसें ठेविलीं त्यांस. रुपये.

२।- कामाठी, पांचा दरवाज्यांवर झाडलोट व सारवण करावयास व दास्तानाकडे कामकाजास येक रोजा ठेविले आसामी १४.

२ कोठवळे, पांचा दरवाज्यांत दास्तानाकडे गल्लयाचे कामास ठेविले येक रोजा आसामी १०.

२॥ ब्राह्मण, केशरी गंध लावावयास ठेविले.

१८- विड्याकडे.

२। रोशनाईकडे.

१०८=

हेलकरणी बायकांस शिधा.

५। कामाठी असामी येकूण. रुपये.

२ कोठवळे, गल्लयाचे मापास पांचा दरवाजांवर रमण्यांत येक रोज ठेविले असामी १०.

७।

कारकून व हरकामी ब्राह्मण पर्वतीस रमण्यांत शिधा वाटावयास व शिध्याचे व दक्षणेचे जवळचे फेरबंदीस पांचा दरवाज्यांस वगैरे कामकाजास, चौदा दिवस मेहमीं होते. त्यांस खर्चाबदल असामी येकूण. २००० रुपये.

तेरीज बदल मुशाहिऱ्याचे. रुपये.

१५९॥।= बारा रोजा शिधा दिल्हा सबब.

१०८= नामकरणानिमित्त शिधा येक रोजा दिल्हा सबब.

७। हेलकरणी बायकांस शिधा येक रोजा दिल्हा सबब.

२००० कारकून व हरकामीं ब्राम्हण यांस खर्चाबदल दिल्हे ते. रुपये.

२१७७।

खेरीज मुशाहिरा. रुपये.

बारा रोजा शिधा दिल्हा त्याबदल रुपये.

७३ खरेदी छपरें.

२६ खरेदी वासे, रमण्यांतील चौसोपींचीं छपरें वाऱ्यानें कांहीं तोललीं, व कांहीं मोडोन जमीनीवर पडलीं, त्यांची दागदोजी करून तींच छपरें वरतीं चढविलीं. त्या खालील वासे, व गज्याचे लफ्याचे वासे, मोडोन जाया जाहले सबब नवीन वासे खरेदी केले.

२॥ सोप्यांतील दरवाज्यावरील सोप्याचे दागदोजीकडे खरेदी जिन्नस येकूण.

२०० मजुरीखर्च, बढई यांजकडून रमण्यांत दरवाज्याचे वगैरे मेढे, व सोप्यांचीं छपरें घालावयाचे साट बांधिवले व आंतील चौसोपींतील छपरें नीट करविलीं त्यां बाबत उक्ते दिल्हे.

रुपये.

१०॥-।. बाजे खर्च.

४३॥=॥। पोटखर्च. रुपये.

४९॥= बटाखर्च, खरेदी पावल्या सुमारें १५८६५.

३ नवस खर्च, शिध्याचा समारंभ सिद्धीस यथास्थित जावा ह्मणोन श्रीदेवास पेढे वाटावयाचा नवस केला होता. रुपये.

३१८= दप्तरखर्च. रुपये.

२३७॥= रोशनाई खर्च. रुपये.

७८१। हमाली, शिध्याचे जिन्नस वगैरे पुण्याहून रमण्यांत हमाल यांजकडून नेवविले त्यांस देणें हमाल. रुपये

४३॥ भाडे खर्च. रुपये.

४१४।= नुकसानखर्च. रुपये.

१४८= ब्राह्मणांचे शिध्याचे प्रारंभीं व ब्राह्मण सोडावयाचे समयीं पर्वतीस तोफा सोडिल्या ते बार सुमारें.

१९२७॥

नामकरणानिमित्त येक रोजा शिधा दिल्हा त्याबद्दल. रुपये.

२४॥= रोशनाई खर्च. रुपये.

२॥= पोटखर्च. रुपये.

८॥ दप्तर खर्च.

१ खरेदी सुतळी, ठिक्यांचीं तोंडें शिवावयास व किरकोळ दागदोजीस वगैरे वजन पक्के एकूण ८८२॥. रुपये.

६। भाडेंखर्च. रुपये.

-।- बटाखर्च.

९० मजुरीखर्च. रुपये.

१३३।=

ह्ळकरणी बायकांस येक रोजा शिधा दिल्हा त्याबदल रुपये.

५८ रोशनाईखर्च. रुपये.

९ दप्तरखर्च. रुपये.

८१ हमालीखर्च. रुपये.

१ खरेदी सुतळी, ठिक्यांचीं तोंडें शिवावयास व किरकोळ. दागदोजीस वगैरे

१।- खरेदी दोरा वळीव, चोळखणांचे भोत शिवावयास.

।= भाडेंखर्च. रुपये.

८८५।= नुकसानखर्च.

१०१६८=

तेरीज खेरीज मुशाहिन्याचें. रुपये.

१९२७॥ बारा रोजा शिधा दिल्हा त्याबदल. रुपये.

१३३।= नामकरणानिमित्त येक रोजा शिधा दिल्हा त्याबदल. रुपये.

१०३६८= हेलकरणी बायकांस येक रोजा शिधा दिल्हा त्याबदल. रुपये.

३०९७

शहर पुण्यांत, पर्वतीस, व भांबवड्यास, देवास व समस्त लोकांचे घरोघर साकर वाटली त्यास. रुपये.

६२५९। साखर धुवा वजन पक्के खंडी १५॥२॥।८॥

२५॥ खारवे साखर ठेवावयास गोण्या केल्या त्या सुमारे १२ दर २८= प्रमाणें.

३६॥≡ हमाली साकर वाण्याचे दुकानांतून हलवाई याचे दुकानीं धुवावयास आणिली.

६३२१।≡

तेरीज खर्चाचें. रुपये.

११९०३९। शिधा दिल्हा त्याची किंमत. रुपये.

११०२०८- कापड दिल्हें त्याची किंमत. रुपये.

३६९८६ दक्षणा ब्राह्मणांस नामकरणानिमित्त दिल्ही ते. रुपये.

२१७७। बदल मुशाहिरा.

३०९७ खेरीज मुशाहिरा. रुपये.

६३२१।≡ साखर वाटली त्याबद्दल.

१७८६४१

येकलक्ष अठ्याहत्तर हजार सहाशें येकेचाळीस रुपये, जकात प्रांत कल्याण भिवंडी निसबत बाळकृष्ण आबाजी याजकडे सालमजकूरचे रसदेचा पोते चालीच्या बव्यासुद्धां ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला, त्यांपैकीं व खाशांकडील अंतस्था बाबत, साल गुदस्ताप्रमाणें सालमजकूरचे येणें ते.

७१६४१ रसदेपैकीं रुपये.

१०७००० खाशांकडील अंतस्थाबाबत.

१७८६४१

३६।२४१ बदल देणें. उत्तरकार्य खर्च, मातुश्री येश्वदाबाई यांस बरें वाटत नव्हतें. त्यांस पौष वद्य पंचमी इंदुवासर शके १७३२ प्रमोद नाम संवत्सरे छ १८ जिल्हेज सालगुदस्त सन इहिदें अशर मयातैनांत किल्ले रायगड येथें देवआज्ञा जाहली. त्यांची क्रिया वेदमूर्ति

इ० स० १८११।१२ इसने, अशर मयातैन व अलफ जमादिलावल २३

36. Yeshwadabai died at fort Raygad on 18th Jilhej of the preceding year. Her bones were brought to Poona, where the last rites were performed. The total expenditure on account of these rites came to Rs. 38053.

A. D. 1811-12.

चिंतामण दीक्षित कर्वे उपाध्ये यांजकडून कसबे पुणें येथें करविली. त्यास व नित्योदकुंभ, व दीपदानें, व मासिकनिवृत्तिसुद्धां इस्तकाबिल छ १८ जिल्हेज सालगुदस्त, सन इहिदे अशर मयातैन, तागाईत छ १७ जिल्हेज पौष वद्य चतुर्थी सालमजकूर सन इसन्ने अशर मयातैन पावेतों खर्च जाहला. तो विद्यमान गणेशभट्ट कर्वे उपाध्ये व बाबुराव गणेश कात्रे फडणीस व चिंतो वामन सिधये कारकुन निसबत दप्तर जनार्दन कोंडदेव गाडगीळ पोतनीस. रुपये.

अस्थि आणावयासी भास्कर दीक्षित कर्वे उपाध्ये, व बाळाजी मल्हार बापट, यांस पाठविले त्यांचे विद्यमानें खर्च झाला तो. रुपये.

३ वाटेस पोटखर्च. असामी ६.

४ मजुरीखर्च. अस्थि आणावयास ब्राह्मण असामी २ ठेविले त्यांस दर असामीस रुपये २ प्रमाणें. रुपये.

―――
७

सातवें दिवशीं अस्थीस मंत्राग्नि देऊन क्रियेस आरंभ करविला त्या दिवसापासून नऊ दिवस पर्यंत.

८०=||| भांडीं तांबें पितळीं.

८ कापड.

२||| सोनें, अस्थि दहनसमयीं चितेंत घालावयास तुकडे सुमारी १० येकून वजन मासे ०= येकूण दर १|= प्रमाणें. रुपये.

|||-|. किरकोळ.

१ क्षौराबद्दल देणें न्हावी यास, सातवे दिवशीं चिंतामण दीक्षित यांचें करविलें यास रुपये.

२०= गोवऱ्या व लांकडें.

३ मजुरी, रक्षा भरोन तुळापुरास पाठविली त्याबरोबर ब्राह्मण असामी २ येकूण रु.

||= पत्रावळी, मडकीं, वगैरे किरकोळ रुपये.

―――
२६||

दहावे दिवशीं नग्न प्रच्छादन श्राद्ध केलें त्यास रुपये.

रुपये.

२| पातळ, नग्न वस्त्रास सनंग १.

||- तूप, दानाकडे व पिंडाकडे वजन ०८१०९.

१०=उदकुंभास तांबें सुमारी २ वजन पक्कें ००||०|| येकूण दर २ प्रमाणें. रुपये.

१| सोनें, वजन मासा १ येकूण.

|= वाटी काशाची वजन पक्कें ००|- येकूण.

-|- रुपेंभारंभार.

०= लोखंड.

-।- तेलवजन.
-॥= जोडाचर्मी.
२॥ नक्त.
-।- पिंडास.
८-। हळद, मडकी वगैरे.
१ क्षौराबद्दल, देणें न्हावी यांस. रुपये.
८-॥ फडकें, पताकांस.

१०॥

अकरावे दिवशीं.

१८८८=॥ वृषोत्सर्ग.
२५४॥-॥ दशदानें.
१९६॥= वैतरणी गोप्रदान देणें.
१२३८=। पापक्षयार्थ गोप्रदान देणें.
१२३॥-॥ ऋण धेनु गोप्रदान देणें.
७५२॥=। उपदानें.
३०९॥= पददानें १३ येकूण ब्राह्मण असामी १३.
२०८८॥= शैय्यादान देणें. रुपये.
१२५७।-। शिबिकादान देणें. रुपये.
७०७॥।॥ अश्वदान देणें. रुपये.
९७९॥=। रथ बैलांचा, दान देणें. रुपये.
४५३७॥=। गजदान देणें. रुपये.
२३९॥=॥ दासीदान देणें. रुपये.
१३२२॥= महिकोदिष्टास. रुपये.
१३७॥।॥ रुद्रगणश्राद्धें अमान्नद्वारां केलीं त्यांस. रुपये.
१०६॥= वसुगणश्राद्धें अमान्नद्वारां केलीं त्यांस ब्राह्मण असामी ८येकूण रुपये.
९०० गृहनिष्क्रय, नक्त देणें.
२५० वर्षासन नक्त.
४० दीप, संवत्सरपर्यंत देणें.
१३॥= अमान्ने महादानाचे ब्राह्मणांस दिल्हीं तीं. सुमारें २७.
१॥= मिठाई, दानाचे ब्राह्मणांस दिल्ही, तीं दानें.
॥- यज्ञोपवितें दर दानास सुमारीं.
४॥= हार, तुरे, व गजरे, दानाचे ब्राह्मणांस दिल्हे ते.

१४१४७॥।॥

रुपये.

बारावे दिवशीं.

२०६।- आद्यमासिकादि श्राद्धें सपिंडी अधिकारार्थ आमान्नद्वारा केलीं. त्यांस ब्राह्मण असामी १६ येकूण.

रुपये.

८८ अंतरदशाह श्राद्धें अमान्नद्वारा केलीं त्यांस

११७१॥।=॥। सपिंडी.

१०१ मोक्षधेनु देणें समस्त उपाध्ये.

रुपये.

७८॥।- पाथेय श्राद्धें अमान्नद्वारा केलीं त्यांस.

रुपये.

३२५ क्रिया सांगणारां व दर्भ देणारा यांस.

असामी.

४०॥=। अमान्ने ब्राह्मणांस दिल्हीं तें.

७६१७ भूयसि सदाशिवपेठेंत सरकारची पागा बळवंतराव थोरात यांजकडील आहे, त्या पागेंत दक्षणा वाटली ते ब्राह्मण असामी ७६१७, दर असामीस रुपया १ प्रमाणें.

रुपये.

९६२८॥

रुपये.

तेरावे दिवशीं.

रुपये.

३४॥ शांतोदक केलें त्यास नक्त.

२०५ दुखोटा देणें, चिंतामण दीक्षित कर्वे उपाध्ये यांस क्रिया केली सबब.

रुपये.

रुपये.

१॥ देवदर्शनास गेले तेथें देवांस दक्षणा ठेवली ते.

रुपये.

१००० ब्राह्मणभोजन शनवारचे थोरले वाड्यांत केलें त्यास.

रुपये.

१९२० प्रायश्चित्तार्थ कृछ्रे गोनिष्क्रयद्वारा केलीं, तीं दर १५ प्रमाणें. रुपये.

८७ भूयसि शांतोदक समयीं शिष्ट ब्राह्मण जवळ होते त्यांस, ब्राह्मण असामी ८७ दर १ प्रमाणें.

२८ खासगीपैकीं पातळें होतीं तीं ब्राह्मणांस दिल्हीं. त्यांस दक्षणा वगैरे ब्राह्मण असामी ५.

रुपये.

३२७६ एकुण.

रुपये.

किरकोळ खर्च.

रुपये.

१५॥=॥। एकोदिष्ट, व सपिंडीकडे भोजन खर्च वगैरे.

९ केळींची पानें, विडयाकडे व अमान्नास व सपिंडीस वगैरे सळई पंचोत्री वजाकरून डांगा सुमारी ३०० दर शेंकडा रुपये ३ प्रमाणें रुपये.

रुपये.

४।= कागददस्ते लिहिण्यास व शाई मिळोन.

८॥= पानें विड्यांचीं, महादानाचे ब्राह्मणांकडे व सपिंडीकडे वगैरे विडयास

रुपये.

७॥=॥।. बुरुडकाम..

२२८।॥।-॥ मजूरी. रुपये.
३॥ तेल.
-।-॥। भांड्यास कल्हई करविली त्यास रुपये.
३ गुरांकडे व घोड्यांकडे. रुपये.
१ पत्रावळी पळसाच्या किरकोळ खर्चाकडे सळई पंचोत्री वजाकरून सुमारी ४०० येकूण.
२ देणें न्हावी येकोदिष्ट व सपिंडीचे ब्राह्मणांचीं क्षौरें करविलीं त्याबद्दल ६.

२९४।॥।≡॥। येकूण. रु.

उदकुंभ व दीपदानें ब्राम्हणांस भोजनास सरकारचे शनवारचे वाड्यांत घालून वर्षे श्राद्धपर्यंत दिल्हीं. त्यांस मुदत माहे १२ पैकीं वजा रोज.

०।१० आशौच्याचे.
०।२ अकरावा, बारावा, मिळोन.
०।६ येकुणातिसे.

०।१८

बाकी मुदत माहे ११।०।१२ येकूण. रुपये.
१५५४।॥।= उदकुंभ व दक्षणा मिळोन.
३२०९ दीपदानें व दक्षणा.

४७६३।॥।=

मासिक श्राद्धें. शनवारचे सरकारचे वाड्यांत ब्राह्मणांस भोजनास घालून केलीं त्यांस रुपये.
८४ माघ वद्य २ सत्ताविसावें दिवशीं ब्राह्मण ५ व पिंड १ एकूण ६ येकूण रुपये.
८४।= माघ वद्य ५ तिसावें दिवशीं ब्राह्मण ५ व पिंड १ येकूण ६ रुपये.
८४।= फाल्गून शुद्ध ९ त्रय पक्षीक सदर्हूप्रमाणें.
८४।= चैत्र व॥ ९.
३७७।≡॥ वैशाख वद्य १ मासिक निवृत्ति. रुपये.

७९८।॥-॥ (बेरजेंत चूक आहे).
१०० भरणी श्राद्ध भाद्रपद वद्य ९ मंदवारीं केलें. त्यांस. रुपये.

८९८।॥-॥

३३०५३।॥≡॥।
पैकीं, वजा सूट मखलासीसमयीं. रुपये ॥≡॥।.
बाकी रुपये ३३०५३.
तेहतीस हजार त्रेपन देविले. रुपये.

३११३ तसलमात, गणेशभट कर्वे उपाध्ये यांजकडे मातुश्री येश्वदाबाई कैलासवासी जाहली त्यांचे वर्षश्राद्धपर्यंत दीपदानें ब्राह्मणांस भोजनास घाढून द्यावयाचीं, त्यांचे खर्चाबद्दल २९ सफर सन इहिदे अशर मयातैनांत मशारनिल्हे यांचे नांवें तसलमातीस खर्च पडले आहेत. ते जमा धरून देविले. रुपये.
२९८९० इजाफत, राजश्री बाबासाहेब यांजकडील खासगीपैकीं त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार यांचे गुजारतीनें सन इहिदे अशर मयातैनांत पावले ते रुपये.

३३०९५

राजकीय· (ब) इतर माहिती·

(२) पेशवे, (ब) सवाईमाधवराव.

३७॥६ उत्तरकार्य खर्च, कैलासवासी माधवराव साहेब यांचें उत्तरकार्य केलें. त्यास विद्यमान रामराव नारायण देशमूख इस्तकबिल छ १३ रबिलाखर, आश्विन शुद्ध चतुर्दशी मंगळवार, ते छ २५ मिनहू अश्विन वद्य द्वादशी रविवार मुदत रोज ८१३, एकूण खर्च जाहला. तो गुजारत मोरो जनार्दन वांकनीस बरहुकूम यादी. रुपये.

इ. स. १७९५।९६.
सीत तिसेन मया व अलफ,
साबान २९

५६१।- छ १३ रबिलाखर, अश्विन शुद्ध १४ मंगळवार अस्तमानीं प्राणोत्क्रमण जाहलें. त्यास प्रथम दिवशीं. रुपये.
१० छ १४ रबिलाखर दुसरे दिवशीं, व २१ रबिलाखर दहावे दिवशीं क्षौर करविलें त्यास.
२१११३।- छ २३ रबिलाखर आकरावे दिवशीं.
२१९५॥- छ २४ रबिलाखर बारावे दिवशीं.
३९४॥।- छ २५ रबिलाखर तेरावे दिवशीं.
३१०।- छ २६ रबिलाखर मासिकनिवृत्ति.
४२७। छ २७ रबिलाखर वर्षाचे उदकुंभ वगैरे.
१५१५८≡ छ ३० रबिलाखर दीपसमया वगैरे दानें.
१८३२१ इतर खर्च भूयसि ब्राह्मणांस वगैरे.

४९५९३॥।-

तपशील.

२५६३।≡ नाणें मोहरा पुतळ्या वगैरे.
४७०३०।- नक्त.

४९५९३॥।-

A. D. 1795-96.

37. The Peshwa, Sawai Madhavrao died in the evening of 13th of Rabilakhar, the 14th of Ashwin Shudha. The total amount for his last rites amounted to Rs. 49593 As. 12.

राजकीय (ब) इतर माहिती.

(२) पेशवे, (क) चिमाजी आपा.

इ० स० १७९५।९६
सीत तिसेन मया व अलफ,
जिलकाद १८

३८।११ छ, मजकुरीं प्रातःकाळीं, नव घटका दिवसास चिमाजीआपा यांस प्रधानकीचीं वस्त्रें आलीं असेत.

इ० स० १७९५।९६
सीत तिसेन मया व अलफ
जिलकाद १८

३९।१२ कमावीस आहेर. राजश्री रावसाहेब यांचे दत्तविधान करून मातुश्री यशोदाबाई यांणीं घेतलें. सबब लोकांनीं आहेर केले ते जमा. सनगें, किंमत रुपये.

२०४॥ काशीराव गणपत रास्ते.
३६४॥ परशराम रामचंद्र.
४८५ तुकोजी होळकर.
४३६ दौलतराव शिंदे.
३१३॥ गोविंदराव गायकवाड.
३२। भास्कर महादेव जोशी.
६२॥। गोपाळ धोंडदेव भोगावकर.
११०८= नारायणराव व्यंकटेश घोरपडे.
१९८ मालोजी घोरपडे.
२९९ पांडुरंग बाबुराव.
६४॥। भिवराव जयवंत पानसी.
१५१॥ संभाजी हिंदुराव घोरपडे.
२६॥। अनंदराव जीवाजी लिमये.
२१ त्रिंबकराव गंगाधर रेटरेकर.
७२ जानराव समशेर सरंजामी.
१७१॥ नारो निळकंठ मजमदार.
३०४॥ रघुनाथराव निळकंठराव पटवर्धन.
२५॥ माधवराव कृष्ण पानसी.
२१६॥। सखाराम येशवंत पानसी.

A. D. 1795-96.

38. The clothes of Peshwaship for Chimaji Appa were received from Satara, on the morning of this date. The clothes were brought by Trimbakrao Amruteshwar Pethe who had been to Satara for the purpose.

A. D. 1795-96.
Scindia, Gaikwad, &c,

39. Lady Yeshwadabai having adopted Chimaji Appa, as his son. presents were made by the various officers of the state, including Balaji Janardan, Raste, Purandhare, Holkar,

९६॥	हरिभक्ति साहुकार.
१६०॥।	रामराव कृष्ण बावडेकर.
४२८=	विष्णु रघुनाथ पानसी.
७३॥	विठ्ठल मल्हार पुरंदरे.
८०	निळकंठ महादेव पुरंदरे.
१८२॥	त्रिंबकराव महिपत पुरंदरे.
६९६॥।	बाळाजी जनार्दन फडणीस.
८८॥	बहिरो रघुनाथ मेहेंदळे.
५५।	त्रिंबकराव जनार्दन.
५२॥।	विठ्ठलराम वांकनीस.
६४॥	मोरो नारायण बाखरे.
५७॥=	आबाजी बल्लाळ ठोसर.
१२१।	येशवंत आनंदराव कानिटकर.
९५॥।	गणेश कृष्ण गोखले.
७४	गोपाळराव राम पंडित.
१५६॥	आनंदराव भिकाजी रास्ते.
१९९।	रामचंद्र हरि फडके.
७६	नारो शिवराम खासगी.
११४॥	आनंदराव शिवराम लेले.
५५	गणपत आनंदराव मेहेंदळे.
२६२	समशेरबहाद्दर.
५४।	हारि चिंतामण दिक्षित.
१०७॥=	माधवराव रामचंद्र.
२१५	राघो विश्वनाथ गोडबोले.
२९७	चिंतामणराव पांडुरंग.
५६	मिरा महात.
४६॥	माधवराव भापकर.
७४॥	रुस्तुमराव पांढरे.
११०	मुसा नारज गाडदी.
१०९	गमाजी निंबाळकर पागा.
३०६॥।	देवराव महादेव हिंगणे.
१०४।	हणमंतराव दरेकर सरलष्कर.
७६॥	रामचंद्र गणेश कठोरेकर.

४७॥	सखोजी काटे पागा.
४७॥।	हैबतसिंग पागा.
४८॥	हैबतराव शंकर पागा.
५५	रामराव मल्हार मांडवगणे.
७६	भाईदास मांडवीकर.
२७॥	गोपाळराव रघुनाथ.
५३॥	शिवाजी निंबाळकर पागा.
९१॥।	आनंदराव आबाजी प्रतीनिधी, विशाळगडकर.
१८८	फतेसिंग भोसले.
३३	नारो कृष्ण देव.
११।	रंगो कोन्हेर येकबोटे.
५७॥	कृष्णसिंग पागा.
४३।	गणेश हरी पागा.
४४॥	शाहागीरखान रोहिले.
४३॥।=	विठलराव मोरेश्वर गोळे.
४१	दिनकर मल्हार कानिटकर.
१२१।	निळकंराव रामचंद्र पागा.
३०॥	बापुजी कृष्ण बापट.
३८	हरि इच्छाराम पागा.
४०	गंगाधर गणेश पागा.
४३॥।	येशवंतराव त्रिंबक.
१०४।	नारो बाबुराव वैद्य.
९६	सयाजी आपकर.
९८॥	रामचंद्र नारायण.
४६	व्यंकटराव रघुनाथ.
१२९	सदाशिव रंगनाथ वानवळे.
४०।	हैबतराव पलांडे पागा.
६३	बळवंतराव नागनाथ कुगांवकर.
२८	विनायकराव निळकंठराव रास्ते.
६२॥।	बळवंत सुबराव पागा.
१४२॥	महिपतराव त्रिंबक चिटनीस.
१९९॥	श्रीधर लक्ष्मण वकील.

१८५	कृष्णाजी माधवराव.
११९	रामचंद्र जाधव करडीकर.
१११	रामचंद्र आबाजी वानवळे.
४३॥।	माहादशेट वीरकर.
३९॥	सिदापाशेट वीरकर.
७२॥	धोंडशेट वीरकर.
१९८।	गोविंदराव बाजी जोशी.
७४	खंडेराव बल्लाळ.
३६६	गोविंदराव निलकंठ खासगी.
९७॥	माधवराव त्रिंबक दीक्षित.
२८९	अजिमत दौले.
१०४॥।	न्यामतखान तासगांवकर.
१०८॥	केदारजी घोरपडे.
४३	नरहर गोपाळ जोशी.
८५	त्रिंबकराव नारायण परचुरे.
७०॥	नारो शिवराम चक्रदेव.
४६	साबाजी नाईक निंबाळकर.
७६॥॰	महिपतराव भवानी.
६७॥	अमृतराव केशव थत्ते.
१८॥	गणपतराव पटवर्धन.
१२१॥	नरसिंह खंडेराव.
१२॥	केशवराव बापुजी मोकाशी.
९३॥।	हैबतराव व्यंकटेश.
७९॥≡	विठ्ठल गोरक्ष वकील.
२०३	गोविंदराव भगवंत पिंगळे.
६९।=	आनंदराव नाईक निंबाळकर.
३३॥।=	माहादाजी बल्लाळ साठे.
४४॥	माहादाजी बल्लाळ गुरुजी.
४९	दादो हारि मराठे.
३३।	पाराशर दादाजी.
६३॥।	पांडुरंग विठ्ठल.
५७॥	सदाशिव केशव दात्ये.
५४॥।=	लक्ष्मणराव नागनाथ वांबोरीकर.

६६ काशी बल्लाळ गाडदी.
९३॥ विनायक नारायण परांजपे.
२८९॥ निळकंठ आंबुराव.
५३॥ जगन्नाथ रघुनाथ पागा.
३३॥। विश्वासराव नारायण भावें.
१९२ आमरसिंग जाधवराव.
३२१ रंगराव त्रिंबक राजेबहादर.
१९४ खंडेराव त्रिंबक वाढेकर.
४८।≡ हणमंतराव जाधव भुईजकर.
६६ शामराव नारायण पोतनीस.
१७६॥ रघुनाथराव बळवंत.
५९॥।= बळवंत बाबुराव ठाकूर.
४८॥। रामचंद्र महादेव परांजपे.
८८॥ माहादाजी नाईक निंबाळकर.
७४॥ लालाफत्तेचंद नी ॥ पारसनीस.
११॥। येशवंतराव मचाले.
१२७ गणपत माधवराव.
२० बळवंतराव थोरात.
६२॥ कृष्णराव रामचंद्र.
१२७॥ बाबुराव वकील.
८६॥। संभाजी जाधवराव.
६३ नारायणराव यादव भागवत.
१७९ मलोजी जाधवराव.
७९॥।- महिपतराव कृष्ण.
९३॥ कृष्णाजी बहिरव थथे.
७५। बापूजी बाबाजी.
१२२॥ बळवंतराव आपाजी.
१२८॥- सिद्धेश्वर महिपतराव बिनी.
४३॥। गुलजारखान ठोके.
१७९॥ नारोजी जाधवराव.
१०७।≡ कल्याणराव कवडे.
९३॥।= खंडो अनंत वर्तक.
११९। बळवंराव गोविंद वांकडे.

२९ नारायणराव सर्वोत्तम हशमनीस.
२३ मेघःशाम बल्लाळ.
७९॥। कृष्णराव महिपत साठे.
६४॥ कृष्णराव बळवंत मेहेंदळे.
२०॥ नारो कृष्ण भिडे.
३०॥ नांव लागणें.
२॥।= चोळखण.
.।= बळवंतराव आपाजी.
.॥। रामचंद्र शंकर.
.॥। मनुबाई गोखली.
.।= महादेव दीक्षित आपटे.
.।= भास्कर दीक्षित कर्वे.
.।. जनार्दन आपाजी.

२॥।=

१७०१६।=

तपसील.

१९६८।	तिवटें.	१४८
१३४७॥।=	जाफरखानी.	१०३
७१६।	शेले साधे.	७४
३०१९॥	दुपेटे पैकीं.	३७
१४०४॥।	लुगडीं पैकीं.	२०
५१६	साड्या शेलारी.	१७
१३८४॥।=	लुगडीं.	९८
६४४	पातळें जरी.	१४
२७	पातळें साधी.	२
१५१॥।	दुपेटे छिटी बऱ्हाणपुरी.	४
७०	तिवटें छिटी बऱ्हाणपुरी.	३
१४७॥	जामेवार छिटी बऱ्हाणपुरी.	७
२६५॥=	चोळखण.	१६१
६८॥।	पातळ छिटी बऱ्हाणपुरी.	१
७५॥	गोलदार.	५
५०	तुबा किनखापी.	१

१००	झगा छिटी भस्मी.	१
७३९॥	दुपेटे छिटी भस्मी.	३
२४०	तिवटें छिटी भस्मी.	३
२०६१।	किनखाप.	३८।′
२०	जाफरखानी छिटी, बऱ्हाणपुरी.	-॥-
१७०१६।=	(वरील रकमांत चूक आहे.)	७४०॥।-

जमा, जामदारखाना.

४०।५६ कमावीस भेट, राजश्री आपासाहेब यांस तालुके आमदाबाद येथील सुभा सांगितला. सबब मुहुर्तें करून वस्त्रें दिल्हीं. तीं गुजारत रामजी खीजमतगार, सनंगें येकूण. रुपये.

इ० स० १७९७–९८ समान तिसेन मया व अलफ, साबान ९

३९॥	तिवट पैठणी.	१	
३९८॥	दुपेटा पैठणी.	१	
१२५	किनखाप लाल भरगच्ची.	१	
४०	महमुद्या धुवट.	२	दर २०
६०३		५	

जमा, जामदारखाना.

४१।५७ कमावीस भेट, राजश्री आपासाहेब यांसी बाबद. केसो कृष्ण दातार याजवळ तालुके आमदाबाद येथील मुतालिकीचे शिक्के दिल्हे. ते समयीं कोथरूडचे बागांत दिल्हीं. तीं गुजारत रामजी खीजमतगार सनंगें येकूण. रुपये.

इ० स० १७९७–९८ समान तिसेन मया व अलफ, साबान १८

१००	तिवट छिटी बऱ्हाणपुरी.	१
४००	दुपेटा छिटी बऱ्हाणपुरी.	१
२२	महमुद्या धुवट.	२
७५	किनखाप.	·॥·
५९७		४॥

४२।२४० बदल देणें, लग्नखर्च. राजश्री चिमणाजी रघुनाथ यांस कुलबाब पडलें पानसुद्रां सालीना दोन लक्ष रुपये खर्चाची नेमणूक केली. त्यांत लग्न, कार्य, प्रयोजन, वगैरे जो खर्च होईल तो त्यांनीं करावा. दोन लक्ष रुपयांखेरीज सरकारांतून कांहीं द्यावयाचें नाहीं. परंतु

इ. स. १८११–१२ इसन्ने अशर मयातैन व अलफ. जमादिलावल २०

A. D. 1797-98. 40. Appasaheb was appointed to the Subha of Amdabad.

A. D. 1797-98. 41. Keso Krishna Datar was appointed Appasaheb's Mutalik.

A. D. 1811-12. 42. Chimnaji Raghunath was given Rs. 2 Lacs per annum, for all his expenses special and ordinary. He hesitated to marry a second time, and appeared to be getting indifferent to worldly matters. As it was thought desirable that he should have

चिमणाजी रघुनाथ यांचा आपलें दुसरें लग्न करण्याविषयीं अनमान दिसला, व प्रपंचास उदास जाहले. त्यांची वंशवृद्धि असावी. याजकरितां सरकारांतून येक वेळ लग्न करावें. यापुढें लग्न कार्यें वगैरे प्रयोजनें त्यांजकडे जाहल्यास सरकारांतून कांहीं येक त्यांस देऊं नये. दोन लक्ष रुपये त्यांस नेमणूक सालीना केली आहे. त्यांत त्यांनीं करावीं. याप्रमाणें अलपिष्टिन (एल्फिन्स्तन) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांचे विद्यमानें ठरोन मौजें कोपरगांव परगणें कुंभारी येथील बेटांत वैशाख शुद्ध दशमी सौम्यवारीं, छ ८ जमादिलावलीं, शके १७३४ अंगिरा नाम संवत्सरीं सालमजकुरीं वीस घटका रात्रीस चिमणाजी रघुनाथ यांचें लग्न केलें त्यास खर्च जाहला तो गुजारत त्रिंबकजी डेंगळे. रुपये.

वैशाख शुद्ध तृतीया सौम्यवासर, छ १ जमादिलावलीं, मंडप मुहूर्तानें घालावयाचे प्रारंभीं स्तंभपूजन केलें. त्यास विद्यमान गणेशभट कर्वे उपाध्ये, व चिंतो वामन सिधये कारकून निसबत दप्तर. रुपये.

१ घरचे देवापुढें.
१ श्रीगणपतीस.
१ स्तंभास.
-॥- पृथ्वीस.
-॥- शेषास.
-॥- सूर्यास.
-॥- विश्वकर्म्याचे अयुधांस.
४ ॥ भूयासि दक्षणा, ब्राह्मण असामी ९ दर -॥- प्रमाणें.

९॥

पैकीं वजा, बोहल्याचे यादींत खाशांकडील खाजगीपैकीं रुपये. .॥.

बाकी. रुपये. ९

वैशाख शु. षष्ठी मंदवार. छ ४ जमादिलावल. रुपये.

१०८८=॥ अक्षतेंचे प्रारंभ समयीं.
४।=॥ घाणा भरला व उडीदास तेल लाविलें त्यास.
१३४०८= गडंगनेर घरचा केला त्यास. रुपये.

१४५२॥।-

पैकीं वजा, ऐन जिनसांचे किंमतीचे यादीचे बेरजेस कमी पडला, तो रुपया १. बाकी १४५१॥।- रुपये.

Some projeny, it was settled through Mr. Elphinston that the Peshwa should bear the expenses of Chimnaji Raghunath's marriage and that the latter should make no future demand upon the Peshwa in addition to the fixed allowance on any account. The expenses of the marriage amounted to Rs. 12521 and were a special case paid by the Peshwa. The marriage took place at Kopergaum on the 8th of Jamadilawal.

वैशाख शुद्ध नवमी भोमवासरीं, छ ७ जमादिलावलीं, विनायकशांति केली.
त्यास बरहुकूम यादी. रुपये.

२॥ पुण्याहवाचन केलें त्यास रुपये.
६७। शांतिकडे.
१४८=॥ ऐन जीनसांची किंमत. रुपये.

८४८=॥-

वैशाख शुद्ध दशमी सौम्यवासर, छ ८ जमादिलावल, लग्नाचे दिवशीं.

१९। घाणा भरला ते समयीं.
९९३।-। पुण्याहवाचन समयीं.
३३॥ सुवासिनी भोजनास घातल्या.
३८= सीमांतपूजनास, सोयरे वराची पूजा करावयास आले, त समयीं भूयसि ब्राह्मणांस दिल्ही त्यास. रुपये.
३२९। तेलफळ, सोयरे यांजकडे नेलें त्यास. रुपये.
२००। वाग्निश्चय, सोयऱ्याचे मंडपीं केला. त्यास विद्यमान राजश्री बाबासाहेब.
२५॥ रुखवत सोयऱ्याकडून आलें तें समयीं.
६८५।≡॥ वर प्रस्थान, वधुगृहीं जातें समयीं.
३०३४८- लग्नास सोयऱ्याचे मंडपीं गेल्यावर तेथें खर्च जाहला तो.
३॥-॥ हात दिव्यास.
२८।-॥ पुण्याहवाचन, व सीमांतपूजन, व आहेर घेऊन लोक आले तेव्हां विडे दिल्हे त्यांस वगैरे.
५ तोरणें कागदीं रंगीत सुमारीं. २.
३॥=॥ कित्ता नक्त खर्च. रुपये.

५३६५८॥-

पैकीं वजा कमी यादीस पडले. रुपये ५.
बाकी. ५३६०८॥-

वैशाख शुद्ध येकादशी छ १० जमादिलावल, भृगुवासरें.

२०६८= सूनमुखसमयीं. रुपये.
२॥ विद्यमान राजश्री आपासाहेब, अग्नीस व देवांस.

वैशाख शुद्ध १२ मंदवासरे छ ११ जमादिलावल. रुपये.

२९९।≡॥ नवग्रह शांति केली त्यांस.
१९९०॥=॥ साडे रात्रौ पंधरा घटकांस जाहलें, त्यास वगैरे.
३६॥= विडे कुलपी, व केळीच्या डांगा मिळोन. रुपये.

२३२३।

वैशाख शुद्ध १३ भानुवासर, छ १२ जमादिलावल. रुपये.

८४॥=॥ देवकोथापन केलें त्यास. रुपये.

५० वेदशास्त्री देव पालशेतकर, सोयऱ्याकडील उपाध्ये यांस पाठवणीबद्दल.

१८।=। बोडण भरलें त्यांस.

६९३॥। वरात वाड्यांत आलीयावर पडभोजनास सोयरे मंडळी बोलाविली त्यास.

२८- राजश्री आपासाहेब यांस अभ्यंगास सामान.

४० माधवराव अनंत रास्ते यांनीं पुण्याहून आहेर कारकुनाबरोबर पाठविला. त्यास रास्ते यांस फेर अहेराचीं वस्त्रें अहेराचे सनंगांपैकीं मशारनिल्हेचे कारकुनाजवळ देऊन त्या जखेरीज कारकून यास वस्त्रें दिल्हीं तीं. सनंगें.

१० वोवाळणी, उष्टी हळद सोयऱ्याकडून आली ते समयीं दिल्ही. ते पुतळ्या ताटें येकूण दर ५ प्रमाणें.

१४ लक्ष्मीपूजन समयीं सरकार वाड्यांत नवरेमुलीस वस्त्रें दिल्हीं. तें समयीं सोयऱ्यांकडील उपाध्यास वस्त्रें द्यावीं, तीं पावलीं नव्हतीं सबब छ. मजकुरीं दिल्हीं तें सनंगें.

वैशाख शुद्ध १४ इंदुवासर, छ १३ जमादिलावल, बरहुकूम यादी

१॥।= ओटीस सामान, मांडवपरतनाचे आमंत्रणास बायका आल्या सबब.

२॥ कागद दस्ते जुन्नरी, लिहिण्याकडे सुमारी ५ दर -॥- प्रमाणें.

३ खाद्या, पासोड्या, विड्याचे रुमालास वगैरे सनंगें २ रुपये. दर १॥ प्रमाणें.

७।= रुपये.

प्रत. यादी दोन येकूण

२०४॥= प्रत यादी १ येकूण.

५०० अतसबाजी नळे वगैरे रुपराम चौधरी याजकडून रुपये. करविले त्यास.

७०४॥=

१५०० गुजारत जनार्दन नारायण नऱ्हेकर, भोजनखर्च गडंगनेरापासून मांडवपरतनापर्यंत कुलभोजन खर्चाचे.

१२५२१॥।=।

पैकीं वजासूट. -|||≡|. रुपये.

बाकी रसानगी याद. रुपये.

१२५२१

बारा हजार पांचशें येकवीस रुपये जमा इजाफत खाशांकडील खासगीपैकीं, त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार याचे गुजारतीनें पावले. ते जमा धरून देविले. रुपये.

राजकीय. (ब) इतर माहिती.

—:०:—

पेशवे, (ड) अमृतराव.

४३।२४. परगणें अरुण वगैरे महाल येथील कमावीस होती. ते दूर करून

इ. स. १७९६–९७. सचा तिसेन मया व अलफ, जमादिलाखर ३०.

सालमजकुरीं तीर्थस्वरूप राजश्री अमृतराव यांजकडील खर्चाचे बेगमीबदल. महाल बितपसील.

१ परगणें अरुण वगैरे.
१ परगणें खुटवाड.
१ शाहाडौरा.
१ तर्फ आकाझरी देखील तारई, व पिंपरीया मिळोन.
१ परगणें मावळ.
१ परगणें महतपूर.

६

येकूण सहा महाल देविले असेत. तरी त्यांजकडील कमावीसदाराचे हवालीं ठाणीं जकीरा सुद्धां करून कबज घेणें. ह्मणोन नारो चिमणाजी यांचे नांवें छ २७ रबिलावल.

सनद १.

जमीदार, परगणें अरुण वगैरे महाल यांस कीं, तुम्ही यांजकडील कमावीसदारासी रुजू होऊन सदरहू महालांचा अमल सुरळीत देणें. ह्मणोन चिटणीसी पत्र. १.

२

रसानगी राघोबा सदाशिव थथे.

४४।० धर्मादाय खर्च, विद्यमान तीर्थस्वरूप राजश्री अमृतरावसाहेब, स्वारी मुहूर्तें-

इ० स० १७९८–९९ तिसा तिसेन मया व अलफ, रबिलाखर ११

करून पांच घटका रात्रींस अवसीस वाड्यांत आली. ते समयीं ग्रह प्रीत्यर्थ दानें दिल्हीं त्यांतील केतु प्रीत्यर्थ शस्त्रदान रामभट तेलंग श्रीशैल्यकर यांस दिल्हें. त्यास तसलमात, बापूजी जाचक

A. D. 1796-97. 43. The Parganas of Arun, Khutwad, Shahadowra and three others were assigned to Amritrao for his expenses.

A. D. 1798-99. 44. Amritrao entered the palace 5 Ghatakas after night fall on this date.

खासबारदार दिम्मत भिवजी जाचक, निमचा नीट, पान सेकल्याचे, परज साधा, मेण सकलादी काळे, दागिना सुमारी १.

बाळोजी कुंजराच्या कीर्दीपैकीं.

४५।१२९ परगणें रावेर प्रांत खानदेश येथील तिजाई पैकीं; तिजाई मोकासा व दुमालेगांव खेरीजकरून अंमल काशीराव होळकर यांजकडे फौजेचे जरंजामास चालत होता. तो दूर करून तीर्थस्वरुप राजश्री अमृतराव यांजकडे सरंजाम, सालमजकूरापासून करार करून दिल्हा येविशी.

इ० स० १८००–०१ इहिदे मयातैन व अलफ, सवाल २२

सनदा.

१ काशीराव होळकर यांस कीं परगणें मजकूरचें ठाणें तीर्थस्वरुपाकडील कमावीसदार येतील, त्यांचे हवालीं करून देणें ह्मणोन.

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं, रुजू होऊन सदरहू अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

२

रसानगी याद छ २२ सवाल.

४६।१'५४ तीर्थस्वरूप राजश्री रावसाहेब यांची स्वारी शहर जुन्नर तालुके शिवनेर येथें जोरव्याहून राहण्यास येणार, याजकरितां शहर मजकूरीं सरकारचा वाडा आहे, त्याची झाडलोट करून राहावया जोगा नीट करून ठेवणें, ह्मणोन रामचंद्र नारायण मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवें सनद १.

इ० स० १८०२–०३ सलास मयातैनव व अलफ, रबिलाखर २९

रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

प्रतिनिधी.

बाळोजी कुंजराच्या कीर्दीपैकीं.

४७।१२८ महालांनिहाय व गांव येथील, राजश्री पंतप्रतिनिधी यांजकडील अमलाचा वसूल सखाराम घाडगे वगैरे यांजकडे द्यावयाविसी तुम्हांस सालमजकुरीं आज्ञापत्र सादर जाहलें आहे. त्यास हल्लीं प्रतिनिधीकडील कमावीसदाराकडे पूर्ववतप्रमाणें महालांनिहाय गांवचा वसूल द्यावयाविसी आज्ञा करून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं यांजकडील कमावीसदारासी रुजू होऊन अमल सुरळीत देणें. म्हणोन चिटणिसी

इ. स. १८००–०१ इहिदे मयातैन व अलफ. जिलकाद २५

पत्रें.

A. D. 1800-1801. 45. The Amal in Pargana Raver in Khandesh enjoyed as Saranjam by Kashirao Holkar was now given to Amritrao,

A. D. 1802-1803. 46. Amritrao was about to proceed to Junnar for residance. Orders were therefore issued for cleaning the Government house at the place.

A. D. 1800-1801. 47. The revenues in verious Mahals and villages belonging to the Pratinidhi, which were previously ordered to be given to Sakharam Ghatge and others, were now allowed to be continued to the Pratinidhi.

४ सखाराम घाटगे सर्जेराव याजकडे महाल व गांव येविसीं.

३ जमीदारास.

१ करियात मलवडी.

१ करियात कासेगांव.

१ करियात आटपाडी.

३

१ मौजे बुधपांचेगांव करियात ललगुण, येविसीं मोकदम यास.

४

२ निळकंठराव कुंजीर याजकडे वांगी व करियात वेळापूर येविसीं, करियात हरदु महालांचे जमीदारांस पत्रें.

३ येशवंतराव पाटणकर याजकडे महाल, येविसीं जमीदारांस.

१ करियात निंबसोड.

१ करियात मायणी.

१ करियात खानापूर.

३

१ निंबाजी भास्कर यांजकडे मौजे राजापूर परगणें वाप येथील मोकासबाब, व शेरी येविसीं मोकदमास.

१० दहा पत्रें दिल्हीं असेंत.

छ २५ जिलकाद.

इ. स. १८०४-५. समस मयातेन व अलफ साबान ७.

४८।१८६ परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांजकडील फौज व पायदळ मळ्या घाटाचे घाटमाथा जमा होऊन घाटाखालीं कोंकणांत उतरोन दंगा करणार, ह्मणोन हुजूर विदीत जाहलें. त्यावरून सदरहू बंदोबस्तांचें काम सरकारांतून बाळाजीराम मामलेदार माहालांनिहाय तालुके रत्नागिरी याजकडे सांगोन हे सनद सादर केली असे, तरी तुह्मीं किल्ले व महालानिहाय येथील बंदोबस्त चांगला मजबुदीनें राखोन तेथील नेमणुकी शिबंदीपैकीं लोक दारु व गोळी व पोटाची बेगमी करून देऊन, मशारनिल्हेकडे मळ्याचे वगैरे घाटांचे बंदोबस्तास रवाना करणें. लोकांनीं तेथें जाऊन बाळाजीराम याचे रजातलबेंत वर्तोन यास हजीरी देऊन सरकार लक्ष राखोन हे सांगतील त्याप्रमाणें सरकार चाकरी करीत जाणें. ह्मणोन लोकांस ताकीद करून बाळाजीराम याजकडे घाटमाथा लोक जलद रवाना करणें. घाट व वाटा कोंकणांत उतरावया-

A. D. 1804-1805.

48. Government was informed that Parasharam Pandit Pratinidhi had collected an army above the Malya ghant, and was about to attack the Konkan. Balajiram mamlatdar of Taluka Ratnagiri was directed to proceed against him, and the other officers in Konkan were instructed to assist him.

च्या असतील त्या पाडणें जाहल्यास बाळाजीराम सांगतील त्याप्रमाणें घाट व वाटां पाहून बंदोबस्त राखणें, म्हणोन किल्लेदार व महालांनिहायचे मामलेदार वगैरे यांस. सनदा.

२ तालुके अंजनवेल.

१ विठोजी गायकवाड महालांनिहाय यांस.

१ विठ्ठल विश्वनाथ किल्लेहाय यांस.

२

१ परशराम रामचंद्र किल्ले बहिरवगड तालुके अंजनवेल यांस.

२ तालुके रत्नागिरी.

१ बाळाजीराम महालांनिहाय यांस.

१ चिंतो वामन किल्लेहाय यांस.

२

१ आपाजी शिंदे किल्ले महीपतगड यांस.

१ खंडेराव निळकंठ तालुके विजयदुर्ग यांस.

१ आनंदराव धुळप सुभा आरमार, विजयदुर्ग यांस.

१ नारो रामचंद्र तालुके देवगड यांस.

१ विठोजी गायकवाड तालुके सुवर्णदुर्ग यांस.

१ खंडोजी जाधव किल्ले प्रतापगड यांस.

१ परशराम लक्ष्मण किल्ले परळी यांस.

१ नारो गोविंद तालुके रायगड यांस.

१ नारो गोविंद प्रांत राजपुरी यांस.

१ सदाशिव जयराम तालुके अवचितगड.

१ अनंदराव पंडित प्रतिनिधी विशाळगडकरी यांस.

१६

रसानगी यादी.

४९।२३५ राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडे महाल, मुलूख, व किल्ले कोट, वगैरे सरंजामास व सरंजामाखेरीज चालत होते. तें त्यांजकडून दूर करून सरकारांत घ्यावयासी बापूजी गणेश गोखले यांस आज्ञा केली, त्याजवरून त्यांनीं प्रतिनिधीकडील महाल, मुलूख, व किल्ले कोट, वगैरे सरकारांत घेतले. त्यांची जप्ती गोखले यांजकडे आहे. त्यांपैकीं महालगांव वगैरे बितपसील.

इ० स० १८११–१२
इसने अशर मया तैन व अलफ.
जिलकाद १४.

49. The territory and forts held by Parasharam Pandit Pratinidhi on Saranjam or other tenure, were formerly taken from him by Bapuji Ganesh Gokhle under the orders of Government and were managed by him. A portion of the territory was now restored to the Pratinidhi.

A. 1811-12

१ करियात आठपाडी येथील हिस्सेदार व दुमालेदार खेरीजकरून अमल.

१ परगणें बागेवाडी देहे सतावीस येकूण तनखा, खेरीज हिस्सेदार करून पेशजी प्रतिनिधी मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजामास लाऊन दिल्हा. ते बेरीज ९८८३०॥ रुपये.

पैकीं वजा, ठाणें परगणे मजकूर सरकारांत ठेविलें आहे. त्याचे लगत कसबे बागेवाडीसुद्धां गांव सरकारांत ठेवावयाचे त्यांची बेरीज ३७२१९॥=॥.

बाकी बेरीज ६१६१०॥।-। रुपये.

येकूण येकसष्ठ हजार साहाशें पावणेअकरा रुपये सवा आणा बेरजेचे लाऊन द्यावे.

× × × × × ×

येकूण महाल व गांव वगैरे येथील सदरहू प्रतिनिधीकडील अमलाची जप्ती गोखले यांजकडून दूर करून सालमजकुरीं परशुराम पंडित प्रतिनिधी यांजकडे जातीस वगैरे बेगमी बदल सरंजामास लाऊन देविला येविसी. सनदा.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(४) आंगरे.

५०।९. राघोजी आंगरे मृत्यु पावले. सबब त्यांजकडील महाल व गांव व जमीनी सरकारांतून सरंजामास होते ते व त्यांजकडील अमलाचे गांव वगैरे यांची जप्ती सन आर्बातिसेनांत तुम्हांकडे सांगितली होती. ते सालमजकुरीं त्यांचे पुत्र मानाजी आंगरे, वजारतमाहा, सरखेल, यांजकडे पेशजीप्रमाणें त्यांजकडील अमल सरंजामास गांव व जमीनी वगैरे आहेत, ते करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूची जप्ती मोकळी करून मशारनिल्हेचे दुमाला करणें म्हणोन. सनदा.

इ. स. १७९५–९६.
सीत तिसेन मया व अलफ
साबान २०.

५१।३६. मानाजी आंगरे वजारतमाहा, सरखेल, यांचा व बाबुराव आंगरे यांचा घरकलह लागला आहे. त्यास बाबुराव आंगरे यांजकडून धोंडजी लंवडे लोक सुद्धां कुलाब्यास गेले आहेत. त्यांचेबरोबर सतावसी महालांनिहाय, येथील कमाविसदार यांचे नांवें सनदा.

इ. स. १७९६--९७.
सबा तिसेन मया व अलफ,
जिलकाद २१.

१ आनंदराव राम यांस सनद कीं, प्रांत कर्नाळा येथें कुलाबकराकडील चाकरमाने लोकांचीं घरें असतील तीं जप्त करणें, व किल्ले माणीकगड येथील महाळांत वजारतमाहा, याजकडील अमल असेल त्याची जप्ती करून, जप्तीमुळें ऐवज वसूल होईल तो धोंडजी लंवडे यांजकडे देणें ह्मणोन.

50, Raghoji Angria having died his territory was attached in A. D. 1793-94. It was now ordered to be continued to his son Manaji Angria.
A. D. 1796-97.

51. A family dispute having ensued between Manaji Angria Wazarat Maha Sarkhel and Baburao Angria, the Angria's revenue in Government territory was ordered to be attached.
A. D. 1796-97.

१ भास्कर लक्ष्मण परणें सांकसें याचें नांवें सनद कीं, कुलाबे याजकडील चाकरमानें लोकांचीं घरें तालुके छतीसी परगणें मजकूर येथें असतील; तीं जप्त करणें, व परगणें मजकूर पैकीं वजारतमाहा, यांजकडील अमलाची जप्ती करून ऐवज वसूल होईल तो धोंडजी लंवडे यांजकडे देणें ह्मणोन.

सनद.

१ बाबुराव पासलकर याचे नांवें सनद कीं, धोंडजी लंवडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें. कुलाबा याकडील चाकरमाने लोकांचीं घरें तालुके अवचितगड येथें असतील त्यांची व वजारतमहा याजकडील, अमलाचीं जप्ती बाबूराव आंगरे करतील त्यांस करूं देणें ह्मणोन.

सनद.

१ अमृतराव पासलकर याचे नांवें सनद कीं, धोंडजी लंवडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें. कुलाब्याकडील चाकरमाने लोकांचीं घरें तालुके उंदेरी येथें असतील त्यांची जप्ती बाबुराव आंगरे करतील त्यांस करूं देणें व तालुके मजकूर येथें वजारतमाहा, यांचा निमे अमल आहे त्याची जप्ती तुम्हीं करून ऐवज वसूल होईल तो लंवडे याजकडे देणें ह्मणोन.

सनद.

४

चार सनदा राजश्री आबाजी कृष्ण शेळूकर, जबाजी गोविंद, नानाजी भानु, दिंमत मजकूर.

५२।३७ मानाजी आंगरे, वजारत महा, सरखेल, यांचा व बाबूराव आंगरे यांचा घर-
इ० स० १७९६-९७ कलह लागला आहे. त्यास बाबूराव आंगरे यांजकडील धोंडजी लंवडे
सबा तिसेन मया व अलफ, लोकसुद्धां कुलाबा प्रांतीं गेलें आहेत. त्यांचे बंदोस्ताबिसी चिटणीसी.
जिलकाद २१

पत्रें.

१ मेस्त्र (मिस्तर) सर चारलीस वारे मालीट, गोवर्ण दारे, (गव्हरनर) जनराल (जनरल) बंदर मुंबई यांचें नांवें पत्र, कीं धोंडजी लंवडे दारुगोळी वैगेरे सरंजाम बंदर मजकुराहून खरेदी करून आणतील त्यांस आणूं द्यावा. सरखेल याजकडील जैसिंगें आंगरे यांजकडे सदरहू सरंजाम येकंदर जाऊं देऊं नये. व त्यांजकडून जवाहीर मोल करावयास येईल तें अटकाऊन बाबूराव आंगरे याजकडील कारकून येतील त्यांचे हवालीं करावें. ह्मणोन पत्र.

---

52. Baburao Angria sent Dhondji Lawande to Kolaba. Sir Charles Warre Malet, Governor of Bombay was requested to allow Dhondji to purchase ammunition at Bombay and to prevent any ammunition being sent to Jaising Angria of the party of
A. D. 1796-97.
Manaji Angria.

१ राजश्री शंकरराव पंडित यांस पत्र कीं, कुलाबकर चाकरमाने तालुके सुधागड येथें असतील त्यांची जप्ती मशारनिल्हेकडील सरदार गेले आहेत ते करितील त्यांस आपणाकडून अडथळा होऊं नये. हरएक साहित्यांविसी मशारनिल्हेकडील सरदारांचे लिहिलें तालुके मजकूरीं येईल त्याप्रमाणें साहित्य करावें ह्मणोन. पत्र.

१ सदाशिव रघुनाथ यांचे नांवें पत्र कीं, परगणें राजपुरी येथील चाकरमाने कुलाबकराकडे असतील, त्यांचीं घरें बाबूराव आंगरे यांजकडील धोंडजी लंवडे गेलें आहेत ते जप्ती करतील त्यास करूं देणें. तुम्हीं अडथळा न करणें ह्मणोन. पत्र.

१ आनंदराव शिंदे यांस पत्र कीं, धोंडजी लंवडे तुम्हांस सांगतील त्याप्रमाणें पुस्तपन्हा हरयेकविसी करीत जाणें, व रेवदंडा पैकीं दारुगोळी द्यावयाविसी अलाहिदा सनद सादर केली आहे, त्या अन्वयें देणें. कुलाबकर चाकरमाने तालुके मजकुरीं असतील त्यांचे घरचीं व आंगरे यांजकडील महालची जप्ती बाबूराव आंगरे करतील त्यांस करूं देणें. व कुलाबियाकडील रयत तेथें आली असेल त्यांजकडील धान्याचा व बाकीचा वसूल हे घेतील त्यांस घेऊं देणें. तुम्हीं जमाव सुद्धां जाऊन कामकाज करणें ह्मणोन. पत्र.

४

चार पत्रें दिल्हीं असत.

५३।२४५ प्रांत कुलाबा येथील बंदोबस्त तुह्मांकडे सांगोन हें पत्र लिहिलें असें, तरी तुम्हीं सरकार लक्ष धरून प्रांत मजकूरचा बंदोबस्त करून निघोन पुण्यास यावें. ह्मणून मानाजी आंगरे वजारतमाहा सरखेल यांचे नांवें चिटणीसी पत्र. १

इ० स० १८१४–१५ खमस अशर मया तैन व अलफ साबान १३

५४।२४७ प्रांत कुलाबा येथील महाल व गांवचा अमल मानाजी आंगरे वजारत माहा सरखेल, यांजकडे आहे त्याजपैकीं रुपये १०००० दहा हजार रुपयांचे गांव मशारनिल्हे कडून दूर होऊन सालमजकुरापासून सरकारांत आंगरे यांनीं द्यावयाचा करार केला. त्यास सदरहू गांवची मामलत सालमजकुरीं चिंतो वामन यांजकडे सरकारांतून सांगितली येविसी सनदा.

इ. स. १८१४–१५ खमस अशर मयातैन व अलफ; रमजान ४

१ मानाजी आंगरे, वजारतमाहा सरखेल, यांस कीं, दहा हजार रुपयांचे गांव सरकारचे सोईचे मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन.

---

53. Manaji Angria Vazarat Maha Sarkhel was appointed to Prant Kolaba and was directed to arrange its affairs and repair to the Huzur.
A. D. 1814-15.

54. Manaji Angria agreed to surrender villages valued at Rs. 10000 in Prant Kolaba to Government.
A. D. 1814-15.

१ चिंतो वामन यांस, कीं दहा हजार रुपयांचे गांव सरकारचे सोईचे तुम्हीं हवालीं करून घेऊन इमानें इतबारें वर्तोन गांवचा अंमल चौकशीनें करून जमाखर्चाचा अजमास अलाहिदा करून दिल्हा जाईल, त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद.

२

रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(५) सचीव.

136. It was agreed at the treaty of Bassein concluded in the preceding year with the English that the Peshwa should hand over a territory worth Rs. 26 lacs to the English in consideration of the latter placing 6 battalions at his disposal. Pargana Urpad &c in Guzerath and Prant Sawnur &c in Karnatik worth in all Rs 26 lacs were accordingly made over to the English. A portion of this territory worth Rs. 1916000 was now with the consent of the English taken back by Government. and in lien there of a portion of the territory in Bundelkhand surrendered by Ali Bahadar &c. worth Rs. 1916000 was given to them in Saranjam.

A. D. 1803-1804,

Additional territory in Bundelkhand was also given for the following reasons

Worth Rs. 50000. In consideration of the revenue realized from pargana Urpad taken back by Government.

750000 In cousideration of the English keeping 1000 Sawars for service under the Peshwa.

500000 In consideration of the English agreeing to pay the expenses of 5000 men entertained by the Peshwa for assisting the English till the close of the war.

ऊन दिल्हे होते. त्यांपैकीं परगणें उरपाड प्रांत गुजराथ व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल येकुणीस लक्ष सोळा हजार रुपयांचे बेरजेचे दरोबस्त कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विचारे पुणीयाचे मुक्कामीं सरकारांत माघारे घेतले. त्याचे मोबदला व जाजतीकलमाबद्दल मिळोन प्रांत बुंदेलखंडाकडे अलीबहादर यांणीं नवा मुल्ख सरकारांत सोडविला त्यांपैकीं कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडे सरंजामास द्यावयाचा करारांत आला त्या प्रमाणें बेरीज रुपये

१९१६००० पलटणचे खर्चास वसईचे मुक्कामीं सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचा मुल्ख सरकारांतून लाऊन दिल्हा त्यांपैकीं कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विचारें परगणें उरपाड प्रांत गुजराथ व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल दरोबस्त सरकारांत घेतले. त्यांचे मोबदला पलटणचे खर्चास मुल्ख लाऊन द्यावयाची बेरीज रुपये.

१७००००० हल्लीं जाजती कलमाबद्दल बेरीज रुपये

९०००० परगणें उरपाड प्रांत गुजराथ हा महाल सरकारांत माघारा घेतला त्यास उरपाडचे वसुलामुळें जाजती मुल्ख द्यावयाचा तो. रुपये.

७९०००० तुरकस्वार १००० येक हजार जदीद कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडील सरकारांत चाकरीस ठेवावें. त्यांचे बेगमबिद्दल सालीना कूलतनखा सदरहू येक हजार स्वारांची चाकरीची नेमणूक सरकारांतून होईल तेथें करावी. त्याबद्दल रुपये.

५००००० वसई मुक्कामीं तहनामा जाहला त्यांत पंधरावें कलमांत लिहिलें आहे कीं, लढाईचे प्रसंगीं दहा हजार स्वार व सहा हजार पायदळ वगैरे सरंजाम लढाईस द्यावा त्याही वरता मगदूर करार करितात कीं ह्या फौजेशिवाय तामगदुर दारुगोळी सरंजाम देऊं, असें कलमांत आहे. तें महकूब होऊन हल्लीं करार ठरला कीं, पांच हजार फौज व तीन हजार पायदळ कुंपणी इंग्रज बहादुर यांचे कुमकेस द्यावें, याचा तनखा सरकारांतून पावत जाईल. या खेरीज मसलत अखेर पावेतों पांच हजार मराठी फौज सरकारांत चाकरीस ठेवावी. त्याचा तनखा कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारांतून देत जावा. त्याजबद्दल मुल्ख द्यावयाचा तो.

(The 15th article in the treaty of Bassin which stipuleted that the Peshwa should send 10000 Sawars and 6000 soldiers for assistance to the English in times of war was cancelled and he was now to furnish only 5000 Sawars and 3000 soldiers.)

400000 In consideration of the expenses required for restoring peace and order in Bundelkhand.

Rs. 1700000

Thd total value of the territory surrendered was Rs. 3616000.

४००००० बुंदेलखंडाकडील प्रांतांत शरारतवाले बखेडा करून मुलखाची खराबी करितात. त्यास तंबी करून मुलखाची असुदी व अबादी करावी. त्याचे खर्चाबद्दल मुल्ख द्यावयाचा तो रुपये.

१७०००००

३६१६०००

येकूण छतीस लक्ष सोळा हजार रुपयांचे बेरजेचे महाल कुंपणी इंग्रज बहादूर यांजकडे नेमून देविले असेत, तरी सदरहु रुपयांचे महाल यांचे हवालीं करणें ह्मणोन कारकून दिंमत अली बहादर यांचें नांवे सनद १.

. परवानगीरुवरु.

जमा जामदारखाना.

१३७।१६८ कमावीस भेट राजश्री खासा यांस, बरहुकूम कर्नेल कलोष (क्लोज) वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं इदीची मिठाई पाठविली त्याज बरोबर सनंगें पाठविलीं, तीं गुजारत येसाजी पवार सिंदा पोरगा. सनंगें येकूण किंमत रुपये.

इ० स० १८०३-०४
आर्बा मया तैन व अलफ.
रमजान २०.

१५ तिवट पैठणी.
२०० शालफर्द चार १०० प्रमाणें.
४० शेले साधे, बंगाली चार २० प्रमाणें.
१२५ किनखाप काळा १ येकूण.

३८०

१३८।१६९. समुद्रांत फरासी जाहजांशीं व इंग्रजी जाहाजांशीं लढाई होऊन फरासी जाहाज इंग्रजांनीं शिकस्त करून मुंबईस धरून आणलें, त्याचा झाडा घेतां तीन सरदार फरासीसी बंदर संगमेश्वर तालुके रत्नागिरी येथें उतरून खुशकीवर आले आहेत, ते सरकारांत आणावें, म्हणोन खुषरोजी मोदी दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं हुजूर विदित केलें. त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी फरासीसाकडील तीन असामी बंदर मजकुरीं उतरले अस-

इ० स० १८०३-०४.
आर्बा मयातैन व अलफ
सवाल १४.

---

137. Presents were received fram a colonei agent of the English at Calcutta on account of Christmas.
A. D. 1808-1804.

138. There was a fight between an English and a French vessal at sea. The French vessal was captured by the Englisd and brought to Bombay. It transpired that three French officers of the ship had got down at port Sangameshwar in Taluka Ratnagiri. Khushroji Modi therefore requested on behalf of the English that they should be captured and brought before Government. The Mamlatdar of Ratnagiri was directed to trace them and to send them to Poona.
A. D. 1803-1804.

त्यास यांची तुम्ही वाजवी चौकशी करून तीन असामी तेथें असल्यास बंदोबस्तानें हुजूर पोहोंचवून देणें, तेथून निघोन गेले असल्यास कोणीकडे गेले याचा पत्ता लागेल तेथवर लावून हुजूर विनंति पत्र लिहिणें. म्हणोन नारो रामचंद्र मामलेदार तालुके रत्नागिरी यांचें नांवें

सनद १.

रसानगीयादी.

१३९।१७२. बद्दल देणें, पर दरबार खर्च, वसली (वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर यांस हिराबागेंत मेजवानी केली, सबब सनगें दिल्हीं त्यांची किंमत गुजारत खंडेराव निळकंठ. रुपये.

इ० स० १८०३-०४
आर्बा मयातैन व अलफ
जिल्हेज २२.

रसानगीयादी.

४८५ जनरल वसली यांस.

२९०	शालजोडी केशरी	१	येकूण.
१५०	किनखाप	१.	
४९	मलमली शेले	२	दर २२॥ प्रमाणें.
४८९		४	

३७६॥ मेस्तर वायब,

२६२॥	शालजोडी दुसी	१.	
९०	किनखाप	१.	
२४	मलमली शेले	२	दर १२ प्रमाणें.
३७६॥		४	

३६१॥ कर्णेल कोलमन.

२६२॥	शालजोडी सफेत	१.	
७५	किनखाप	१.	
२४	मलमली शेले	२	दर १२.
३६१॥		४.	

१८२ मेस्तर गुडविन.

१०५	शालजोडी	१.	
५३	किनखाप	१.	
२४	मलमली शेले	२	दर १२.
१८२		४	

139. General Wellesly in the service of the English at Calcatta was given a feast by the Peshwa in Hirabag at Poona. Presents of clothes were made to the following persons on that occasion. The names of the English afficers to whom presents were made are given. Tbe total value of the presents was Rs. 3288.

A. D. 1803-1804.

२०६||| मेजर इसदन. (इसदेल).

११२||	शालजोडी.	१.
७०	किनखाप.	१.
२४|	मलमली शेले.	२ दर १२८=.
२०६|||		४.

१७४|||= कपतान बाकनेल.

१०५	शालजोडी हिरवी.	१.
५३	किनखाप.	१.
१६|||=	महमुद्या दर ८|≈. प्रमाणें सनगें	२.
१७४|||=		४.

१८०|||= लपटन (लेफटेनेंट) ए. यंग.

११०	शालजोडी.	१.
५४	किनखाप.	१.
१६|||=	महमुद्या.	२ दर ८|≡.
१८०|||=		४.

१३३||| कपतान नाकस. (नाक्स).

६५	शालजोडी.	१.
५३	किनखाप.	१.
१५|||	महमुद्या.	
	८|≡ प्रत.	१.
	७|- प्रत.	१.
	१५|||	
१३३|||		४.

१३४ कपतान कॉमन.

६५	शालजोडी.	१.
५५	किनखाप.	१.
१४	महमुद्या.	२ दर ७.
१३४		४.

१३७|| डाकतर वेल्स.

६५	शालजोडी,	१.

९९ किनखाप. १.
१७॥ महमुद्या. २.
९. ८॥.
१३७॥ ४.

१३७॥= मेस्तर इसकरल.
६९ शालजोडी. १.
९६ किनखाप. १.
१६॥= महमुद्या. २ दर ८।≡.
१३७॥= ४.

१२८॥= मेस्तर कलोस. (क्लोज).
७५ शालजोडी. १.
३५ किनखाप. १.
१८॥= महमुद्या. २ दर.
१७॥=.
१०॥.
१२८॥= ४.

१३६॥ मेस्तर बिलगन.
६५ शालजोडी. १.
४९ किनखाप. १.
२२॥ महमुद्या. २.
११ ११॥.
१३६॥ ४.

२४७॥ गोविंदराव.
१४० शालजोडी. १.
२० तिवट. १.
७५॥ किनखाप. १.
१२ मुहमुदी -॥-
२४७॥ ३॥.

१७९ आपाराव.
१५ तिवट पैठणी. १.
१२९ शालजोडी. १.

३० किनखाप -॥·
९ महमुदी १

१७९ ३॥

४९॥ रामराव
१३॥ तिवट पैठणी १
३६ शेला जाफरखानी १

४९॥ २

१६॥= सुबराव
१२॥≡ तिवट पैठणी
२४ जाफरखानी

३६॥≡

३२८८।≡ ६३

पैकीं वजा मखलासी समयीं सूट ।≡ बाकी ३२८८ रुपये.
तीन हजार दोनशे अठ्यायशी रुपये, परगणें जंबुसर प्रांत गुजराथ निसबत नरसिंगराव कृष्ण यांजकडे सालमजकूरचे रसदेचा ऐवज येणें त्यापैकीं चैत्र शुद्ध पौर्णिमेचे हप्तयापैकीं देविले.

१४०।१७६. नारायणराव रामचंद्र यांस सरकारांतून कलकत्यास कामगारीस रवाना केलें आहेत, त्यांजबरोबर तुम्हांकडील सरंजामी फौजेपैकीं स्वार असामी येकशें देविले असेत, तरी येकशें स्वार चांगले यांचे दरमाहाची बेगमी करून मशारनिल्हेचे हवालीं करून देऊन, हे कामगिरीहून माघारे येत तोंपावेतों लिहिल्याप्रमाणें येकशें स्वार त्यांजवळ असो देणें. म्हणोन रघुनाथराव बळवंत यांस सनद १.

इ० स० १८०३-०४
आर्बा मयातैन व अलफ,
सफर १९

रसानगी यादी.

१४१।१७७. १२२२ बद्दल. वसली जनराल (जनरल वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर यांचे डेऱ्यास स्वारी गेली, तेथें सनंगें आलीं तें छ २४ सफर.

इ० स० १८०३।०४
आर्बा मयातैन व अलफ
सफर २५.

८९२॥ राजश्री बाबासाहेब यांस. जमा गुजारत त्रिंबकजी डेंगळे हस्तें राघोजी गोरा. रुपये.

A. D. 1803-1804. 140. Narayanrao Ramchandra was sent on some mission to Calcutta.

A. D. 1803-1804. 141. Presents were received from General Wellesley on the occasion of the Peshwa's visit to him in his tent.

२० तिवट पैठणी. १.
२०० शालफर्द २ दर १०० प्रमाणें रुपये.
७० शेले बंगाली कोरे २.

३० प्रत	१.
४० प्रत	१.
७०	२.

५० शेले साधे धुवट बंगाली बुटेदार २ दर २५ प्रमाणें.
३०० किनखाप. १.
२०० जामेवार जरी सफेद. १.

८४० ९

५२॥ सकलाद दुरंगी लाल काळी गज ३॥.
येकूण दर गजीं १५ रुपये प्रमाणें.

८९२॥ गज ३॥ ९

४३६॥ राजश्री आपासाहेब यांस. जमा गुजारत रामजी जोरी खिजमतगार, सनंगें येकूण किंमत. रुपये.
१२ तिवट पैठणी. १.
२०० शालफर्द २ दर १०० प्रमाणें रुपये.
१७९ किनखाप भरगची लाल. १
३२ शेले साधे. रुपये.

७ प्रत	१
२५ प्रत	१
३२	२

४१९

१७॥ सकलाद जुबर्दी, गज ३॥.
दरगजी ५ प्रमाणें.

४३६॥ ३॥ ६

१३२९ ७ १५

रत्नशाळेपैकीं.

१४२।१८१. देणें. दिमंत इंग्रज कलकत्तेकर यांस निरोप समयीं विद्यमान खासा.
इ. स. १८०४।०५ सदरेस रुबरु पाहून दिल्हे. किंमत. रुपये.
समस मया तैन व अलफ
रबिलावल १४

१३७८।- ऐन.
८४४॥-। सवाई.

४२२२॥=।

जडाव दागिने.

१ जनराल वेसली (जनरल वेलस्ली) यांस. किंमत रुपये.
२७११॥- ऐन.
६७७॥=। सवाई.

३३८९॥-।-

येकूण दागिने.

१ शिरपेंच घाट साधा, तीन फुलांचा किरणाचा, बाबद नरसिंह खंडेरावपैकीं.

रुपये.

४५० ऐन.
११२॥ सवाई.

५६२॥

शहत.

७९ हिरे, हिरकण्या.
४ माणकें.
१ पाचमणी लोलक.

८४

१ जगो घाट साधा, बद्दल खरेदी गोपाळशेट सोनारपैकीं
किंमत रुपये.
४६० ऐन.
११५ सवाई.

५७५

शहत

A. D. 1804-1805. 142. Jewelry worth Rs. 4222 was presented to General Wellesley and others at the time of their farewell visit to the Peshwa.

७४ हिरे हिरकण्या मदनाईकसुद्धां.
१ मोतीं लोलक.

७५

१ तुरा मोत्यांचा, बाबद खरेदी वजीरचंद जोहरी पैकीं छ मजकुरीं खरेदी केला. किंमत रुपये.
६८९ ऐन.
१७२। सवाई.

८६१।

४५९ मोत्यें वजन टांक १२॥ ४।‍- चव ११५॥‍-॥ येकूण सर १७ दर सरास २७ प्रमाणें दाणे.
१ दांडीरुपें मुलामा सोनें, व फुदण्यास मुकेस (?).

४६०

१ कंठीं मोत्यांची, बद्दल सखाराम घाटगे पैकीं किंमत रुपये.
९१७॥‍- ऐन.
२२९।=। सवाई.

११४७।.।

शहत.

१० धुगधुगी, घाट साधा शहत.

सुमार.

९ हिरे व हिरकण्या.
१ मोतीं लोलक.

१०

५० मोतीं माळेस वजन टांक ५८॥. चव १६७॥‍- एकूण.

६०

१ आंगठी हिऱ्याची, घाट मिनेगार मिना हिरवा व निळा व सफेद, बाबद भेट सावळ भक्ति साहुकारपैकीं, किंमत रुपये.
१९५ ऐन.
४८॥ सवाई.

२४३॥.

शहत.

१ हिरा, अष्टपैलु, वजन रती १॥ एकूण.
० सोनें.
१
५

२ मेजर मालकम यास. किंमत रुपये.
६६६॥ ऐन.
१६६॥= सवाई.
८३३८=
दागीने.

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा रुप्याचें किर्णाचा. बद्दल दादाजी व्यंकाजी साहुकार पैकीं किंमत रुपये.
४२५ ऐन.
१०६। सवाई.
५३१।
शहत.

९३ हिरे व हिरकण्या.
५ माणकें.
४ पातास (पानास)
१ लोलक
५
९८

१ जगो घाट साधा, बद्दल वेंकाजी दादाजी साहुकारपैकीं किंमत रुपये.
२४१॥ ऐन.
६०।= सवाई.
३०१॥।=
शहत.

५८ हिरे, हिरकण्या, मदनाईक, सुद्धां

१ पाचमणी लोलक रती २।-

५९

२

७

१४३।१८४ जनरल वलजली (वेलस्ली) बाहादूर यांणीं बापूजी गणेश गोखले यांजकडे तालुके सावनूर वगैरे सरकारचीं ठाणीं गैर सनदी होतीं, तीं पंधरा दिवसांत खालतीं करून तुमचे स्वाधीन करावीं, व तुह्मांकडून रुपये ३३०००० तीन लक्ष तीस हजार रुपये दीडा वर्षांचे मुदतीनें मशार निल्हेस देविले, या मजकुराचे ठरावाची याद तुमची व गोखले यांची जनराल यांचे विद्यमानें जाहली, तिची नक्कल जनरलांनी कर्नल कलोश वकील दिंमत कुंपणी इंग्रज बहादुर यांजकडे पाठविली, वकील महसुफ यांणीं सरकारांत गुजरविली त्यावरून समजलें. त्यास गोखले यांणीं कशाचा ऐवज जनरलांस समजाऊन तुह्मांकडून घेतला, हा जाबसाल गोखले पुणीयास आलीयावर मनास आणितां येईल. जनराल बहादुर यांणीं पंधरा दिवसांत गोखले यांजकडून सावनूर वगैरे ठाणीं तुमचे स्वाधीन करवून तीन लक्ष तीस हजार रुपये तुह्मांकडून दीड वर्षांचे मुदतीनें गोखले यांस देविले त्याप्रमाणें पंधरा दिवसांचे आंत सावनूर वगैरे ठाणीं तुम्हीं आपले स्वाधीन करून घेऊन तीन लक्ष तीस हजार रुपये गोखले यांणीं ज्या सावकारास वगैरे देविले असतील, त्यांची निशा दीड वर्षांचे मुदतीनें करून देणें. म्हणोन केशवराव बाळकृष्ण मामलेदार सरसुभा प्रांत कर्नाटक याचें नांवें.

इ० स० १८०४-०५
खमस मया तैन व अलफ.
रबिलाखर १९.

सनद १.

रसानगीयादी.

१४४।१९० हरि उद्धव यांस सरकारांतून वकिलीचें कामाकरितां कलकत्त्यास पाठविले आहेत. त्यास मशारनिल्हे तेथें पोहोंचल्यावर त्यास वकीली संबंधी माहितगारी आठा चौरोजांत करून देऊन तुम्हीं निघोन हुजूर येणें ह्मणोन लाला गुलाबराय याचे नांवें चिटणीसी पत्र.

इ० स० १८०४-०५
खमस, मया तैन, व अलफ.
रमजान २६.

143. It was settled through General Wellesly that Bapuji Ganesh Gokhle should restore to Keshavrao Balkrishna Mamlatdar Sirsubha of Karnatic, Talooka Sawanoor and other Government territory unauthorizedly held by him and that Keshavrao should pay to Bapuji Gokhle Rs. 330000 in a year and a half. An agreement was drawn up to the above effect and a copy of it was sent by General Wellesly to the English agent at Poona, who sent it on to Government. Government had no information as to why the sum of Rs. 330000 was demanded by Gokhle. Inquiries were to be made on the point on Gokhle's arrival at Poona. In the meanwhile the agreement was ordered to be given effect to.

A. D. 1804-1805.

144. Hari Udhav was appointed Government agent at Calcutta in place of Lala Gulabray. The latter was directed to give the necessary information regarding the duties of the office to Hari Udhav in a week and to repair to Poona.

A. D. 1804-1805.

१४५।१९३ देणें, सार्जे मिसमिकीन रिकार्डर कोडदचा (कोर्टाचा) मुखत्यार दिमत इंग्रज कलकत्तेकर मुंबईस राहतात, ते वाड्यांत भेटीस आले सबब विद्यमान राजश्री बाबासाहेब, रुबरु पाहून दिल्हे. ते किंमत. रुपये.

इ० स० १८०५–०६ सीत मया तैन व अलफ. सवाल ७.

१४७९८~ ऐन किंमत.
३६९।।।-। सवाई.

१८४८।।।-।

जडाव दागीने.

१ शिरपेंच, घाट साधा तीन फुलांचा किर्णाचा, बदल शामराव लक्ष्मण रास्ते पैकीं. किंमत. रुपये.

२३० ऐन किंमत.
५७।। सवाई.

२८७।।

८२ हिरे व हिरकण्या.
१ माणिक मर्दनाईक.
१ मोती लोलक.

८४

१ जगो, घाटसाधा, बदल खंडेराव निळकंठ रास्ते पैकीं, किंमत. रुपये.

३२५ ऐन किंमत.
८१। सवाई.

४०६।

६८ हिरे व हिरकण्या.
१ मोती लोलक.

६९

१ कंठी मोत्यांची, बदल बापूजी गणेश गोखले पैकीं, किंमत. रुपये.

९२४८~ ऐन किंमत.
२३११८। सवाई.

११५९८~।.

---

145. An English judge at Bombay having came to pay a visit to the Peshwa, A present of jewelry worth of Rs. 1848 was made to him.
A. D. 1805-1806.

१० धुगधुगी घाट साधा, शहत.
९ हिरे.
१ मोती लोलक.

१०
६० मोत्यें माळेस वजन टांक १॥१॥

७०

३

१४६।१९७ कुंपणी इंग्रज बहादूर यांचे विद्यमानें सालसंबंधी इस्तकबिल मार्गशीर्ष मास सालमजकूर सनसबा मयातैनापासून दोनलक्ष रुपये तुमचे कुलबाब खर्चास द्यावयाचे ठरले. त्यापैकीं रुपये.

इ० स० १८०६।०७ सबा मयातैन व अलफ. मोहरम २

९०००० मार्गशीर्षमासचे हप्त्याचे पेशजी देविले ते.
९०००० फाल्गूनमासचे हप्त्याचे हल्लीं देविले ते.

१०००००

येकूण येक लक्ष रुपये चांदवड देविले असेत, घेऊन पावली याचा जाब देणें, ह्मणोन चिरंजीव राजश्री चिमणाजी रघुनाथ यांचेनावें फडणीसी पत्र १.

१४७।१९९ देणें, कर्णेल कलोष वकील दिंमत इंग्रज कलकत्तेकर, यांस राजश्री बाबा साहेब यांचे लग्नाचा परत आहेर हिराबागोत केला. त्याजवर रुबरु पाहून दिल्हे. ते जडाव बाबत सदाशिव माणकेश्वर पैकीं, छ २८रविलावल सन सबा मयातैन आहेरावर आले. ते किंमत

इ० स० १८०६।०७ सबा, मयातैन व अलफ साबान २६

१०५२।≡॥ रुपये.

जडावदागीनें

१ शिरपेंच, धाट साधा तीन फुलांचा किंमत रुपये २९०.

शहत

५५ हिरे व हिरकण्या किंमत रुपये २४३.
१ मोतीं लोलक मजीद. रुपये १२.
० सोनें व अजुरा किंमत रुपये ३५.

५६

146. It was agreed through the agency of the English that Government should pay annually Rs. 2 Lacs to Chimnaji Raghunath from the current year.

A. D. 1806-1807.

147. A return present consisting of jewelry was made in Hirabag to the English agent at Poona on the occasion of the Peshwa's marriage.

A. D. 1806-1807.

१ जगो, घाट साधा किंमत. रुपये ३१५

शहात.

५९ हिरे व हिरकण्या, किंमत रुपये २७१॥.
१ मोतीं लोलक, रुपये ८
० सोनें, व अज्जुरा किंमत रुपये. १४॥

६०

१ कंठी मोत्यांची, किंमत रुपये १४४७।=॥.

शहात.

१० धुगधुगी, घाट साधा किंमत रुपये ८५

शहत.

९ हिरे.
१ मोतीं लोलक. रुपये १५.
सोने व अज्जुरा. रुपये ७॥.

१०

४८ मोत्यें, माळेस किंमत १३६२।=॥ रुपये.

५८

३

१४८।२०२ देणें, खुसरोजी मोदी दिमत इंग्रजकलकत्तेकर यांस निरोप समयीं, विद्यमान राजश्री बाबासाहेब यांणीं सदाशिव रघुनाथ गद्रे यांचे वाड्यांत रुबरु पाहून दिला. तो शिरपेंच, घाटसाधा तीन फुलांचा बाबत नरसिंह खंडेराव पैकीं छ २८ रविलावल सबा मयातैनात आला. तो किंमत रुपये २२९.

इ० स० १८०६–७
सबा मयातैन व अलफ
मोहरम ८

शहत

५० हिरे व हिरकण्या.
६ माणकें चुणी.
१ पाचमदनाईक.
१ मोतीं लोलक.
० सोनें व अज्जुरा.

५८

जडावडागिना,

148. A present of jewelry was made to Khushroji Modi in the service of the English on the occasion of his farewell visit to the Peshwa.

A. D. 1806-1807.

१४९।२२४ देणें, जनरेल चंपनी, (चापमन ?) दिमत इंग्रज कलकत्तेकर,
इ० स० १८०९–१० अशर मयातैन व अलफ सवाल १८
शिरूरचे लष्करांतून येऊन मुंबईस जातात, सबब यांस हिराबागांत मेजवानी केली ते समयीं खाशांनीं रुबरु पाहून दिल्हें. छ १४ रोज किंमत रुपये.

१२८३। ऐन किंमत.
३२०॥।- सवाई.
१६०४८-

जडाव दागिने.

१ शिरपेंच, घाट साधा, सिदोजीराव निंबाळकर सर लष्कर यांजपैकीं आहेरावर आला तो, छ २८ रबिलावल, सन सबा मयातैन किंमत. रुपये.

२७५ ऐन किंमत.
६८॥ सवाई.
३४३॥।-

शहत

७ पाचा व किर्डे रुपये २२.
५८ हिरे व हिरकण्या किंमत रुपये २००.
१ मोतीं लोलक, किंमत रुपये १८.
० सोनें व अज़ुरा रुपये ३५.
६६

१ जगो घाट साधा, बदल लाट ईलस दिमत इंग्रज विलायतकर यांजपैकीं, छ १५ रजब सन खमस मयातैन, किंमत रुपये.

४०६॥।- ऐन किंमत.
१०१॥= सवाई.
५०८॥

शहत.

४५ हिरे व हिरकण्या, किंमत २७०॥।- रुपये.
१८ पाचा व किर्डे, किंमत ७९॥= रुपये.
० सोनें व अज़ुरा, रुपये ५६।=
६३

149. An English in the service of the English at Calcutta who had come from the camp at Sirur and was proceding to Bombay was given a feast at Hirabag and presented with jewels worth Rs. 1604.
A. D. 1809-1810.

१ कंठी मोत्यांची, बद्दल रामचंद्र परशुराम यांजपैकीं छ. ८ रबिलावल सनसब मयातैन, आहेरावर आली ती किंमत रुपये.

६०१।। ऐन किंमत.
१५०।= सवाई.

७५१।।।=

शहत.

८ धुगधुगी, घाटसाधा. किंमत रुपये.

शहत

७ हिरे व हिरकण्या.
१ मोतीं लोलक.

८

६४ मोत्यें माळेस.

७२

३

१५०।२३२ इंग्रज कलकत्तेकर यांजकडील खासगत जागाचे (जाहजाचे?) कामाकरितां कारखानदार, सरकारची तिजाई व जकात वगैरे बाब शिरस्तेप्रमाणें जी असेल ती देऊन, लांकडे सरकारकाराखान्याकडे घ्यावयाची असतील तीं खेरीजकरून, वांकडीं तिकडीं लांकडें सरकारचे उपयोगीं नसतील तीं, जो संतोषानें विकत देईल, त्याजपासून उदम्यास व रयतेस कोणेविसी उपद्रव न देतां, सालमजकूर सन इसने अशर मयातैनांत, येकसाला खुषखेरदी करावयासी तालुके वसई येथें पाठविणार त्यास अडथळा होऊं नये. येविसी तालुके मजकूर येथील मामलेदार यांस ताकीद जाहली पाहिजे, ह्मणोन मेस्तर अलपीष्टण वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर यांणीं हुजूर विनंती केली. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी इंग्रज कलकत्तेकर यांजकडील खाजगत जहाजाचे कामाकरितां कारखानदारास सरकारची तिजाई व जकात वगैरेबाब शिरस्तेप्रमाणें जी असेल ती देऊन व लांकडें सरकार कारखान्याकडे घ्यावयाची असतील तीं खेरीज करून वांकडी तिकडीं लांकडे सरकारचे उपयोगीं नसतील तीं संतोषानें विकत देईल, त्याजपासून उदम्यास व रयतेस कोणाविसी उपद्रव न देतां

इ. स. १८१०।११
इहिदे अशर मयातैन व अलफ
जमादिलावल २

150. At the request of Mr. Elphinstone agent of the English at Calctta, the Mamlatdar of Bassein was directed to permit the ryots and merchants to sell to the English wood not useful for Government purposes in the current year. The wood was required by the English for their naval workshop.

A. D. 1810-11.

साळमजकूर सन इसने अशरमयातैनांत येकसाल खुष खरेदी करून ते आपले तालुक्यांत नेतलि त्यांस नेऊं देणें. ह्मणोन परशुराम खंडेराव मामलेदार तर्फ वसई यांस सनद १.

रसानगीयादी.

१५१।२४६ इंग्रज कलकत्तेकर यांजकडील लष्कर त्या प्रांतीं आहे. तिकडे घोड्यांस चंदीस हरभरे विकत मिळत नाहींत. उमरखेड माहालांत हरभरे मिळतात याजकरितां परगणें मजकुरीं हरभरे खुषखेरदी करून दहा हजार पर्यंत बैल भरून लष्करांत नेऊन त्याची जकात सालमजकुरीं एक साला मात्र माफ केली पाहिजे, ह्मणून मेस्तर अलपष्टिन, वकील इंग्रजाकडील यांणी हुजूर विनंती केली. त्यास इंग्रजाकडील लष्कर त्या प्रांती आहे तेथें घोड्यास चंदीस हरभरे विकत मिळत नसल्यास उमरखेड माहालांत हरभरे हे खासगत खुष खेरदी करून दाहाहजार बैलापैकीं जे बैल भरून सालमजकूरीं येकसाला लष्करांत नेतील. त्यास परगणें मजकूरचा सालाबाद जकातीचा ऐवज जमेस येतो त्यांत नुकसान न येतां सदरहु बैलापैकीं जे बैल भरून जातील त्या जकातीविसी साल मजकूरी येक साला मात्र तगादा न करणें. ह्मणून सदाशिव माधवराव कमाविसदार परगणें उमरखेड यांचे नांवें. सनद १.

इ० स० १८१४।१८१५.
खमस अशर मयातैन व अलफ
सवाल १२

१५२।२४८ गोपाळ नागनाथ यांस कीं, सरकारांतून तुमचे तीर्थरूप नागो शिवराम चिनापटणास वकीलींचे कामावर होते ते मृत्यु पावले. सबब हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी तुम्ही सरकार लक्ष एकनिष्ठपणें ठेऊन गवरनर येलीयट (इलियट) दिमत इंग्रज कलकत्तेकर चिनापटणास आहेत त्यांजवळ राहून तेथील बातमी वरचेवर लिहित जाणे. म्हणोन चिटणीसीपत्र १.

इ०स०१८१६।१७
सबाअशर मया तैन व
अलफ जिल्काद २०

१५३।२५० कुंपणी इंग्रज बहादूर याजकडील कारकून किल्ले महिमानगड नजीक कोंडी घाटाजवळ अखबरेचे कामावर आहे; त्याजकडील चार असामी जासूद किल्लेमजकुरचे मामलेदार यांणी पाहऱ्यांत बसऊन कारकुनास कैद करावयाकरितां लोक पाठविले, म्हणोन हुजूर विदित

इ०स० १८१६।१८१७
सबा अशर मयातैन व अलफ
जमादिलावल २५

---

151. At the request of Mr. Elphinstone the Kamavisdar of Umarkhed was directed to allow the English to purchase gram for the army which was in that province as it was not procurable in the neighbouring district and to remit the duty on the removal of the gram to the extent of 10000 bulock loads.

A, D. 1814-15.

152. Nago Sivram agent at the court of the English Governor Chinapatan having died his son, Gopal Nagnath was appointed in his place and was directed to communicate news frequently to Government.

A. D. 1816-17.

153. A Carkoon was kept by the Englieh at Kondi ghat near Mahimangad for obtaining intelligance. His messengers were kept in confinement by the Government Kamavisdar and men were sent by him to arrest the karkun. The Kamavisdar was directed to release the messengers and to allow the karkun to remain at the Ghant for a year

A. D. 1816-17.

जाहलें त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी कुंपणी कडील जासूद पाहऱ्यांत तुम्ही ठेविले असल्यास व कारकुनास अटकावलेला असल्यास सोडून देणें. व अखबरीचें कामावर कारकून कोंडीघाटाजवळ राहतील त्यांस सालमजकुरीं येकसाला अडथळा न करणें. ह्मणोन आत्माराम लक्ष्मण कमाविसदार तालुके महिमानगड याचें नांवें सनद १.

रसानगीयाद.

राजकीय (ब) इतरमाहिती.

(२३) यूरोपांतील राष्ट्रें.

१५४।२६ कमाविस भेट, बाबद फिरंगी गोवेकर यांजकडील वकील विठ्ठल गोरक्ष घेऊन
इ. स. १७९६।९७ आले ते गुजारतहाय सनंगें येकूण. रुपये.
सबासेन मया व अलफ.
रमजान १.

३७३। राजश्री बाबासाहेब यांसी गुजारत माहादजी घुला खिजमतगार.

सनंगें येकूण रुपये.

२५० मुसेजरे.

२१० प्रत ३ दर ७०

४० प्रत, १

२५० ४

१२२ मखमल गज १७ ७/८ ३

दरगजी रुपये ७/८ २ प्रमाणें रुपये

१। जापता (तापता) सनंग ८-

३७३।. सनंगें गज

४८- १७८३

२३१। राजश्री अमृतरावसाहेब यांसी गुजारत कृष्णाजी काळा खिजमतगार.

सनंगें येकूण रुपये.

२०० मुसेजरे.

१४० प्रत २ दर ७०

६० प्रत १

२०० ३

३० गुलबादज १

A. D, 1796-97. 154. Present of clothes was received by Bajirao from the Portuguese of Goa.

१। तापता सनंग ४८

२३१। ४८८

६०४॥ सनंगें ८८९ गज १७८३

१५५।८३ फिरंगी गोवेकर यांस दमणचे सरंजामास सरकारांतून परगणें नगर हवेली प्रांत रामनगर तालुके वसई हा माहाल जकात व मोहतर्फा व शिंगशींगोटीसुद्धां दरोबस्त दिल्हा. त्याप्रमाणें त्यांजकडे चालत आहे. त्यास जकात फतेपूर येथील नाक्यास फिरंगी यांजकडील प्यादा बसवून आपले हिशाची जकात घेतात, ती गंभीरगडचे हिशापैकीं घेतात ह्मणोन मामलेदाराचा उपद्रव लागतो, व नाक्याच्या खटखटीकारितां जप्ती केली तेव्हां गुरें भांडीं व ऐवज मामलेदार यांनीं नेला, तो माघारा द्यावयाकरितां पेशजी सरसुभ्याहून सनद सादर झाली असतां दिल्हा नाहीं. ह्मणोन विठ्ठलराव गोरक्ष वकील यांनीं हुजूर विदित केलें. त्यावरून हे सनद तुह्मांस सादर केली असे तरी पेशजी सरकारची सनद सादर झाली आहे, त्याप्रमाणें चालविणें. नवीन दिकत न करणें. फतेपूरचे नाक्यावर फिरंगी आपला प्यादा बसवून आपल्या हिशाची जकात घेतात त्याप्रमाणें घेऊं देणें. जप्तीमुळें गुरें, भांडीं, व ऐवज घेतला असेल तो माघारा देणें. येविसी फिरोन बोभाट न येई तें करणें. म्हणोन वामनाजी हरि मामलेदार यांचें नांवें

इ. स. १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
साबान ४

सनद १.

रसानगीयादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

(२३) लहान लहान संस्थानें.

१५६।१७ रामचंद्र कृष्ण यांचे नांवें सनद कीं, राजे खंडणशाहा हटीयाराय, संस्थान ममडाई सरकार हांडे प्रांत नेमाड सुभा खानदेश यांजकडील दुर्गादास भवानी कारभारी यांणीं हुजूर येऊन विनंती केली कीं, राजे खंडणशाहा यांचे वडील बंधु राजे धाडशाहा, यांचें पुत्र राजे भारतशाहा यांचे नांवें संस्थान चालत असतां ते सन अर्बातिसेनांत मृत्यु

इ० स० १७९६–९७
सबातिसेन मया व अलफ
रविलाखर २

---

155. The Mahal of Nagar Haveli in prant Ramnagar in Taluka Bassein was given to the Portuguese of Goa, being the territory assigned for the expenses of Daman.

A. D. 1798-99.

156. Three villages belonging to Khandanshaha Raja Hatiyaray of Sansthan Mamdai in Sarkar Hande of Prant Nemad in Subha Khandesh having been wrongly appropriated by Ramchandra Krishna Bhuskute, the latter was directed to restore the villages to the former and Scindia Alija Bahadoor was instructed to see that the order was carried out.

A. D. 1796-97.

पावले. त्यास त्यांचे चुलते असतां राजे यांचें नकल जाहले. संस्थान चालवावयास कोणी नाहीं असें रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन संस्थान मजकुरची जप्ती करून घेतली, हें वर्तमान समजल्यानंतर राजे यांणीं आपल्यास हुजूर पाठविलें. आपण येऊन विनंति करून संस्थानचे जप्तीची मोकळीक करविली. ते समयीं भुसकुटे यांणीं संस्थानचा देहेझाडा सरकारांत समजाविला. त्यांत मौजे सामर्दा व मौजे उदराकछ तर्फ सौताडा व मौजे धुदकर्ण तर्फ जुनवाण्या येकूण तीन देहे आह्मांस इनाम दिल्हे आहेत, ह्मणोन मशारनिल्हे यांणीं समजाविलें. त्यास पेशजी सन सीत सीतेनांत पंचवीस हजार रुपयांचा सरंजाम आम्हांकडे ठेऊन वरकड सरकारांत घेतला, ते समयीं सरकारांतून आज्ञा जाहली कीं यांत कोणास पेशजीगांव इनाम असल्यास पुढें चालऊं नयेत. ह्मणोन त्याजवरून भुसकुटे यांणीं आपले नांवचा तहनामा शिक्यानिशीं लिहून दिला. त्यांत इनाम गांवांविशीचा कांहींएक दाखला नाहीं. असें असतां मशार निल्हे यांस गांवचा लोभ न सुटे सबब खांडव्याचे मुक्कामीं राजे यांजकडील रामजीभाई कारभारी यांजला त्यांणीं मनस्वी तसदी देऊन राजे यांजकडे कांहीं ऐवज नसतां पंचेचाळीस हजार रुपयांचा कागद राजे भारतशाहा यांचे नांवाचा लिहून घेऊन त्यांत सरहू तीन गांव गहाण लिहून घेतले, आणि गांवचा उपभोग करतात. येविशी आम्ही उद्योग करीत गेलों परंतु जबरदस्तीमुळें उपाय नाहीं. त्यास गहाणपत्राचे पूर्वींच भुसकुटे यांचे ऐवजाचा झाडून फडशा जाहला. त्यांचे वगैरे कागदपत्र बजिन्नस आह्मांपासीं आहेत, ते ध्यानास आणून आमचे गांव आह्मांकडे देविले पाहिजेत, व भुसकुटे यांणीं गांवांचा उपभोग केला आहे, तो ऐवज आमचा आह्मांस देविला पाहिजे. ह्मणोन त्याजवरून तुह्मांस येविसीचें कागदपत्र तुह्मांपाशीं काय असतील ते सरकारांत समजाविणें म्हणोन पुशिलें असतां इनामपत्राच्या नकला मात्र दाखविल्या, या शिवाय गहाणपत्र वगैरे हिशेबाचे कागदपत्र आह्मांपाशीं कांहींएक नाहींत. जळाले, दंग्यांत गेले, असें ह्मणतात. सबब राजे खंडणशाहा यांजपाशीं कागदपत्र पाहून पंचाईत मतें मनास आणितां तुमचा ऐवज राजे भारतशाहा यांजकडे येणें त्याचा झाडून फडशा गहाणपत्राचे पूर्वींच जाहला. त्याचे कागदपत्र बाजिन्नस आहेत. त्यांपैकीं चारशें अर्धा रुपयांचे पावतीचा मात्र दाखला नाहीं. असें असतां अलीकडे तुह्मीं गहाणपत्र रामजीभाई कारभारी यांजपासून राजे यांचे नांवें लिहून घेऊन सदरहू तीन गांवचें उत्पन्न घेतां हें अनान्वित दिसोन येतें. येविसीं कारभारी याचें पत्र बजिन्नस ते वेळचे आहे. त्यांत तुमचे गैर रीतीचें करण्याचा व बोलण्याचा मजकूर लिहिला आहे. सबब तुमचा ऐवज व गांवास गहाणाचा संबंध लागू होत नाहीं हल्लीं तुह्मीं गहाणपत्राचे ऐवजाचे भरण्याचा झाडा वगैरे हिशेब कांहींएक दाखवीत नाहीं. इनामपत्राच्या नकला मात्र दाखवितां त्यास तुह्मी जे गांव इनाम म्हणतां तेच गांव तुम्हीं गहाण लिहून घेतलें तेन्हां इनामाविषयीं संबंध राहिला नाहीं. कदाचित इनामपत्रेंहीं असल्यास बातल पडलीं असें सिद्ध होतें. याजमुळें सदरहू तीन गांवांविशीं तुमचा वारसा इनाम किंवा गहाण या दोहींतून एकही पोंचत नाहीं असें ठरलें. सबब देहेहाय मौजे सामर्दा व मौजे उदराकछ तर्फ सौताडा व

मौजे धुदकर्ण तर्फ जुणवण्या एकूण तीन गांव राजे यांजकडे सरकारांतून द्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदहू तीन गांव राजे यांचे दुमाला करून आजपर्यंत गांवचे उत्पन्नाचा ऐवज तुह्मीं घेतला आहे. तो माघारा राजे यांस देणें. ह्मणोन सनद.

दौलतराव शिंदे आलीजा बाहादर यांस सदरहू अन्वयें कीं, देहेहाय मजकूर राजे खंडणशाहा यांजकडे सरकारांतून द्यावयाचा करार करून रामचंद्र कृष्ण यांस गांवाविशी अलाहिदा सनद सादर केली आहे, तरी मशारनिल्हे राजे खंडणशाहा यांजकडे गांव द्यावयास दिक्कत करूं लागल्यास त्यांस ताकीद करून गांव राजे यांचे स्वाधीन करून गांवचा मागील वसूल घेतला आहे तो माघारे देवविणें ह्मणोन. सनद.

२

रसानगी यादी.

१५७।१८. मोकदम देहहाय, संस्थान ममडाई, सरकार हांडे, प्रांत नेमाड सुभा खानदेश, यांचे नांवें सनद कीं, देहे व जकातीचें नाकें बि- तपसील. कितादेहे. कितादेहे.

इ. स. १७९६।९७. सबा तिसेन मया व अलफ रबिलाखर २.

× × × ×

येकूण देहे ब्यांणव व जकात नाकें राजे खंडणशाहा हटीयाराय संस्थान मजकूर यांचे वडील बंधु राजे धाडशाहा, यांचे पुत्र राजे भारतशाहा यांचे नांवें संस्थान व देदेहाय जकातीचाअंमल सुद्धां चालत होते. त्यास ते सन अर्बा तिसेनांत मृत्यु पावले. त्यांस त्यांचे चुलते असतां राजे यांचें नक्कल जाहालें, संस्थान चालवावयास कोणी नाहीं, असें रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन संस्थानाची जप्ती करून घेतली. तेव्हां राजे यांनीं आपलेकडील दुर्गादास भवानी हुजूर पाठवून जप्तीची मोकळीक करावयाविसीं विनंती केली. त्याजवरून सन अर्बा तिसेनांत संस्थानाचे जप्तीची मोकळीक केली, परंतु राजे खंडणशाहा यांचे नांवें संस्थान करार जाहालें नव्हतें. सबब हल्लीं संस्थान मजकूर व संस्थानसंबंधें सरंजाम पंचवीस हजार रुपयांचा तहनामा सन सीतसीतेनांत करून दिल्हा आहे त्याप्रमाणें यांचे नांवें करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी देहेहाय ब्यांणव येथील अंमल व जकात नाकें येथील जकातीचा अंमल सदरहूप्रमाणें राजे यांजकडे रुजू होऊन सुरळीत देत जाणें म्हणोन. सनद

157. Raje Bharat Shah son of Raje Dhadshah of Sansthan Hatyaray died in A. D. 1793-94 Ramchandra Krishna Bhuskute represented that the Raja had left no heirs and the Sansthan was attached. The deceased had however a brother named Raje Khandunshah who urged his claim to the Sansthan and attachment therefore removed in the same year. A formal Sanad conferring the Sansthan and the Saranjam worth Rs. 25000 attached to it as agreed upon in A. D. 1765-66 was now issued, and Khandunshah was exhorted to act loyally towards Government.

A. D. 1796-97.

राजे खंडणशाहा हटीयाराय संस्थान ममडाई यांस कीं, संस्थान मजकूर व संस्थानसंबंधें सरंजाम तुमचे नांवें सदरहूप्रमाणें करार करून दिल्हा असे. तरी संस्थानाची सरकार लक्ष राखोन वहिवाट करीत जाणें. म्हणोन सनद.

२

रसानगी यादी.

१९८।८९. विक्रमशाहा राजे संस्थान जवार यांचे तीर्थरूप पतंगशाहा राजे यांजकडे संस्थान आहे. त्यास ते मृत्यु पावले सबब तुमचे नांवें संस्थान पेशजीप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी तुम्ही सरकार लक्षांत राहून संस्थानाचा बंदोवस्त करून सुखरूप राहणें ह्मणोन मशारनिल्हे यांचे नांवें सनद १.

इ. स. १७९८।९९.
तिसा तिसेन मया व अलफ
सवाल २४.

येविसी सदरहू अन्वयें पांडुरंग धोंडाजी यांस पत्र कीं, विक्रमशाहा राजे संस्थान जवार यांचे नांवें संस्थान पेशजीप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी हरएकविसी संस्थानचा उपराळा तुम्ही पेशजीपासून करीत आला त्याप्रमाणें करीत जाणें. ह्मणोन चिटणीसी पत्र.

२

रसानगी यादी.

१९९।९० कृष्णशाहा जवारकर यांचा पुत्र याजपासून कांहीं अंतर जाहलें, सबब त्यास वसईस सरदारी करून नेहमीं सरकार चाकरी करून असावें, बाहेर येऊं नये. ह्मणोन गणपतराव जिवाजी मामलेदार तालुके वसई यांचे नांवें चिटणीसी पत्र १.

१७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
सवाल २४

१६०।१०३ मोहनसिंग राजे संस्थान बडवाणी यांचें नांवें सनद कीं, तुम्हांकडील परमानंद मल्हार कारकून यांणीं हुजूर विदीत केलें कीं, उमेदसिंग राजे यांजकडे संस्थान मजकूर पेशजीपासून आहे. तेथील पेशकसी बाबद दरसाल सहा हजार रुपये सरकारांत देत होते. त्याजवर

इ०स० १७९९।१८००
मया तैन व अलफ
सवाल २.

---

158. Patangshah Raja of Jawar having died his son Vikramshah was allowed to succeed him and was told to act loyally towards Government.
A. D. 1798-99.

159. Krishnashah Jawarkars' son being guilty of some misconduct was given a comand and directed to remain at Bassein. He had no permission to leave the place.
A. D. 1798-99.

160. Umedsing Raja of Sansthan Badwani used to pay Rs. 6000 as tribute to the Peshwa. On the transfer of certain Mahals in Sarkar Bijagad to Malharji Holkar in Saranjam the amount of tribute was paid by him to Holkar. Umedsing died and his son Mohonsing being a Minor the Holkar usurped the village of Bramhangam and some other villages and oppressed the Sansthan to a great extent. Parmanand Malhar a karkun of the Sansthan asked for Peshwas' help. Durgadas Bhawani was therefore sent to manage the Sansthan on behalf of the Raja and the following instructions were issued.
A. D. 1799-1800.

सरकार बिजागड पैकीं महाल मल्हारजी होळकर यांजकडे सरंजामास सरकारांतून दिले. त्यापासून पेशकसीचा ऐवज ते घेतात. अलीकडे उमेदसिंग राजे मृत्यु पावले. त्यांचे पुत्र मोहनसिंग हे लहान यांजमुळें संस्थानपैकीं परगणें ब्राम्हणगांव वगैरे गांव होळकर यांणी दाबून संस्थानांत मनस्वी उपद्रव करितात. व गीरास पूर्वीपासून आह्मीं घेत आलों त्याप्रमाणें महालकरी देत नाहींत. त्यास संस्थान मोहनसिंगराजे यांचे नांवें करार करून देऊन सरकारांतून संस्थानचा बंदोबस्त करून दिला पाहिजे. ह्मणोन त्याजवरून तुमचे तीर्थरूप उमेदसिंगराजे संस्थान मजकूर हे मृत्यु पावले. सबब तुमचे नांवें संस्थान पूर्ववतप्रमाणें करार करून देऊन संस्थानचे बंदोबस्तास सरकारातून दुर्गादास भवानी यांस पाठविलें आहेत त्यासंबंधें कलमें.

संस्थान संबंधें तुम्हांपासून सालमजकुरीं येक साल नजरेचा ऐवज सरकारांत ध्यावयाचा करार केला रुपये ७५००० पाऊण लक्ष रुपये याचा भरणा सरकारांत करून जाब घेणें. कलम १.

संस्थान संबंधें पेस्तरसालापासून शंभर स्वार घोडेमाणूस धडधडीत, सामान चांगलें, बरावर संस्थानांतील दाखल्याचा माणूस चांगला देऊन स्वाराचे तैनातेची बेगमी करून हुजूरचाकरीस नेहमीं पाठवीत जाणें. कलम १.

संस्थानचे कामकाजास सरकारांतून दुर्गादास भवानी यांस पाठविले आहेत. तरी तुह्मीं संस्थानचे कामकाज यांजपासून घेत जाणें. कलम १

पेशकसी बाबत साहा हजार रुपये सालाबाद पेशजी प्रमाणें पेस्तरसालापासून दरसाल सरकारांत पावते करून जाब घेत जाणें. कलम १.

संस्थानचे बंदोबस्तास स्वार व गाडदी दुर्गादास भवानी यांस ठेवावयाची आज्ञा केली आहे. तरी संस्थानचा बंदोबस्त होय तोपावेतों स्वार व गाडदी मशारनिल्हे ठेवतील, त्यांचे तैनातेचा ऐवज द्यावयाविसी आलाहिदा तुह्मांस सनद सादर जाली आहे त्याप्रमाणें देत जाणें. कलम १.

एकूण पांच कलमें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे तरी तुह्मी सरकार लक्षांत राहून सदरहु प्रमाणें करणें ह्मणोन. सनद.

रसानगी यादी येकंदर.

१६०।१०३पैकीं. मोहनसिंग राजे संस्थान बडवाणी यांचे नांवें सनद कीं तुमचे तीर्थरूप उमेदसिंगराजे संस्थान मजकूर हे मृत्यु पावले. सबब तुमचे नांवें संस्थान पूर्ववतप्रमाणें करार करून देऊन संस्थानचे बंदोबस्ताचें काम दुर्गादास भवानी यांजकडे सांगितलें आहे. त्यास मशार

इ० स० १७९९।१८०० मया तैन व मया अलफ सवाल २.

1 The Raja should pay Rs 75000 as Nazar in the current year.

1 He should continue to pay tribute at Rs. 6000 as before.

1 He should send 100 Sawars to the Peshwa for service, their expenses being defrayed by the Raja.

1 Durgadas should be given the expenses of the force which he was directed to keep for service in the State.

1 The Raja was to let Durgadas to carry on the business of the Sansthan.

निव्हे व कारकून यांस तैनात व रोजमरा व संस्थानचे बंदोबस्तास स्वार व गाडदी ठेवावयाविसीं दुर्गादास भवानी यांस आज्ञा केली. त्याचे तैनातेचा वगैरे ऐवज संस्थान मजकूरपैकीं सरकार ऐवजाशिवाय द्यावा याविसीं कलमें.

बितपसील.

१ दुर्गादास भवानी यांस तैनात सालीना.

नक्त ———————— रुपये. कापड ———————— आंख.

२५०० जातीस शागीर्द पेशासुद्धां. १५००

१००० पालखीस.

३५००

येकूण साडेतीन हजार रुपये नक्त व कापड आंख पंधराशें तैनांत सालीना कुल करार केली असे; तरी मशार निल्हेस सदरहूप्रमाणें देत जाणें. कलम.

१ कारकून संस्थानचे बंदोबस्तास राहतील त्यांस.

रोजमरा दुमाही रुपये.		कापड सालीना आंख.
बाळाजो दुल्लभराम	५०.	३००.
चिमणाजी धोंडदेव	४०.	२५०.
बाळाजी येशवंत	४०.	२५०.
	१३०	८००

येकूण येकशें तीस रुपये रोजमरा दुमाही व कापड आंख सालीना आठशें करार केले असेत; तरी हजेरीचे तेरखेपासून चाकरी बरहुकुम रोजमरा दुमाही येकशें तीस रुपये व कापड आंख सालीना आठशें सदरहू प्रमाणें देत जाणें. कलम.

१ स्वार असामी २२५ येकूण दर राऊती शेरा सालीना रुपये तीनशे शिरस्तेप्रमाणें करार करून तैनातपैकीं रोजमरा व नालबंदी.

रोजमरा दर राऊती दरमाहा रुपये १८ प्रमाणें रुपये ४०५०

नालबंदी सालीना दर राऊती. रुपये ७५ प्रमाणें १६८७५

येकूण चारहजार पन्नास रुपये रोजमरा येकमाही व सोळा हजार आठशें पंचाहत्तर रुपये नालबंदीची नेमणूक सालीना शिरस्तेप्रमाणें करार केली असे; तरी घोडे माणूस सामान चांगलें ठेऊन संस्थानचा बंदोबस्त करावा. गणतीचे तेरखेपासून चाकरीबरहुकूम स्वारांचा रोजमरा व नालबंदीचा ऐवज बंदोबस्तामुळें होईल तो देत जाणें. कलम १

१ गाडदी असामी २२५ येकुण तैनात जमातदार व कारकून सुद्धां शेरा

सरासरी दर महा दर असामीस रुपये १४ प्रमाणें तैनात दर महा रुपये ३१५०.

तपसील.

२१०० रोजमरा तैनातपैकीं, वीस रोजा येकमाही. रुपये.
१०५० तहकूब अखेर सालीं हिशेब करून द्यावें ते. रुपये.

३१५०

येकूण तीन हजार एकशें पन्नास रुपये तैनात दरमाहा करार केली असे. तरी गाडदी चांगले चाकरीचे उपयोगी पाहून ठेवावे. त्यांस हजिरीचे तेरखेपासून चाकरी बरहुकूम दरमाहा तैनात पैकीं वीस रोजा दोन हजार येकशें रुपये देत जाणें, तहकुबी एक हजार पन्नास रुपये प्रमाणें अखेर सालीं अकरा माही व येकूणतीसारोज वजा करून तैनातेचा हिशेब संस्थानचे बंदोबस्तामुळें होईल तो ऐवज देत जाणें. कलम.

४

येकूण चार कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी सदरहुप्रमाणें करणें म्हणोन. सवद १.

रसानगी कराराची यादी.

१६१।१४१. रूपदेराणा संस्थान रामनगर यांचे नांवें सनद कीं, तुह्मांवर सरंजामपट्टीबद्दल पन्नास हजार रुपयांची वरात जाली आहे. त्यास चार वर्षें होत आलीं त्याचा फडशा अद्यापि होत नाहीं, व सरकारचे मुत्सदी यांजकडे तुह्मांकडून देहेचार चालत आले होते त्यांची जप्ती तुम्हीं केली आहे, व सरकारच्या जकाती संस्थान मजकुरीं आहेत त्यांचे अमलाची कैदकानू वगैरे यांत बखेडा तुह्मीं करून पायमल्ली करीत आल्यामुळें नुकसानी जाली, व तालुके वसई येथील कारकून प्यादे यांसी बेकैदी केली, ह्मणोन हुजूर विदीत झालें. त्याजवरून सरसुभा प्रांत कोंकण येथून बाबुराव भास्कर यांस पाठविले असेत, तरी सरंजामपट्टीबद्दल वरातेचे ऐवजांचा फडशा करणें, विलंब न लावणें, व मुत्सद्दी यांस तुम्हांकडून गांव चालत होते त्यांची जप्ती तुम्हीं केली आहे ती मोकळी करणें, आणि गांवची कमाविस खंडेराव निळकंठ यांजकडे सरकारांतून सांगितली असे तरी गांव त्यांचे हवालीं करणें, हे

इ. स. १८०१।०२
इसन्ने मयातैन व अलफ,
जिलकाद ९.

161. Acess called Saranjampatti amounting to Rs. 50000 was imposed on Rupde Rana of Sansthan Ramnagar. The Raja failed to pay the amount. He more over attached certain villages granted by him to the officers of Govt and interfered with the management of the octroi which was in the hands of Government. He was informed that if he did not pay the cess and the expenses incurred on account of his interference with the octroi management and if he did not restore the villages in question it would go hard with him.

A. D. 1801-1802.

गांवचा वसूल घेतील, दिक्कत न करणें व जकातीचे अमलांत बखेडा व कारकुनांशीं बे-कैदी केल्यामुळें बाबुराव भास्कर यांचे विद्यमानें शिबंदी खर्च जाहला असेल त्याचा फडशा करून देणें, सदरहू कलमांचा लिहिल्याप्रमाणें फडशा न केल्यास तुमचें येकसुदीस चांगलें नाहीं म्हणोन.

रसानगीयाद.

१६२।२२२ संस्थान वाडी निसबत खेमसांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालानिहाय. मशारनिल्हे मृत्यु पावले याजमुळें संस्थानीं हौदा होऊन मुलूख खराब जाला. त्यास संस्थान सरकार निसबतीचे यास्तव सरकारांतून कारकून देऊन बंदोबस्त व्हावा. ह्मणोन फोंड सांवत भोंसले यांणीं आनंदराव जाधव यांस गणेश चिंतामण घारपुरे यांचे विद्यमानें सरकारांत बोलण्यास पाठविले. त्यास जाधव व घारपुरे यांणीं वाडीचे संस्थानचा व्यवस्थेनें बंदोबस्त करून देण्याविसी विनंती केली, त्याजवरून उभयतांचे बोलण्याचे भाव समजोन घेऊन सांवत यांजकडील वाडी संस्थान सरकार निसबतीचें सबब संस्थानचे माहाल व गांव व किल्ले व कोट व आरमार वगैरे सुद्धा बंदोबस्त करावयास हुजूरून गणेश चिंतामण घारपुरे कारकून पाठविले येविसी सनदा पत्रें.

इ० स० १८०९।१०
अशर मयातैन व अलफ
साबान ९

१ करवीरकर यांस कीं, हे संस्थान मजकूर येथील महाल मुलूख व किल्ले कोट व आरमार, वगैरे सुद्धां बंदोबस्त करतील. त्यास साहेबाकडे संस्थान मजकुरचे माहाल व गांव व किल्ले व कोट व आरमार व तोफा वगैरे जें आलें असेल तें जकिरासुद्धां घारपुरे यांचे हवाली करावयाविसीं आज्ञा व्हावी. पुढें कोणेविसी मुलकांत उपसर्ग न लागे तें जालें पाहिजे ह्मणोन. पत्र.

१ सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर यांस कीं, प्रांत मजकुरीं तुम्हांकडील कारकून व लोक जाऊन गांवगन्ना व किल्ले यांस उपद्रव केला आहे, म्हणोन हुजुर विदित जालें त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी संस्थान मजकुरचा माहाल व मुलुक किल्ले व कोट वगैरे सुद्धां बंदोबस्त मशारनिल्हे करतील, त्यांस तुम्ही प्रांत मजकुरीं कारकून व लोक पाठविले असतील ते माघारे उठवून नेणें.

१ फिरंगी गोवेंकर यांस कीं, तुम्हीं संस्थान मजकुरचे माहाल व देहे व किल्ले

---

162. After the death of Khemsavant Bhosle of Sansthan Wadi, his karkuns and Fond Savant Bhosle, represented to Goverument that there was much confusion in the Sansthan and teat it had suffered considerably and requested that Government should send an officer to restore order. Gunesh Chintaman Gharpure was therefore sent to make the necessary arrangement in the States. The Kolhapur Raja and the Portugese of Goa were requested to make over to Ganesh Chiutaman any vtllages or forts of the Sansthan that might be in their possession

A. D. 1809-1810.

व ठाणीं दाबिलीं असतील तीं जकरीरासुद्धां याचे हवालीं करावीं, व अयालत मर्तबानचे ऊर्फ तुम्हांकडील अमलांत बखेडखोर राहून प्रांतमजकुरीं उपद्रव करितात ते धरून याचे हवालीं करावें, व पुढें कोणेविसीं तुह्मांकडील उपद्रव मुलकांत न होय तें अमलांत आणावें ह्मणोन. पत्र.

२ तालुके देवगड येथील मामलेदार व किल्ले सिंहगड येथील कारकून व गडकरी यांस कीं, तुम्हीं कोणे एकाबिसीं सरकार लक्ष धरून मशारनिल्हे सांगतील याचा पुस्तपन्हा करून तिकडील हरामखोर देवगड व सिंहगड तालुक्यांत राहिले असतील ते धरून याचे हवालीं करणें ह्मणोन. पत्रें.

१ तालुके देवगड येथील मामलेदार नारो रामचंद्र यांस.

१ किल्ले सिंहगड येथील कारकून व गडकरी यांस. पत्र.

२

१ फोंड सांवत भोंसले व कारकून दिमत खेम सांवत भोसले यांस कीं, हे बंदोबस्त करतील, व येविसी करवीरकर व सिदोजी नाईक निंबाळकर सरलष्कर व गोवेकर फिरंगी यांस आलाहिदा पत्रें दिलीं आहेत, त्यांस तुम्ही घारपुरे यांस अनुकूल होऊन घारपुरे यांचे विचारें संस्थानचा व माहाल मुलुकाचा व किल्लेकोटाचा व आरमाराचा वगैरे बंदोबस्त झाल्याचें वर्तमान हुजूर लेहून पाठविणें. पुढें संस्थानचे व्यवस्थेविसीं आज्ञा करणें ते केली जाईल. ह्मणोन पत्र.

१ जमीदार माहालानिहाय व मोकदम देहहाय यांस कीं, तुह्मी मशारनिल्हेचे रजातलबेत वर्तोन, प्रांत मजकूर वगैरे माहालानिहायचे गांवगन्नाचा अंमल घारपुरे यांचे इतल्यानें संस्थानाकडे सुरळीत देणें म्हणोन.

१ मोकदम देहें यांस सनद.

१ जमीदार माहालानिहाय यांस.

२ पत्र.

१ किल्ले व ठाणीं संस्थान वाडी येथील हवालदार व सरनोबत व सेनाधारी व कारकून यांस कीं हे किल्ले कोटाचा व माहाल मुलूख वगैरे सुद्धां बंदोबस्त करितील. तरी तुम्हीं यांचे रजातलबेत वर्तोन सरकार लक्ष राखोन किल्ले व कोटाचा अलंग नोबत चौकी पाहारा यथास्थित करीत जाणे ह्मणोन. सनद.

४ किल्ले पारगड वगैरे यांस कीं तुम्हीं सरकार कामाविसी मशार निल्हेस सामील होणें ह्मणोन हवालदार वगैरे यांस पत्रें.

३ किल्लेहाय येथील हवालदार व सरनोबत व कारकून व गडकरी यांस पत्रें.

१ किल्ले पारगड.
१ किल्ले भिवगड.
१ किल्ले कलानिधि.

३

कारकून दिमत अनंदराव धुळप यांस कीं लोक सुद्धां सामील होणें ह्मणोन. पत्र.

४

१ बाबुराव अनंत लेले किल्ले बेळगांव यांस कीं तुम्हांस लिहितील त्याप्रमाणें सरकार लक्ष धरोन मशार निल्हेचा उपराळा राखीत जाणें. म्हणोन पत्र.

१४

येकूण चवदा सनदा व पत्रें दिलीं असेत रसानगी यादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

परकीय संस्थानें.

जमा, जामदारखाना.

१६३।३२ कमावीस भेट राजश्री बाबासाहेब यांसी, बाबत रणबाहादर राजे नेपाळकर यांनीं पाठविले, ते गुजारत जानोजी जांभळा खिजमतगार. पट्टू भस्मी सनंगें २. एकूण रुपये १५०.

इ० स० १७९६।९७.
सवा तिसेन मया व अलफ.
सवाल २९.

राजकीय (क) देशांतील बंडें.

भिल्ल व कोळी.

१६४।८ देवसिंग ठोके यांनीं भिल्लांस मिळोन महालांत दंगा केला याजमुळें किल्ले पट्टा येथें अटकेंत ठेवावयाविशीं पेशजी सनद सादर जाली आहे. त्यास फंद फितूर करूं नये तीन हजार रुपये खर्चास घेऊन सरकार लक्षोन वर्तणुक करीन ह्मणोन जामीन देतो. याप्रमाणें तुम्हांकडील कारकु

इ.स. १७९६।९७
सित तिसेन मया व अलफ
रमजान ९.

A. D. 1796-97. 163. Present of clothes was received by Bajirao from Ran Bahadur Raja of Nepal.

A. D. 1796-97. 164. Dewsing Toke having raised a rebellion with the assistance of Bhils was imprisoned at fort Patta. He was offered to give security for abstaining from rebellion and for remaining loyal to Government. The offer was accepted and he was ordered to be set at liberty and was given an allowance of Rs 3000 a year for his expenses.

नांनीं विनंति केली. त्याजवरून ठोके याजपासून पक्काखातरजमेचा जामीन घ्यावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी जामीन घेऊन मोकळे करणें आणि छत्रसिंगराव ठोके, विश्वासराव याजकडून सरंजामपैकीं तीन हजार रुपये देवसिंग यास खर्चास दरसाल देववीत जाणें. ह्मणोन कृष्णराव गोविंद कमाविसदार प्रांत बागलाण यांचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

१६५।१०२ महालानिहाय तळघांट व वरघाट प्रांत खानदेश, अहद कासारबारी,

इ. स. १७९९।१८०० मया तैन व अलफ रमजान १५.

तहद्द अजंठा येथें भिल्लांचा उपद्रव आहे त्यांचे बंदोबस्ताचें काम पेशजी तुम्हांकडे सरकारांतून सांगितलें आहे त्याविशीं कलमें.

इस्तकाबिल सालगुदस्त सन तिसा तिसेन तागाईत सनसल्लास मया तैन पांच साला काम सांगोन कराराची यादी पेशजी करून दिली आहे. त्यास इमाने इतबारें वर्तोन भिल्लांचा बंदोबस्त चांगला करणें. कराराप्रमाणें निभविलें जाईल. कलम १.

तुह्मांकडे पागा व पथकें चाकरीस सरकारांतून पाठविलीं आहेत त्यांस भिल्लांचे बंदोबस्तास कारण लागल्यास ठेवणें.

कलम १

भिल्लपट्टीचा वगैरे ऐवज जमा होईल त्यापैकीं चौथाई ऐवज सरकारांत सालमजकुरापासून घ्यावयाचा ठरला आहे. त्यापैकीं तूर्त पांच हजार रुपये सरकारांत भरणा करून पावली याचा जबाब घेणें. कलम १

भिल्लपट्टीबद्दल दरसदे रुपये ५ पांचप्रमाणें घ्यावयाचे त्यास महाल लाऊन दिल्हे आहेत. ऐशास ज्या महालास व गांवास भिल्लांचा उपद्रव होत असेल त्यांचा बंदोबस्त केला सरंजामी वगैरे भिल्लपट्टीचे ऐवजाविशीं सरकारांतून मनाई मागो लागल्यास मनाई होऊं नये ह्मणोन तुह्मी विनंति केली. त्यास ज्या महालास व गांवास भिल्लांचा उपद्रव होत असेल त्यांजपासून जमाबंदीचे बेरजेस भिल्लपट्टीचा ऐवज दर शेकडारुपये ५ प्रमाणें घेत जाणें येविशी सरकारांतून मनाई होणार नाहीं बोभाटा आल्यास ताकीद केली जाईल.

कलम १

भिल्लांचे मिलाफी असतील त्यांचे पारिपत्य करून गुन्हेगारी घेतली असतां कोणी गैरवाका समजाऊन सरकारांतून मनाई मागो लागल्यास मनाई देऊं नये, ह्मणोन तुम्ही विनंती केली. त्यास भिल्लांचे मिलाफी असतील त्यांची चौकशी करून त्यांजपासून गुन्हेगारी व जामीन घेऊन बंदोबस्त करणें, कोणी खटला केल्यास हुजूर समजावणें, समजोन आज्ञा करणें ती केली जाईल.

कलम १

165. Dhondo Ram was entrusted with the duty of putting down the Bhils who were disturbing Khandesh from Kasarbari to Ajinta.

A. D. 1799-1800.

He was authorized to levy 5 percent of the revenue from villages and Mahals suffering from the ravages of the Bhils and to pay ¼ of it to Government. Keeping the remaining amount for expenses.

असतां, तेथील ऐवजाची सरकारांतून मनाई जाहल्यास आमचा ऐवज खर्चामुळें फाजील होईल तो देविला पाहिजे. ह्मणोन तुह्मीं विनंती केली. त्यास भिल्लपट्टीचे ऐवजाचा जमाखर्चाचा कचा हिशेब तफावत न करितां अखेरसालीं सालाचे सालांत सरकारांत समजावित जाणें. कलम १

पांच हजार रुपये चौथाई पैकीं तूर्त सरकारांत ध्यावयाचे करार केले आहेत. त्यांस व्याज भरण्याचे मित्तीपासून येकोत्रा शिरस्तेप्रमाणें व हुंडणावळ महाली चालीप्रमाणें मजुरा पडेल. कलम १

येकूण सात कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन धोंडोराम याचें नांवें
सनद १.
रसानगी यादी.

१६६।१५५ भिल्लांस पेशजी रखवालीबद्दल सालाबाद गांवगन्ना दाणे पावत होते, ते अलीकडे पावत नाहींत, सबब भिल्लांनीं जागा जागा दंगा करून मुलखांत रयतेस मनस्वी उपद्रव करून घांट बंद केले आहेत, ह्मणोन तुह्मी विनंति केली. त्याजवरून भिल्लांचे पारिपत्यास सरकारांतून गाडदी असामी तीनशें नेमुन हे सनद सादर केली असे. तरी सदरहू तीनशे गाडदी जागा जागा पाठऊन भिल्लांनीं घांट बंद केले आहेत त्यांचे पारिपत्य करून मार्ग मोकळे करणें. भिल्लांस पेशजी रखवालीबद्दल सालाबाद गांवगन्ना दाणे पावत होते ते अलीकडे पावत नाहींत, त्यास भिल्लांनीं मुलकांत काडीमात्र उपद्रव न करितां मुलकाची रखवाली करीत जावी, आणि भिल्लांस गांवगन्ना रखवालीबद्दल दाणे पेशजी सुदामत पावत आल्याचा दाखला पाहून त्याप्रमाणें द्यावयाविशीं महालनिहायचे कमाविसदार यांस आलाहिदा पत्रें सादर झालीं आहेत, त्याप्रयाणें दाणें देऊन फिरोन भिल्लांचा मुलकास उपद्रव न लागे असें चांगले पक्केपणें जामीन भिल्लांपासून घेऊन बंदोबस्त करणें. ह्मणोन आबाजी महादेव यांचें नांवें

इ स. १८०२।०३
सल्लास मयातैन व अलफ.
रविलाखर २९

सनद १.
रसानगीयादी.

१६७।१५९ धोंडजी वाघ याजकडील असामी किल्लेहाय तालुके वसई येथें अटकेस आहेत. त्यांस सोडावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी सदरहू असामी सोडून देणें खाणावळीचा ऐवज न घेणें. ह्मणोन
सनदा.

इ० स १८०२।३
सल्लास मय्यातैन व आलफ.
मोहरम. ३

---

166. The Bhils used formerly to receive some grain from the villagers for guarding their villages. The Hak having been wlth held, the Bhils rose in rebellion and blocked the passes. 300 gardis were sent to Abaji Mahadeo for putting down the Bhils, and orders were issued to continue the payment of the Bhils' Haks as before.

A. D. 1802-1803.

167. 4 men of Dhondji Wagh who were imprisioned in the forts of Arnala and Bassein were ordered to be released and were exempted from paying the cost of their maintenance.

A. D. 1802-03.

१ खंडेराव निलकंठ यांस, जंजिरे आरनाळा तालुके मजकूर येथें असामी.

१ मानाजी जाधव.
१ काशी शिंदा.
१ कृष्णाजी नाईक.

३

येकून तीन असामीविसी सनदा.

१ केशवराव जगन्नाथ यांस, जंजिरे वसई तालुके मजकूर येथें धावजी कोबजी फडतरा येविसी सनद.

२

१६८।१८७ नरसिंह खंडेराव यांणीं हुजूर विनंति लिहून तुम्हांकडील कलम बंदीची याद पाठविली. त्याजवरून सरकारांतून कलमबंदीची याद ठराऊन मशार निल्हेकडे रवाना केली आहे. त्याप्रमाणें जमावसुद्धां तुम्हीं आपले ठिकाणीं जाऊन पुन्हां जमेत न करितां सरकार लक्ष धरून राहणें, मुलकांत काडीमात्र उपद्रव न करणें, या प्रमाणें वर्तणूक केली असतां सरकारांतून उपद्रव लागणार नाहीं. म्हणोन चिटणीसी पत्रें.

इ० स० १८०४।५
खमस मयतैन व अलफ
रमजान. ४

१ दत्तु नाईक भिल्ल यांस.
१ काळोजी नाईक भिल्ल यांस.
१ महिपती नाईक भिल्ल यांस.
१ सोननाईक भिल्ल यांस.

४

काशीनाईक भिल्ल याचें नांवें पत्र कीं तुम्ही विनंति पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. नरसिंह खंडेराव यांणीं आम्हांकडील कलम बंदीची याद हुजूर पाठविली. त्याजवरून सरकारांतून कलम बंदीची याद ठराऊन मशारनिल्हेकडे रवाना केली आहे. त्याजप्रमाणें आम्हीं आपले चौघेभाऊ जमा करून एक दोघे बंडें करीत होतें ते धरून पारिपत्य करून गांवगन्ना रखवाली बसविली. त्यास उपद्रव न लावावयाविसी सरकारचे कमाविसदारस आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन लिहिलें. त्यास सरकारांतून कलमबंदीची याद ठरऊन नरसिंह खंडेराव यांजकडे पेशजी पाठविली आहे. त्याप्रमाणें तुम्हीं आणखी भिल्ल यांचें नाईक असतील ते देखील जमावसुद्धां आपले ठिकाणीं जाऊन पुन्हां जमेत न करितां सरकार लक्ष धरून राहणें

---

168. Dattu Naik Bhil and others entered into agreements with Nersinh Khanderao promising to give up their predatory habits and live peaceably as loyal subjects of Government. They were informed that if they acted to their promise, they would in no way be molested.

A. D. 1804-1805.

मुलकांत काडीमात्र उपद्रव न करणें या प्रमाणें वर्तणूक केली असतां सरकारांतून उपद्रव लागणार नाहीं येविसी महालनिहायचे कमाविसदारास पत्र सादर केलें आहे. ह्मणोन चिटणीसीं पत्र.

१६९।१८८ नरसी खंडेराव यांणीं हुजूर विनंति लिहून काशीनाईक भिल्लासंबंधानें कलमबंदीची याद हुजूर पाठविली. त्याजवरून सरकारांतून कलमबंदीची याद ठराऊन मशारनिल्हेकडे पाठविली आहे. त्याप्रमाणें काशी नाईक भिल्ल यांणीं जमावसुद्धां आपलें ठिकाणीं जाऊन पुन्हां जमेत न करितां सरकार लक्ष धरून राहावें. मुलकांत काडीमात्र उपद्रव करूं नये. रखवाली गांवगन्नाची करून त्यास पोटास रयत निसबत पेशजी सुदामत चालत आल्याचा भोगवटा पाहून त्याप्रमाणें चालतें करावयाचे तें करून हें पत्र सादर केलें असे तरी सदरहूप्रमाणें भिल्लानीं आपलें ठिकाणीं जमावसुद्धां जाऊन सरकार लक्ष धरून मुलकांत उपद्रव न करतां गांवगन्ना रखवाली करूं लागले ह्मणजे त्यांस पोटास रयत निसबत पेशजी सुदामत चालत आल्याचा भोगवटा पाहून त्याप्रमाणें रयतेस ताकीद करून देविणें. ह्मणोन कमाविसदार महालानिहाय यांस चिटणीसी पत्र १.

इ० स० १८०४।५
खमस मैयातैन व अलफ
रमजान.

१७०।१९२ किल्ले खेराई व रामनगरानजीक भिल्लांनीं दंगा केला आहे, त्यांचे पारिपत्यास सरकारांतून नरसिंह खंडेराव यांजकडील फौज व मनोहरगीर यांस पागा व पलटण सुद्धां रवाना केलें असेत. तरी तुह्मांकडील महाल व तालुके हाय येथील नेमणुकी शिबंदी पैकीं तेथील चांगला बंदोबस्त राखोन पाईचे शिपाई लोक आसामी १०७९ एक हजार पाऊणशे रोजमऱ्याची व दारू गोळीची बेगमी करून देऊन मशारनिल्हे यांजकडे पाठवून देणें. आणि ते सांगतील त्याप्रमाणें सरकार चाकरी करणें. ह्मणोन सनदा.

इ० स० १८०५।६
सीत मया तैन व अलफ
रमजान २५

१. महालानिहाय, तालुके वसई निसबत खंडेराव निलकंठ यांस आसामी २०० दोनशें येविशीं सनद.

१. किल्ले हाय, तालुके वसई निसबत केशवराव जगन्नाथ यांस आसामी २०० दोनशें येविशीं.

---

169. The Komavisdars of different Mahals were informed of the issue of the above orders and were directed to employ the Bhils in keeping watch at the villages and to see that they receive their customary dues from the villagers.

A. D. 1804-1805.

170. There being a disturbance of Bhils near the fort of Khairai aud near Ramnagar. Narsinh Khanderao and Manohargir were sent with an army to put them down. The officers of certain forts and Vikramshah Raje of Sansthan Jowar and Rupde Rana of Sansthan Ramnagar were directed to send men to their assistance and to co-operate with them.

A. D. 1805-1806.

१. किल्ले माहुली निसबत त्रिंबकजी डेंगळे यांस लोक ५० पन्नास येविशीं.

१. महालानिहाय प्रांत कल्याण, निसबत हरि गणेश यांस लोक १०० शंभर येविशीं.

१. किल्ले हाय मामले कोहज निसबत केशवराव जगन्नाथ यांस आसामी ५० येविशीं.

१. तालुके कावनई, निसबत मुरारजी येवले यांस आसामी १०० शंभर येविशीं.

१. तालुके रतनगड, निसबत कोलते यांस आसामी ५० पन्नास आसामीविशी कारकून दिमत मशारनिल्हे यांस.

२. मनोहरगीर यांस

१. तालुके त्रिंबक येथील आसामी २०० दोनशें येविशीं.

१. किल्ले खैराई येथील आसामी २५ पंचवीस येविशीं.

२.

१ तालुके मुल्हेर निसबत नारो आबाजी यांस असामी २०० दोनशें येविसी.

१०

रसानगी याद येकंदर.

किल्ले खैराई व रामनगरानजीक भिल्लांनीं दंगा केला आहे. त्यांचें पारिपत्यास सरकारांतून नरसिंह खंडेराव यांजकडील फौज व मनोहर गीर यांस पागा व पलटण सुद्धां रवाना केले असेत. तरी तुम्हीं लोक सुद्धां मशारनिल्हे यांस सामील होऊन सरकारलक्ष धरून हे सांगतील त्याप्रमाणें भिल्लांचें पारिपत्य करणें ह्मणोन. सनदा.

१ विक्रमशा राजे संस्थान जवार यांस.

१ रूपदे राणा संस्थान रामनगर यांस

२

रसानगी याद येकंदर.

राजकीय (क) देशांतील बंडें.

२ इतर.

१७१।१० व्यंकटराव शिवाजी कमाविसदार परगणें जालनापूर यांचें नांवें सनद कीं तुम्ही विनंति पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहलीं. कान्होजी नाईक वणजारा याणें गाजीखान वगैरे चाकरीस ठेऊन जमाव करून परगणें मजकूर येथील गांवगन्नांचीं घरें व गुरें लुटून नेतो.

इ० स० १७९५।९६
सीत सीतेन मया व अलफ
जिलकाद ४.

171 Kanoji Naik Wanjara having taken Gajikhan and others in his service plundered the villages in Pargana Jalnapur. The Kamavisdar was therefore directed to employ additional men for putting him down.

A. D. 1795-96.

महालांत पासोडिची नवीन बाब बसाविणार व त्याचें पारिपत्य जहाल्याशिवाय लावणी होणार नाहीं ह्मणोन तुम्हीं लिहिलें. ऐशास माहालाचे बंदोबस्तास कार्याकारण शिबंदी ठेवावयाची आज्ञा केली असे तरी माहालाचे शेन्याचे शिरस्तेप्रमाणें लोक ठेऊन बंदोबस्त करणें, आणि बंदोबस्त जहालीयावर नवी शिबंदी ठेवाल ती दूर करणें ह्मणोन. सनद १.

परवानगीरूबरू.

१७२।८७ पठाण व पेंढारी वगैरे लोक सरकारचे व सिंदे व होळकर यांचीं नांवें सांगोन प्रांतांत दंगा करितात, त्यांचें पारिपत्यास सरकारांतून नरसिंह खंडेराव यांस फौज सुद्धां पाठविले आहेत. तरी तुम्हीं तालुक्यापैकीं लोकसुद्धां मशारनिल्हेस सामील होऊन तालुके मजकूर येथील जागाजागा नाकेंबंदी करून घोडीं वगैरे वस्तभाव त्यांची सांपडेल ते हुजूर पाठवून देणें. ह्मणोन माहालनिहाय, किल्लेहाय, व तालुकेहाय येथील मामलेदार यांस सनदा.

इ० स० १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
साबान २३.

१ तालुके त्रिंबक निसबत पांडुरंग धोंडाजी.
१ तालुके शिवनेर निसबत रामचंद्र नारायण.
१ तालुके धोडप निसबत बाळाजी केशव.
१ तालुके पट्टा निसबत विठ्ठलराव आपाजी.
१ तालुके कावनई निसबत गोंविंद रंगनाथ.
१ तालुके मुल्हेर निसबत यादो शामराव.
१ परगणें नेवासे वगैरे महाल निसबत मोरो हरि.
१ सरसुभा प्रांत खानदेश निसबत व्यंकटराव नारायण.
१ किल्ले हर्ष निसबत परशराम नारायण.
१ परगणें नाशिक निसबत माधवराव गंगाधर.
१ परगणें, दिंडोरी निसबत व्यंकटराव गंगाधर
१ प्रांत बागलाण निसबत गोविंदराव सदाशिव.
१ तालुके रतनगड निसबत यशवंतराव महादेव.
१ किल्ले बहुला निसबत त्रिंबकराव अमृतेश्वर.

१४ रसानगी, नारोशिवराम चक्रदेव कारकून निसबत दप्तर.

१७३।१३६ तालुके हाय प्रांत कोंकण येथें चोरटयांच्या माहांगिऱ्या गांवगन्ना बंदरीं लागोन दर वडे घाल्लून बंदे धरून नेतात, त्यांचा बंदोबस्त करावयाविसी खंडेराव निलकंठ निसबत सरसुभा प्रांत मजकूर यांस सांगोन

इ० स० १८०१।२
इसन्ने मया तैन, व आलफ.
रजब. २१

172. Pathans and Pendharis were harassing the country in the name of the Government, Scindea and Holkar. Narsinh Khanderao wa sent with an army to put them down.
A. D. 1798-99.

173. Pirates infested the country along the coast in Konkan. They attacked the villages and carried persons as slaves. Ships were therefore sent to the several forts for the protection of the people with insructions to seize the pirates with their vessels.
A. D. 1801-1802.

पेशजी तुम्हांस सनदा सादर जाल्या आहेत. त्याजवरून मशारनिल्हेंनीं महादाजी बल्लाळ मोहनी सरदार निसबत सुभा अरमार विजयदुर्ग यांस पाठविले आहेत. त्याजबरोबर ताल्लुके मजकूर पैकीं गलबतें बंदरचे रखवालीस द्यावयाची आज्ञा करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी महादाजी बल्लाळ यांज बराबर ताल्लुके मजकूर पैकीं गलबतें लोक सुद्धां दारूगोळी व रोजमुऱ्याची व अडसरीची बेगमी गलबतें कामगारासि राहतील तों पावेतों करून देणें. चोरटयांचीं गलबतें धरून आणून बंदोबस्त करून चोरटे तुमचे स्वाधीन करतील त्यांस अटकेस ठेवून लेहून पाठवणें. सरकारांतून आज्ञा होईल त्या प्रमाणें पारिपत्य करणें. ह्मणोन मामलेदार ताल्लुके हाय प्रांत मजकूर यांस सनदा.

१ ताल्लुके विजयदुर्ग निसबत आबाजी बापूजी यांस.
१ सुभा अरमार विजयदुर्ग निसबत आनंदराव धुळप.
१ ताल्लुके रत्नागिरी निसबत × × ×
१ ताल्लुके अंजणवेल निसबत रघुनाथ त्रिंबक.
१ ताल्लुके सुवर्णदुर्ग निसबत बाळोजी कुंजीर.
१ ताल्लुके रेवदंडा निसबत बळवंतराव रामचंद्र.
१ ताल्लुके उंदेरी निसबत आपाजी बापुजी व महादाजी निलकंठ.
१ ताल्लुके वसई निसबत खंडेराव निलकंठ.
१ प्रांत बेलापूर निसबत त्रिंबक गणेश.
९

रसानगी यादी.

१७४।१३७ बाळकृष्ण गंगाधर याजकडील कारकून वगैरे असामी.

इ० स० १८०१।२
इसन्ने मयातैन व अलफ.
साबान.

७ क्षेत्र पंढरपूर येथें.
१ जनार्दन मुकुंद शेणवी.
१ बजाबा शिरोलकर याचा लेक.
४ जाऊन येऊन कारभार करितात.
१ श्रीधर आबाजी सरदेशमुख पंढरपूरकर.
१ बहिरो केसकर पानगांवकर.
१ अणाजी रामचंद्र सोलापूरकर.
१ आबाजी नरहर निसबत काशीराम.

---

174. Janardan Muknnd Shenwai, Bajaba Shirolkar and other Karkuns under Balkrishna Gangadhar collected an army and were making raids in the country. Their houses and property were ordered to be attached.

A. D. 1801-1802.

आपाजी गाडगीळ याचा भाऊ सालगुदस्त
बिनीस होता हल्लींही आला आहे.

४

१ विठ्ठल येशवंत कामीं शेणवी फौजेंत आहे.

७

१ येसाजी कृष्ण कुरूंदवाडास आहे.

१ लाडको व्यंकाजी क्षेत्र पंढरपूर येथें होता, तो मौजे निंभेस परगणें वांगीं येथें गेला आहे.

१ आबाजी यशवंत केमकर वस्ती परांडे मौजे माणकेश्वर येथें फौजेचा जमाव करून पंढरपूरास पाठवीत आहे.

१०

येकूण दहा असामी यांणीं फौजा जमा करून सरकार तालुक्यांत उपद्रव करीत आहेत, म्हणोन हुजूर विदित जहालें. ऐशास सदरील दहा असामी व त्यांचे मिलाफी व यांजकडे चाकरीस जाऊन राहिले असतील त्यांचीं घरें वगैरे चीजबस्त जरा बाजरा चौकशीनें जप्त करून वस्तवानीची वगैरे मोजदाद जाबता लिहून हुजूर पाठवून देणें, व त्यांचीं मुलें माणसें सांपडतील तीं कैद करून ठेवणें, ह्मणोन मल्हार बाजी कमाविसदार परगणें भोसे यांचें नांवें सनद १.

रसानगीयाद.

इ० स० १८०१ । २
इसन्ने मयातैन व अलफ
रमजान २४

१७५।१३८ लाडको व्यंकटेश व विठ्ठल यशवंत हे फौजेचा जमाव करून सरकारचे महालांत दंगा करितात त्यांचें मिलाफी असामी.

कित्ता.

३ वस्ती, मौजे गोपाळाची अष्टी परगणें उंदीरगांव.

१ शिवाजी पाटील याचे विद्यमानें मोरोबा दळवी याची पागा होती सबब.

१ यादवराव पाटील पंचवीस स्वारानिशीं चाकरी बिनी बरोबर करीत होते.

१ भिकाजी पाटील याणें भोसकर याचे छाप्याची बातमी पोंहचविली.

३

कित्ता.

१ रंगो लव्हेकर बिडाजवळ फौज जमा करावयास पाठविले होते.

१ भाऊ कोटणीस वस्ती इसलामपूर याजकडे शागीर्द पेशाचें काम होतें.

२ भवानी व पांडुरंग यांजकडे कीर्द खतावणी होती.

---

175. Ladko Vyankatesh and Vithal Yeshwant and others had collected an army and were making raids in Government territory. Their houses and property were ordered te be attached.

A. D. 1801-1802.

८ वस्ती क्षेत्र पंढरपूर.

१ काशीबा पराडकर याजकडे फडणीसीचें काम होतें.

१ सखाराम आनंत फौजेची हजीरनिशी करीत होते.

१ राघो कोल्हापूरकर सरदेशमुख यांचें वाडयांत होते फौजेच्या खर्चाचा पट करीत होते व बक्षीगिरीचें काम होतें.

१ रंगो सरकारचे कारकून शिंद्याचे वाडयाची जप्ती करावयास पंढरपुरीं गेले होते.

१ मेघशाम लाड याणें सावकारी कांहीं पैका दिल्हा.

१ अन्नपूर्णाबाई इचे वाडयांत आले होते तिणें प्रल्हाद बडवे याजपासून चारशें रुपये कर्ज घेऊन दिल्हे.

१ गोकुळ शेट गुजर याणें सातशें रुपये पर्यंत पहिले दिल्हे आणि मोबदला करीत होता.

१ बाबा बडवे याचें घरीं विठ्ठल येशवंत राहत होता.

८

१ गोविंद माणकेश्वर भोसकर हे पहिले लाडकोबाकडे जमेत करावयास येत होते. व हल्लीं कोतवालीची दिवाणगिरी होती.

१ मोरोबा दळवी याची पागा चाकरीस होती.

१ बाळाराम परदेशी कोतवालीवर.

२ कालेखान व सुज्यातखान पायदळ चाकरीस होतें.

१६

४ शिलेदार मंडळी.

१ बाभुळगांवकर मंडळी.

मुक्काम करकंब.

२ माधवराव देवगरकर प्रांत बाळाघांट हे हजार लोकनिसी चाकरीस होते ते गुदस्ताही होते. हल्लीं त्यांस येसाजी रामकृष्ण यांचीं पत्रें आलीं होतीं. विठोबा अंजनगांवकर बिनींचें काम व मोदिखान्याचें काम करीत होते. वस्ती भिलवडी.

१ सेटीबा जमातदार बारामतीकर हे खासबारदारीवर होते, शिंद्याचे वाडयास पंढपुरीं त्यांचीच चौकी होती. हल्लीं त्यास विठ्ठल बारामतीकर याणें चाकरीस ठेविला आहे.

१ बाळाजी चौगुले बंड उभें करावयास होते ते पुढें पागेंतील घोडा घेऊन जमेत करावयास गेले, ते दोन तीनशें पायदळ घेऊन चाकरीस होते व खंडणीही चुकवीत होते; त्यांजवर भोसेकर याजकडे गेले आहेत व आणाजी रामचंद्र यांणीं विजापुराहून पेंढारी वगैरे सरंजाम आणावयास पाठविले होते.

२ शिलेदार.

१ भिवराव भोपे तुळजापुरकर.

१ दरयापा सिंदे शेतबाबुळगांवकर.

१०

१ उचेठाणकर मंडळी.
१ मोहोळकर मंडळी.
१ पुळंजकर मंडळी.
—
४

—
२०

असामी वगैरे.
२६ असामी.
४ शिलेदार मंडळी.
—
३०

येकूण सवीस असामी व चार गावचे शिलेदार व या खेरीज दुसरे कोणी उभयतांचे मिलाफी असतील त्यांचा शोध लाऊन त्यांस धरून मुलांमाणसांसुद्धां कैद करून त्यांचे घराची वगैरे जप्ती करावयाविसी तुह्मांस आज्ञा करून हे सनद सादर केली असे, तरी सदरी लिहिल्याप्रमाणें असामी कैद करून पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेवणें आणि त्यांचीं घोडीं व गुरें वगैरे चिजवस्त जराबाजरा जप्त करून मोजदाद जाफ्ता लिहून हुजूर पाठवून देणें. ह्मणोन मल्हार बाजी कमाविसदार परगणें भोसें यांचे नांवें सगद १.

रसानगी याद.

१७१।१६१ भगवंतराव सिंदे माहूलीकर हे बंडाकडे मिळोन माहुली किल्ला घ्यावयास गेले होते, त्यांस धरून आणून किल्ले विसापूर येथें अटकेंत ठेविलें आहेत, त्यांजकडे इनामगांव व मोकासेगांव व जमिनी चालत आहेत त्यांची जप्ती करावयाची आज्ञा सदाशिव भास्कर मामलेदार ताल्लुके विसापूर यांस केली असे. येविसी सनदा.

इ० स० १८०३।४
अर्बा मयातैन व अलफ
सफर १७

१ सदाशिव भास्कर मामलेदार ताल्लुके विसापूर यास कीं, ताल्लुके मजकूर पैकीं इनामगांव व मोकासेगांवची जप्ती करून ऐवज वसूल होईल तो ताल्लुके मजकूरचे हिशेबी जमा धरणें. ह्मणोन सनद.

१ धोंडो बल्लाळ मामलेदार किल्ले लोहगड यास कीं, किल्लेमजकूर येथील सरंजामाचे महाल पैकीं इनाम जमिनी व मोकासेगांव चालत आहेत त्यांची जप्ती मशार निल्हे करतील. ह्मणोन सनद.

१ माधवराव निळकंठ मामलेदार ताल्लुके चास यांस कीं, मौजे वेताळे तर्फ खेड ताल्लुके मजकूर हा गांव दरोबस्त इनामी आहे त्याची जप्ती मशार निल्हे करतील. ह्मणोन सनद.

---

1 6. Bhagwantrao Sinde having joined the rebels proceeded to take the fort of Mahuli. He was therefore sent to prison and his property was attached.

A. D. 1803-1804.

१ रामचंद्र नारायण मामलेदार तालुके शिवनेर यांस कीं, तालुके मजकूर येथील इनामजमीन व मोकासेगांवची जती मशारनिल्हे करतील. ह्मणोन सनद.

४

रसानगी याद.

१७७|१९२ तालुके रत्नागिरी येथें बंडवाल्याकडून लोक येऊन महालांत उपद्रव करितात ह्मणोन हुजूर विदित जाहलें. सबब त्यांचे पारिपत्यास तालुके मजकुरचें नेमणुकी शिबंदी शिवाय विदेशी गाडदी लोक असामी २०० दोनशें ठेवावयाची आज्ञा तुह्मांस केली असे. तरी सदरहू लोक चांगले मर्द माणूस पाहून ठेऊन त्यांस तैनात दरमहा जमातदार कारकून सुद्धां दर आसामीस शेरा सरासरी रुपये ८ आठ प्रमाणें दरमहा अकरमाही शिरस्ता वजा करून येक महिना लोक ठेऊन बंडवाल्याकडील लोकांचें पारिपत्य करणें. महिन्यानंतर हे लोक दूर करणें. ह्मणोन नारो रामचंद्र मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवें सनद १.

इ. स. १८०३।०४.
अर्बा मयातैन व अलफ
सफर २२.

रसानगी याद.

१७८|१९५ बंडाकडील फौज व पायदळ घांटाखालीं उतरणार ह्मणोन हुजूर विदित जाहलें त्याजवरून हे सनद सादर केली असे तरी तुह्मांकडील तालुक्यांत घांट व वाटा खालीं उतरावयाच्या असतील त्या झाडें तोडून व खांचा खणून व दगड टाकून घांट व वाटा पाडून माणूस येकंदर न जाई असें करणें; आणि नेमणुकी शिबंदीपैकीं लोक घाटांनीं व वाटेवर चौकीस ठेऊन पक्का बंदोबस्त करून हुजूर लिहून पाठवणें. म्हणून मामलेदार तालुकेंहाय व संस्थानिक यांचें नांवें सनदा.

इ. स. १८०३।०४
अर्बा मयातैन व अलफ
रबिलावल २२.

१ तालुके त्रिंबक, निसबत खंडेराव निळकंठ.

१ किल्ले माहुली, निसबत गोविंदराव सदाशिव.

१ किल्ले रतनगड, निसबत भिवाजी कोलते.

१ किल्ले कुलंग व किल्ले भोपतगड व किल्ले खैराई व संस्थान पेठ निसबत खंडेराव निळकंठ.

१ मामले कोहज, निसबत खंडेराव निळकंठ.

१ किल्ले हाय, मामले कोहज, निसबत केशवराव जगन्नाथ.

---

177. Additional men were ordered to be entertained in Taluka Ratnagiri to put down the rebels who were enfesting the country.
A. D. 1803-1804.

178. Government was informed that the army of the rebels was about to cross the ghants. Orders were therefore issued to the officers of Trimbak, Siwner and to the officers of various forts as also to the chiefs of Jawar, Ramnagur, Mandvi, and Wasde to distroy the passes and roads leading down the ghants, and to keep their men to guard the passes and roads.
A. D. 1803-1804.

१ संस्थान जवार, निसबत विक्रमशहा राजे.
१ संस्थान रामनगर, निसबत रूपदे राणा.
१ संस्थान मांडवी, निसबत दुरजनसिंग.
१ संस्थान वांसदे, निसबत बक्ता रावेड.
१ किल्ले त्रिंगलवाडी ताल्लुके कावनई, निसबत मुरारजी येवले.
१ ताल्लुके शिवनेर, निसबत रामचंद्र नारायण.
१ किल्ले हाडसर, निसबत परशुराम खंडेराव.
१ किल्ले हातगड, निसबत खंडेराव त्रिंबक.

१४

रसानगी यादी.

१७९।१६६ महालानिहाय येथें गांवगन्ना बेरडांनीं रानांतून व वाटेनें व घाटांनीं उपद्रव केला आहे व दरवडे घालतात ह्मणून हुजूर विदित जाहलें, त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी तुह्मी नेमणुकी शिबंदीपैकीं लोक पाठवून महालानिहाय जेथें गांवगन्ना बेरडांनीं रानांतून व वाटेनें व घाटांनीं उपद्रव केला आहे, त्यास एकंदर उपद्रव लागो न देणें व दरवडे पडो न देणें, ह्मणोन सनदा.

इ. स. १८०३।०४.
आर्बा मय्यातैन व अलफ
रविलावल. २७.

१ राजेश्री पंत प्रतिनिधी.
१ राजेश्री पंत सचीव.
१ किल्ले सिंहगड व तर्फकर्यांत मावळ, निसबत गोविंदराव सदाशिव.
१ प्रांत पुणें, निसबत रामचंद्र नारायण.
१ प्रांत जुन्नर, निसबत बापूजी बाबाजी.
१ परगणें सुपें, निसबत जिवाजी आनंदराव.
१ परगणें फलटण, येविसी येशवंतराव पाटणकर यांस.

७

रसानगी.

१८०।२२० सरसुभा प्रांत करनाटक येथें अदूखान पठाण याणें ताल्लुक्यांत बंड केलें,

---

179. Government was informed that the Berads were infesting the various villages and roads in various Mahals. Orders were issued to the Pant Pratinidhi, the Pant Sachiv, and the officers of Poona, Junnar, Supe and Phaltan to depute some men to protect the people.

A. D. 1803-1804.

180. Andukhan Pathan with the assistance of Husen Miya Sawanurkar, Bhiwarao Timaji Dambalkar, the Desai of Sawanur, and others collected 3000 men, attacked Sawanur and made Ramchandra Anandrao and his men prisoners. Gangadharrao Govind, Ramchandra Parasharam, and Trimbakrao Raghunath were therefore directed to proceed against the insurgent and to release Ramchandrarao

A. D. 1809-10.

इ. स. १८०९।१० अशर मयातैन व अलफ जमादिलावल. १० — त्यास हुसेन मिय्या सावनूरकर व भिवराव तिमाजी डंबाळकर व कारकून निसबत हरि गोविंद फाळके व देसाई सावनूरकर येणेंप्रमाणें सामील होऊन तीन हजार जमाव करून रात्रौ दग्यानें सावनूरास छापा घालून ठाणें बसवून रामचंद्र आनंदराव यांस मंडळीसुद्धां कैद केलें. चीज वस्त, नक्त, जव्हाहीर, घोडीं, वगैरे सरंजाम लुटून घेतला ह्मणून सरसुभाकडील कारकुनांनीं हुजूर विदित केलें. त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असें; तरी तुह्मीं नेमणुकी फौजसुद्धां जाऊन बंडवाले यांचें पारपत्य करून मशारनिल्हेची मंडळीसुद्धां सुटका करून सावनूर वगैरे ठाणीं बंडवाले यांणीं घेतलीं असतील तीं मशारनिल्हेचें हवालीं करणें, व रामचंद्र आनंदराव यांची चीजवस्त, व नक्त, जव्हाहीर, घोडीं वगैरे नेलीं असेल ते जराबाजरा माघारीं देविणें. व बंडवाले यांस जे सामील जाहले असतील ते कैद करणें. आणि लिहिल्याअन्वयें पत्र पात्रतांच बंदोबस्त करून हुजूर विनंति करणें. पत्रें.

१ गंगाधरराव गोविंद यांस.
१ रामचंद्र परशुराम यांस.
१ त्रिंबकराव रघुनाथ यांस.
———
३

तीन पत्रें दिल्हीं आहेत; छ. मजकूर.

१८१।२२८ पेंढारी यांणीं हिंदुस्थानांतून नर्मदा उतरोन आलीकडे येऊन सरकार

इ. स. १८१०।११ इहिदे अशर मय्यातैन व अलफ सवाल २२ — तालुक्यांत वगैरे मनस्वी उपद्रव करीत आहेत, याजकरितां सरकारांतून त्यांचें पारिपत्य जाहले पाहिजे. यास्तव हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी फौजेनिशीं तुह्मीं पेंढारी यांचें पारिपत्यास जाण्याकरितां जलद निघोन हुजूर येणें ह्मणोन. पत्रें.

४ तुह्मांकडील फौजेपैकीं निमे फौजेस निरोप द्यावयाविसी पेशजी सनद सादर जाहली आहे; ते निमे फौज वजा करून बाकी निमे फौज घेऊन येण्याविसी.

१ बापुजी गणेश गोखले यांस नेमणुकी फौजेविसी.

३ सरंजाम फौजेविसी.

१ त्रिंबक रघुनाथ यांस.
१ कारकून दिमत, गंगाधर गोविंद यांस.
१ चिंतामणराव पांडुरंग यांस.
———
३
———
४

---

181. The Pendharis had crossed the Narbada and were harassing the Government territory. Bapuji Gokhale and others were therefore called to the Huzur with their armies for being sent against the Pendharis.

A. D. 1810-11.

१ वीरभद्रराव यांस दरोबस्त सरंजामी नेमणुकी फौजसुद्धां निघोन येणेंविसी.

५

१८२।२४९. सरकार तालुक्यांत कोठेंही बंडाचा उपद्रव होऊं नये, बंड आढळल्यास व बंडाचे मिलाफी सांपडल्यास चौकशी करून पारिपत्य कराव-

इ. स. १८१६।१७
सबा अशर मय्यातैन व अलफ
जमादिलावल १०

याचें काम जॉन फोट सरकारचे पलटणांतील सरदार यांजकडे साल मजकुरीं येकसाला सांगोन त्यांचे दिमतीचें पलटण व हुजूरची फौज बंडाचें पारपत्यास रवाना केली असे; तरी बंडाची बातमी तुह्मांस लागल्यास पलटणांतील सरदारांस कळवीत जाणें ह्मणोन. पत्रें.

१ कमाविसदार तालुके व महालानिहाय यांस.
१ जमीदार महालानिहाय यांस.

२

लष्करी खातें.

(अ) फौज.

१८३।४रुस्तुमराव पांढरे शरीफन मुलुक दिमत फत्तेसिंग भोसले यांजकडेस फौजेचे बेगमीस सरंजाम सन इसने तिस्सेनांत करार करून दिल्हा. त्यास सर-

इ० स० १७९५।९६
सीत तिसेन मय्या व अलफ
साबान १

कारचे नजरेचा वगैरे ऐवजाचा भरणा व चाकरीचा जिमा मशारनिल्हेनीं गणपतराव जिवाजी व महादाजी खंडेराव यांज-कडून हुजुर करविला. त्यास कराराप्रमाणें ऐवज फिटे तों सरंजामाचा वसूल उभयता मशार निल्हेकडे देणें ह्मणून चिटणिसीं पत्रें:—

११ महालानिहाय येथील मोकासा देखील जकात येत्रिसी जमेदारांस पत्रें:-

१ परगणें दगेटनूर.
१ परगणे कारीमुंगी.
१ तर्फ कोडलवाडी परगणे लोहगांव.

---

182. An Englishman an officer in the army of Government was sent to put down any insurrection that he might meet within Government territory and to punish the rebels, and in addition to his own regiment, other regiments were placed at his disposal. The Komavisdars were directed to give him all informatian about insurrestions that might reach them.

A. D. 1816-17.

183. Rustumrao Pandhare Sharifan mulukh was given a military Saranjam. The nuzar laviable on the grant was paid for him by Ganpatrao Jiwaji and Mahadaji Khanderao who also stood sureties for his performing the required service to Government. The revenues of the saranjam were as agreed upon ordered to be paid to Ganpatrao and Mahadaji till the amount of nuzar paid by them was liquidated.

A. D. 1795-96

१ परगणें लोहगांव.
१ परगणे नारायणखेड.
१ परगणें कवलास.
१ परगणें बाराहळी.
१ परगणे खडकें.
१ परगणें बोधन.
१ परगणे जलालपूर.
१ परगणे कल्याण निंभ.

११

२ परगणेवारपैकीं मुकाशाचे अमलाचे गांव येविसी मोकदमांस पत्रें.
१ मौजे राहिणें.
१ मौजे कुमठें.

२

१ गोविंदराव कृष्ण यास कीं, तुह्मी नबाब निजामआलीखान बहाद्दर यांसी बोलून मोंगलाईतील अमलदार व जहागीरदार यांस ताकीद करवून बंदोबस्त करून देणें ह्मणोन पत्र.

१४

चौदा चिटणीसीं पत्रें दिल्हीं असेत.

१८४।४१ बद्दल देणें. कवायती गाडदी दिमत मेस्तर बाईट इंग्रज यांस दरमहा तैनातप्रमाणें रोजमरे एक माही रसानगी यादींतील रुपये.

इ. स. १७९६।९७.
सवा तिसेन मया व अलफ.
जिल्हेज. ६.

२६२४२ माहे जमादिलाखर बावत माहे गुदस्त.
१६१९३ पलटण रफिना.
३००० खुद्द १
९०० कपितान (क्यापटन्) २ दर ४५०
१००० लेपटेन्ट (लेफटनन्ट) ४ दर २५०
२७० सरजन (सॉरजन्ट) ३ दर ९०

---

184. The details of expenses of a regiment of disciplined soldiers under Mr. Bight, an Englishman are given. The monthly payment of
A. D. 1796-97.

1	The Commandar was Rs	3000
2	Captains	900
4	Lieutenants	1000
3	Surgeons	270

The total monthly expenditure is Rs 26242.
The strength of the regiment is 1683.

७०० सुभेदार १४ दर ५०.
१६० कुमेदन २ दर ८०.
६०० जमातदार २० दर ३०.
१०५० हवालदार.
९९० प्रत ५५ दर १८.
६० प्रत ४ दर १५.

१०५० ५९.

४६० नाईक.
४३२ प्रत ३६ दर १२.
२८ प्रत २ दर १४.

४६० ३८.

१२० तंबूरची ६ दर २०.
१२० बासरीवाले ६ दर २०.
४० झांजवाले २ दर २०.
६० निशाणदार ५ दर १२.
६०९३ शिपाई ६७७ दर ९.
८४ तासची व मर्फाची असामी ७ दर १२ प्रमाणें.
१२० कारकून ३ दर ४०.
८४ भिस्ती १४ दर ६.
३६ मशालजी ६ दर ६.
४९ जासूद ७ दर ७.
१२ ढालये २ दर ६.
१६३५ तोफखान्याकडील गोलंदाज वगैरे यांस.
४८० फिरंगी ८ दर ६०.
६० जमादार २ दर ३०.
३६ हवालदार २ दर १८.
५०४ गोलंदाज ४२ दर १२.
२४० खलासी २४ दर १०.
१०२ सुतार.
६० प्रत ५ दर १२.
४२ प्रत ४ दर १०॥.

१०२ ९.

८८ लोहार ८ दर ११.

८० बेलदार १० दर ८.
४५ तबेलदार ५ दर ९.
१६३५ ११०.

१६५९३.

९३४९ नवें पलटण.

४५० कपितान [क्यापटन].
५०० लपठन [लेफटेनन्ट] २ दर २५०.
९० सरजन [सॉरजन्ट] १.
२०० सुभेदार ४ दर ५०.
१५० जमातदार ५ दर ३०.
५७६ हवालदार ३२ दर १८.
८४ नाईक ७ दर १२.
१४० तंबूरची ७ दर २०.
१२० बासरीवाले ६ दर २०.
२० झांजवाले १.
७२ भिस्ती १२ दर ६.
४३५६ शिपाई ४८४ दर ९.
८०० फिरंगी बंदुकवाले २० दर ४०.
१२० तासची व मर्फाची १० दर १२.
२०० कारकून ५ दर ४०.
२४ मशालची ४ दर ६.
५८० तुरुकस्वार.

५५ जमादार १.
५२५ स्वार १५ दर ३५.
५८० १६.

८६७ तोफखान्याकडील.

१०८ हवालदार ६ दर १८.
२८८ गोलंदाज २४ दर १२.
१२० खलासी १२ दर १०.
६० दारूवाले २ दर ३०.
२० चौधरी २ दर १०.
४९ गाडीवान ७ दर ७.
६४ बेलदार ८ दर ८.

२७ तबेलदार ३ दर ९.
३० जमातदार कारिगरांत कारखान्याकडे आहे १.
७७ लोहार ७ दर ११.
२४ चांभार ४ दर ६.

८६७ ७६

९३४९ ६९३

३०० कारकून

१५० रामचंद्र कृष्ण १.
१५० आपाजी चिमणाजी १.

३०० २

२६२४२ १६८३

१८५।१२३ जयवंतराव महार्णवर फत्तेजंग बहादर यांजकडे जातीस व फौजेचे बेगमीस सरंजाम व इनामगांव चालत होता. त्यास मशारनिल्हे सरकारचे अपराधी सबब सरंजाम व इनामगांवची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमावीस मुरारजी येवले यांजकडे सांगितली येविसी

इ. स. १८००।१८०१
इहिदे मयातैन व अलफ
मोहरम १५

× × × ×

सनदा व पत्रें.

१८६।२२७ तुम्हांकडील सरंजामी नेमणुकी फौजेपैकीं निमे फौजेस सालमजकूर अवलसालापासून निरोप द्यावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी निमे फौजेस सालमजकूर अवलसालापासून निरोप देणें. ह्मणोन सनदा.

इ. स. १८१०।११
इहिदे अशर मयातैन व अलफ
रजब २२

१ चिंतामणराव पांडुरंग यांस.
१ कारकून दिमत गंगाधरराव गोविंद यांस कीं, गंगाधरराव गोविंद मृत्यु पावले सबब त्याजकडील निमे फौजेविसी.
१ त्रिंबकराव रघुनाथ.
१ रामचंद्र परशुराम.
१ माधवराव अनंत.

---

185. Jayavantrao Maharnawar Fatejang Bahadur being under the displeasure of Government his military and personal saranjam was attached.
A. D. 1800-1801.

186. Chintamanrao Pandurang, the Karkuns of Gangadharrao Govind, (who had died), Trimbakrao Raghunath, Ramchandra Parsharam, Madhavrao Anant, and Sidojirao Naik Nimbalkar Sir Lashkar were directed to disband half the Saranjam armies kept by them.
A. D. 1810-11

१ शिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर.

६

रसानगीयादी.

लष्करी खातें.

(ब) किल्ले.

१८७।१४ किल्ले अजमनगर उर्फ बेळगांव येथील जिभेचें (निशाणाचे) काम जुनें होऊन पडलें तें नवें बांधावयाची आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन तुह्मीं विनंती केली. त्यावरून जिभेचें काम करावयाबद्दल रुपये ५००० पांचहजार किल्ल्याचे शिलकेपैकीं द्यावयाचे करून ही सनद तुह्मांस सादर केली असे. तरी सदरहू पांचहजार रुपये घेऊन इमारत चौकशीनें करणें. ह्मणोन सिद्धेश्वर महिपतराव यांचे नांवें

इ. स. १७९६।९७
सबा तिसेन मया व अलफ
रबिलावल ५

सनद १.

रसानगीयादी.

१८८।१८९ तालुके व किल्ले हाय येथील कोठ्यांच्या शिलका व गल्ला व वजन व जंगी सामान वगैरे सुद्धां इस्तकबील सन खमस तिसेन तागाईत साल गुदस्त सन आर्बा मयातैन अखेर पावेतों मामलेदार सालोसाल नेमणुके अन्वयें कसकसे राखीत आले त्याचे झाडे तपसीलवार समजले पाहिजेत. याजकरितां हे सनद सादर केली असे. तरी सनद दाखल होतांच सदरहू प्रमाण झाडे तपसीलवार तयार करून जलद हुजूर पाठवून देणें. लिहिल्याप्रमाणें लौकर झाडे न आल्यास कार्यास येणार नाहीं. ह्मणोन तालुके व किल्ले हाय येथील कारखाननीस वगैरे यांस सनदा.

इ० स० १८०४।०५
खमस मयातैन व अलफ.
जमादिलाखर १०

१०२ कारखाननीस यांस सनदा.

५ तालुके विजयदुर्ग.

१ महादाजी कृष्ण यांस जंजिरे विजयदुर्ग येविसी.

१ भिकाजी विश्वनाथ किल्ले येशवंतगड यांस.

१ संभाजी केशव किल्ले आवेलगड यांस.

१ निळो रामचंद्र गढी राजापूर यांस.

१ महादाजी राम गढी खारेपाटण यांस.

५

A. 1796-97. 187. The fort of Belgam is referred to as fort Ajamnagar.

A. D. 1804-1805. 188. Orders were issued to the officers of the various forts directing them to send returns showing what supplies of provisions and ammunitions were kept by the Mamlatdars at the forts during the preceding 10 years. The names of the forts and their officers are given.

३ तालुके देवगड.

१ बापुजी हरी यांस किल्ले देवगड व कोटकामत येविसी.

१ दिनकर शिवदेव किल्ले भगवंत गड यांस.

१ चिमणाजी बल्लाळ किल्ले रामगड यांस.

३

१ गोविंद बल्लाळ सुभा आरमार विजयदुर्ग यांस.

३ तालुके रत्नागिरी.

१ गणेश निळकंठ यांस जंजिरे रत्नागिरी व किल्ले भवानगड व गढी साठवली येविसी.

१ त्रिंबक गोपाळ किल्ले जयगड यांस.

१ संभाजी बाजी किल्ले पूर्णगड यांस.

३

७ तालुके सुवर्णदुर्ग

१ जगन्नाथ आवजी यांस जंजीरे सुवर्णदुर्ग व सुभा येविसी.

१ मुकुंद श्रीपत किल्ले रसाळगड यांस.

१ येसाजी बल्लाळ किल्ले मंडणगड यांस.

१ पांडुरंग लक्ष्मण किल्ले पालगड यांस.

१ धोंडो वासुदेव किल्ले कनकदुर्ग यांस.

१ रघुनाथ सदाशिव कोट गोवा यांस.

१ पांडुरंग चिमणाजी किल्ले सुंदरगड यांस.

७

४ तालुके अजंनवेल.

१ खंडेराव दौलत यांस किल्ले अंजनवेल व सुभा येविसी.

१ गणेश अनंत किल्ले गोवळकोट यांस.

१ जगन्नाथ मोरेश्वर किल्ले विजयगड यांस.

१ शंकराजी बाबाजी किल्ले बहिरवगड यांस.

४

२ तालुके अवचीतगड.

१ महादाजी जनार्दन किल्ले अवचितगड व सुभा येविसी.

१ महादाजी रामचन्द्र किल्ले सुरगड यांस.

२

६ प्रांत कल्याण.

१ गंगाधर गणेश किल्ले सिदगड यांस
१ हरि रामचन्द्र किल्ले बहिरवगड यांस
१ त्रिंबक विश्वनाथ किल्ले गोरखगड यांस.
१ येसाजी शिवाजी किल्ले कोथळागड यांस.
१ रामाजी नारायण किल्ले मलंगगड यांस.
१ आपाजी रामचन्द्र काटणीस कोठी सुभा व कोट दुर्गाडी येविसी.

६

१ मोरो कृष्ण किल्ले बेलापूर व परसिक येविसीं.
१ खंडेराव राम किल्ले उंदेरी तालुके मजकूर यांस
३ मामले कोहोंज
१ खंडो रघुनाथ यांस किल्ले कोहोज व सुभा येविसी.
१ त्रिंबक महिपत किल्ले आसेर यांस.
१ माहादाजी केशव किल्ले टकमक.

३

१२ तालुके वसई.
१ विठ्ठल सदाशिव यांस जंजिरे वसई व सुभा व कोट उंदरगांव व कोट तारापूर व किल्ले वज्रगड व किल्ले असाल येविसी.
१ भगवन्त खंडेराव जंजिरें अर्नाळा यांस.
१ शामराव नारायण कोट माहीम यांस.
१ विनायक जिवाजी कोट डहाणू यांस.
१ राघो महादेव किल्ले इंद्रगड यांस.
१ शामराव विनायक किल्ले बल्लाळगड यांस.
१ त्रिंबक रामकृष्ण किल्ले शेवगा
१ श्रीधर महादेव किल्ले गंभीरगड यांस.
१ आबाजी खंडो किल्ले अर्जुनगड यांस.
१ त्रिंबक तान्हाजी कोट केळवें यांस.
१ रामराव तुकाजी कोट शिरगांव यांस.
१ गोपाळ महादेव सुभा अरमार.

१२

२ तालुके रेवदंडा.
१ खंडो यादव यांस जंजिरें रेवदंडा व सुभा येविसी.
१ त्रिंबक निळाजी किल्ले कोटम यांस.

२

२ तालुके सरसगड.

१ केसो बाळकृष्ण यांस किल्ले सरसगड व सुभा येविसी.

१ काकाजी जिवाजी किल्ले मीरगड यांस.

२

२ तालुके रायगड.

१ अनंदराव बळवंत यांस कीं, किल्ले रायगड व किल्ले लिंगाणा येथील इस्तकबील सन खमस तिसेन पासोन तुम्हांकडे कारखाननिसी होती तेथ पावेतों.

१ दौलतराव सदाशिव यांस सुभा तालुके मजकूर येविसी.

२

१ गणेश मल्हार किल्ले हडसर यांस सनद.

२ तालुके मुल्हेर.

१ त्रिंबक गोविंद किल्ले मुल्हेर व किल्ले चौल्हेर व भामेर व किल्ले मोरा व किल्ले हरगड व किल्ले औरंगगड व किल्ले नबाब व सुभा येविसी.

१ (येथें कांहीं लेख लिहिणें राहिला आहे असें दिसतें.)

२

१ चिंतो गोविंद किल्ले पिसोळा यांस.

४ प्रांत राजपुरी यांस कीं, इस्तकबील सनखमस तिसेनापासून तुह्मांकडे कारकाखानानिशी होती तेथपावेतों लेहून पाठविणें येविसी.

१ बाळाजी बाबुराव किल्ले तळागड.

१ विसाजी रामजी किल्ले घोसाळा.

१ त्रिंबक सदाशिव किल्ले मानगड.

१ रामाजी गोविंद किल्ले विश्रामगड यांस.

४

१ आवजी जिवाजी किल्ले बिरवाडी व सुभा येविसी.

२ तालुके कर्नाळा.

१ बाळाजी मल्हार किल्ले विकटगड यांस.

१ नारायण रघुनाथ किल्ले कर्नाळा व सुभा येविसी.

२

१ रघुनाथ कृष्ण किल्ले माहुली व किल्ले भंडारगड व सुभा येविसी.

२ किल्ले पुरंदर व वज्रगड.

१ मल्हार सदाशिव किल्ले पुरंदर यांस.
१ सदाशिव माधवराव किल्ले वज्रगडयांस.

२

४ तालुके शिवनेर.

१ धोंडो लाडको किल्ले शिवनेर व किल्ले हरिश्चंद्र व किल्ले कुंजरगड व सुभा येविसीं.
१ लक्ष्मण निळाजी किल्ले चांवड यांस.
१ मोरो मैराळ किल्ले जिवधन यांस
१ खंडो शंकर गढी जुन्नर यांस.

४

२ तालुके धोडप.

१ चिमणाजी राम किल्ले घोडप व किल्लेकाचणा व किल्ले कालेदहेर किल्ले कात्रा व किल्ले माणिकपुंज व किल्ले देहरसानी व किल्ले अचक व किल्ले मार्कंडा व किल्ले कणेरा व किल्ले चवळा व जवळा व सुभा येविसी.
१ बापुजी गोपाळ किल्ले अहिवता.

२

२ तालुके कावनई.

१ पांडुरंग सूर्याजी किल्ले कावनई किल्ले गडगडा व सुभा येविसी.
१ महादजी बल्लाळ किल्ले त्रिगलवाडी.

२

२ तालुके त्रिंबक.

१ येसाजीराम किल्ले त्रिंबक व किल्ले वाघेरा व सुभा येविसी.
१ महादाजी खंडेराव किल्ले भास्करगड यांस.

२

१ महिपत पांडुरंग तालुके राजमाची यांस किल्ले मनरंजन व किल्ले श्रीवर्धन व सुभा येविसी.

१ कृष्णाजी गोविंद किल्ले विसापूर व सुभा यांस.

२ किल्ले कुरंग व भोपतगड.

१ नारो भगवान किल्ले कुरंग यांस.
१ बचाजी संभाजी किल्ले भोपतगड यांस.

२

१ कृष्णाजी नारायण किल्ले वंदन यांस.
१ धोंडो खंडेराव किल्ले चंदन यांस.
१ भिवराव भगवंत किल्ले दातेगड यांस.
१ कृष्णराव महादेव किल्ले नांदागिरी यांस.
१ पुंडलीक भिवराव किल्ले परळी यांस.
१ धोंडो नारायण किल्ले नारायणगड यांस.
१ काशिनाथ यादव किल्ले काशीगड यांस.
१ मल्हार कमाजी किल्ले शिवीगड यांस.
१ रामचंद्र परशुराम किल्ले सोलापूर यांस.
१ भैराळ खंडेराव किल्ले अजमनगर उर्फ बेळगांव यांस.
१ सदाशिव रामचंद्र यांस किल्ले आंवढा व किल्ले अडगड व व किल्ले बितिगांव व किल्ले पट्टा व सुभा येविसी सनद.
१ बाळाजी सदाशिव किल्ले घनगड यांस.
१ मोरो गोविंद किल्ले डभई यांस.
१ कृष्णाजी अनंत कारकून निसबत कोठी किल्ले सातारा यांस.
१ त्रिंबक वामन किल्ले हर्ष यांस.
३ तालुके रतनगड.
  १ रघुनाथ उद्धव किल्ले कल्लोळगड यांस.
  १ केसो बाजी किल्ले रतनगड यांस.
  १ सुंदर नारायण किल्ले अलंग व मदनगड यांस.
  ———
  ३
१ विठ्ठल वामन किल्ले महिमतगड यांस.
१ बाळाजी मोरेश्वर किल्ले रतनगड तालुके अवाचितगड यांस.
१ दौलतराव लक्ष्मण किल्ले सोनगिरी तालुके अवाचितगड यांस.
———
१०२

११ मामलेदार यांचे नांवें.
  १ श्रीपतराव धोंडदेव किल्ले देहर यांस.
  १ किल्ले कणेरा निसबत धोंडो गोविंद यांस.
  १ किल्ले पेडका येथील सनद कारकून दिमत चिंतामण हरि यांचेनावें.
  १ किल्ले कुकरमुंढे निसबत बाळाजीराम यांस.
  १ किल्ले वैराटगड निसबत धोंडो गोविंद यांस.
  १ किल्ले खेराई निसबत मनोहरगीर यांस.

१ किल्ले चाकण कारकून दिमत गोविंदराव सदाशिव यांचे नांवें सनद.
१ किल्ले प्रतापगड निसबत खंडोजी जाधव यांस.
१ किल्ले नाथवडा निसबत गणपतराव विश्वनाथ यांस.
१ कोठी मुक्काम सातारा कारकून दिमत वैजनाथभट भागवत यांचे नांवें सनद.
१ ठाणे होनगुंद निसबत केशवराव बाळकृष्ण यांस.

११

११३

येकूण येकशे तेरा सनदा दिल्या असेत. रसानगी यादी.

(३) मुलकी खातें.

(अ) जमीनीची पाहणी व जमाबंदी.

१८९।३३ कसबें खेड तर्फ मजकूर प्रांत जुन्नर येथील कमावीस बाबाजी वासुदेव यांजकडे आहे. त्यास मशारनिल्हेनीं साल मजकूरचा वसूल येणें त्यापैकीं हल्लीं दर बिघा रुपये ३। सवातीन रुपयांची पट्टी करून वसूल चालीस लाविला असतां तुह्मी पटींचे वसुलांस दिकत केली आहे ह्मणून हुजूर विदित जाहलें. त्याजवरून पट्टीचे वसुलाचे कामास गाडदी दिमत विनायक नारायण असामी २ दोन पाठविले असेत तरी पट्टीचा वसूल सुरळीत देऊन पुढें मशारनिल्हेसी रुजू राहून अमल सुरळीत देणें. ह्मणोन मोकदमसमस्त दाहीजण कसबें मजकूर यांचे नांवें सनद १.

इ. स. १७९६।९७
सबा सितेन मया व अलफ
जिलकाद ५.

रसारगी भास्कर नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

१९०।१२२ प्रांत जुन्नर येथील मामलत सालमजकुरीं खंडेराव राम यांजकडे आहे त्यास प्रांत मजकुरचे अजमासास गल्ला किल्लेहाय यांजकडे सालाबाद द्यावयाची नेमणूक आहे. त्यास सालमजकुरीं सिंदे व होळकर व जिवाजी यशवंत यांचे वगैरे फौजेचे उपद्रवामुळें महालाची खराबी जाहली. व

इ० स० १८००।०१
इहिदे मयातैन व अलफ
मोहरम १५

---

189. The land assessment at Kasba Khed was fixed at Rs. 3-4 per bigha The village officers having obstructed the collection of reveue. Two Gardis were sent to assitt the Komavisdar in recovering the revenue and the village officers were directed to co-operate with them and pay the Government dues.

A. D. 1796-97.

190. Owing to the loss inflicted on the ryot in Prant Junnar by the armies of Jiwaji Yeshwant, Scindia and the Holkar, they were permitted to commute the payment of grain to the forts into money.

A. D. 2800-I801.

कांहीं गांवची वस्ती उठोन गेली. याजमुळें गल्ला रयतेस द्यावयास ताकद राहिली नाहीं. सबब सालमजकुरीं एकसाला गल्ल्याची किंमत नक्त देविली पाहिजे ह्मणोन मशारनिल्हेनीं विनंती केली. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी प्रांत मजकुरचे अजमासास किल्ले हायचे बेगमीस गल्ला द्यावयाची नेमणूक सालाबाद आहे त्याप्रमाणें गल्ल्याचे किंमतीबद्दल सालमजकुरीं एकसाला नक्त घेणें येविशी सनदा.

१ रामचंद्र नारायण तालुके शिवनेर यांस कीं तालुके मजकूर येथील बेगमीस किल्ले हडसर खेरीज करून प्रांत मजकूर येथील सनतिसातिसेनचे अजमासास नेमणूक गल्ला कैली खंडी.

१०२।।।- कित्ता.

८ मोजे टाकळीबाजी तर्फ निघोज हा गांव परभारे कमाविसीनें होता तो सुभाकडे दिला तेथील गल्ला.

११०।।।

पैकीं वजा खंडी

१७ दुमाले व इनाम व कमाविसीनें गांव सरकारांतून दिल्हे देहे ६ तेथील गल्ला तालुके मजकुराकडे पावत होता. तो प्रांत मजकुरचे सन मजकुरचे आजमासाला वजा केला आहे. तो कैली.

१० सन तिसा तिसेनचा प्रांत मजकुरचा अजमास जाहलीयावर मौजे मजकुरीं तर्फ कर्डे हा गांव सरंजामास सरकारांतून दिल्ला. तेथील गल्ला तालुके मजकुराकडे पावत होता. तो वजा पडावयाचा.

२७ खंडी.

बाकी गल्ला कैली खंडी ८३।।। पावणेचवऱ्यायशी खंडी तीन हजार सहाशें पावणेंआडसष्ट रुपये किंमतीचा सालाबाद द्यावयाची नेमणूक आहे. त्यास सालमजकुरीं एक सालास सदरील गल्ल्याची किंमत नक्त तालुके मजकुराकडे देविली पाहिजे म्हणोन विनंति केली. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी प्रांत मजकुरचे अजमासास तालुके मजकुर येथील बेगमीस गल्ला कैली खंडी ८३।।। पावणेंचवऱ्यायशी खंडी गल्ला किंमत रुपये ३६६७।। तीन हजार सहाशें पावणेअडसष्ट रुपये किंमतीचा द्यावयाची नेमणूक सालाबाद आहे. त्याप्रमाणें गल्ल्याचे किंमतीबद्दल सालमजकुरीं एक साला नक्त घेणें म्हणोन.

१ सदाशिव भास्कर मामलेदार तालुके विसापूर यांस कीं, किल्ले विसापूर तालुके मजकूर येथील बेगमीस प्रांत मजकूर येथील सन तिसा तिसेनचे आजमासास नेमणूक गल्ला खंडी १९ पैकीं वजा दुमाले व इनाम व कमाविसीनें गांव सरकारांतून दिल्हे देहे ६ येथील गल्ला किल्ले मजकुराकडे पावत होता. तो प्रांत मजकूरचे सनमजकूरचे अजमासास वजा केला आहे. तो गल्ला खंडी एक बाकी गल्ला कैली खंडी १४ चवदा खंडी पांचशें सोळा रुपये किंमतीचा सालाबाद द्यावयाची नेमणूक आहे. त्यास सदरहु गल्लयाची किंमत नक्त तालुके मजकुराकडे देविली पाहिजे म्हणोन मशारनिल्हेनीं विनंती केली त्याजवरून प्रांत मजकूरचे अजमासास किल्ले मजकूर येथील बेगमीस गल्ला कैली खंडी १४ चवदा खंडी गल्ला किंमत रुपये ५१६ पांचशें सोळा रुपये किंमतीचा द्यावयाची नेमणूक सालाबाद आहे. त्याप्रमाणें गल्लयाचे किंमतीबद्दल सालमजकुरीं एक साला नक्त घेणें म्हणोन.

१ परशुराम खंडेराव मामलेदार किल्ले हडसर यांस कीं, किल्ले मजकूर येथील बेगमीस प्रांत मजकूर येथील सन तिसातीसेनचे अजमासास गल्ला कैली खंडी तीस एक हजार तीनशें साडेतीन रुपये किंमतीचा सालाबाद द्यावयाची नेमणूक आहे. त्यास सालमजकुरीं एक सालास सदरहु गल्लयाची किंमत नक्त किल्ले मजकुराकडे देविली पाहिजे ह्मणोन मशारनिल्हेनीं विनंती केली त्याजवरून प्रांत मजकुरचे अजमासास किल्ले मजकूर येथील बेगमीस गल्ला कैली खंडी ३० तीस खंडी गल्ला किंमत रुपये १३०३॥ एकहजार तीनशें साडेतीन रुपये किंमतीचा द्यावयाची नेमणूक सालाबाद आहे त्याप्रमाणें गल्लयाचे किंमतीबद्दल सालमजकुरीं एक साल नक्त घेणें ह्मणोन.

३

रसानगीयादी.

---

३ मुलकीखातें.

(ब) मामलेदार, कमाविसदार, जमीनमहसुलाचे मक्तेदार, व खोत.

१९१।४९ परगणें येरंडोल वगैरे महाल येथील सालगुदस्त सन सबा तिसेनचे जमाबं-

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
जिल्हेज १७

दीचा ठराव सरसुभा प्रांत खानदेश निसबत व्यंकटराव नारायण यांचे विद्यमानें करून द्यावा. तें न करितां तुम्हींच जमाबंदीचा ठराव केला ह्मणून कळलें. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी सरकारांतून तुमचे अजमासास सरसुभाहून जमाबंदीचा (ठराव) करावयाचा करार जाहला असतां तुम्हीं त्यांचे इतल्याखेरीज जमाबंदी केलीत हें उत्तम न केलें. तरी हल्लीं जमीदारसुद्धां तुम्हीं सरसुभा रूजू होऊन जमाबंदीचे कच्चे कागदपत्र समजाऊन देऊन मशारनिल्हे चौकशीनें जमाबंदीचा वगैरे ठराव करून देतील त्याप्रमाणें वर्तणूक करणें. व जमीदार वगैरे यांचे हक्क रुसुमाबद्दल दरोबस्त उत्पन्नाचा ऐवज सालगुदस्ताचा एकसाला सरकारांत द्यावयाचा त्याची महाली चौकशी करून ऐवजाचा आकार पाहून त्यांपैकीं तुमचे विद्यमानें सरकारांत ऐवज आला असेल तो वजा होऊन बाकी निघेल ते सरसुभा द्यावयाची आज्ञा केली असे. तरी तुम्हीं जमीदार व पाटील कुळकर्णी यांस ताकीद करून उत्पन्नाचे कच्चे दाखल्याचे कागदपत्र समजाऊन देवऊन कसरचे ऐवजाचा वसूल सरसुभाकडे देवणें ह्मणोन घनःशाम त्रिंबक कमाविसदार परगणे मजकूर वगैरे महाल यांचे नांवें

सनद १.

परवानगीरुबरु.

१९२।१४२. खंडेराव निळकंठ मामलेदार महालानिहाय तालुके वसई यांनीं हुजूर विदित केलें कीं, तालुके मजकूर येथील महालानिहायची वसूल बाकी समजवण्याविसीं अंताजी गंगाधर फडणीस तालुके मजकुर यांस सांगत असतां समजावीत नाहींत. तेव्हां ऐवज कोणाकडे किती येणें हें समजत नाहीं. हुजूर रसदेचे भरण्याचा नेट. वसूलबाकी समल्याखेरीज महालाचा ऐवज हातास येत नाहीं. कदाचित एखाद्या महालकरी यांजपासून रुजुवात करून वसूल बाकी समजून बाकीचे ऐवजाचा फडशा पोत्यास करून घेतला असतां त्या ऐवजाचे पोत्याचा जाब देत नाहींत, व महालावर शिबंदीस चिठ्या द्याव्या तरी अखेरीचे दिवस लोकांस

इ० स० १८०१–०२.
इसन्ने मयातैन व अलफ
मोहरम ७.

---

191. Ganesh Trimbak, Kamavisdar of Pargana Eraudol was reprimanded for his settling the Jamabandi of the Paragana without referance to the SirSoobha as he should have done according to the instructions contained in the budget of the Paragana. He was directed to take all detailed papers as also the jamidars to the Sirsoobha and to get the jamabandy fixed by him. One year's value of the Huks and Rusums of the jamidars in the province was ordered to be recovered and paid to the Sirsoobha.

A.D. 1897-98.

192. Khanderao Nilkanth, Mamlatdar of Bassein complained that the Fadnis of the Taluka refused to furnish infirmation regarding the arrears of revenue from the several Mahals or to show him the accounts and that he experiensed great difficulty on recovering the arriars. The Fadnis was ordered to show the accounts and to supply the required information to the Mamlatdar.

A. D. 1801-1802.

हिसके फार बसतात. सबब पोत्यावर चिठ्या करावयाविसी सांगत असतां मशारनिल्हे आग्रहानें महालावर वराता देतात व रोजकीर्द दररोज दाखवावयाची चाल असतां दाखवीत नाहींत, व सालगुदस्तां व सालमजकूरचे जमाखर्च राहिले होते ते अद्यापि जाहले नाहींत. येविसी आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन. त्याजवरून हे सनद सादर केली असे तरी महालची वसूलबाकी व कीर्द रोजचे रोज मामलेदार यांस दाखवीत जाणें. शिबंदीस पोत्यावर चिठ्या व महालावर वराता द्यावयास मामलेदार सांगतील त्याप्रमाणें देत जाणें. व पोत्यास ऐवज येत जाईल तो जमा धरून जाब देत जाणें. साल गुदस्ता व सालमजकुरचे जमाखर्च व्हावयाचे राहिले असतील त्यास वाजवी जमाखर्च करावयाचे ते करणें. ज्यांत लढा असेल ते हुजूर समजावणें. मामलेदार महालचे वहीवाटीचे कागदपत्र आकारून हुजूर आणतील ह्मणोन अंताजी गंगाधर फडणीस तालुके वसई याचे नांवें. सनद.

रसानगीयाद.

१९३।२४४ तालुके व महालानिहाय वगैरे येथील खाशांकडील खासगी अंतस्था बाबद हल्लीशिक्का ऐवज घ्यावयाचा करार केला. त्याचा हुजूर सरकारांत पोताभरणा करून जाब घेणें ह्मणोन मामलेदार यांजवर वराता जाहाल्या. त्यावरून त्यांणीं साल मजकूर सन अर्बा अशर मय्यातैनांत पोताभरणा केला. तेजमा हल्लीशिक्का:— रुपये.

इ० स० १८१३।१४
अर्बा अशरमयातैन अलफ
सवाल २९.

४०००० तालुके रायगड निसबत परशुराम केशव याजकडे सालगुदस्त सन सलास अशर मया तैनचा ऐवज घ्यावयाचा करार केला. त्याचा हुजूर सरकारांत पोता भरणा करून जाब घेणें ह्मणोन छ ४ जमादिलाखर साल गुदस्त सन सल्लास अशर मयातैनांत वरात जाहली. त्याजवरून मशारनिल्हे यांनीं साल मजकुरीं भरणा केला. ते जमा गुजारत परशुराम आबाजी सोमण. रुपये.

७३२९ माहे जमादिलाखर उर्फ ज्येष्ठ मास.

१३६७५ माहे रजब उर्फ आषाढ मास हस्तें विठोजी मोरा दिमत सोमण मशार निल्हे.

११००० माहे साबान उर्फ श्रावण मास हस्तें विठोजी मोरा दिमत सोमण मशार निल्हे. रुपये.

८००० छ. ९ रमजान उर्फ भाद्रपद हस्तें हरि बच्याजी दिमत सोमण मशार निल्हे.

४००००

193. Orders were issued to the various Mahals to remit the secret money agreed to be paid by the Komavisdars to the Peshwa's private purse. The total was Rs. 383600.

A. D. 1813-14.

५५००० परगणे डभई प्रांत गुजराथ निसबत धोंडो विश्वनाथ.

२१५००० निसबत त्रिंबकजी डेंगळे यांजकडे सालगुदस्त सन सल्लास अशर मय्यातैनचा ऐवज द्यावयाचा करार केला. ते रुपये.

६११६५० निसबत सदाशिव माणकेश्वर. रुपये.

८९५० निसबत मल्हार बाजी याजकडे सन इसन्ने अशर मय्यातैनचा ऐवज येणे तेबद्दल वरात रुपये ८९५०. येकूण आठ हजार नऊशें पन्नास रुपयांचा हुजुर सरकारांत पोता भरणा करून जाब घेणें ह्मणोन छ० १ सवाल साल मजकुरीं वरात जाहाली. त्यावरून मशार निल्हे यांनीं भरणा केला. छ. ५ सवाल उर्फ आश्विन मास हस्तें येसाजी देवराव टेंभुरणीकर दिमत सदाशिव माणकेश्वर रुपये.

३००० परगणे इंदापूर निसबत मल्हार मुकुंद यांजकडे सन इसन्ने अशर मय्यातैनचा ऐवज येणें तेबद्दल वरात रुपये ३००० येकूण तीन हजार रुपयांचा हुजूर सरकारांत पोता भरणा करून जाब घेणें म्हणोन छ १ सवाल साल मजकुरीं वरात जाहली. त्यावरून मशार निल्हे यांनीं भरणा केला. ते हस्तें येसाजी देवराव टेंभुरणीकर दिमत सदाशिव माणकेश्वर माहे सवाल उर्फ अश्विन मास रुपये.

३८३६००

---

४ इतरकर.

(अ) जिनसांच्या खरेदीविक्रीवरील कर.

१ मोहाचीं फुलें.

१९४।१२७ दोराबजी रतनजी पारशी वस्ती कसबें बलसाड प्रांत गुजराथ याणें कसबें पुर्णे येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, मोहाचीं फुलें बिछायती कसबे बलसाड येथें विकावयास आणितात तीं माझे दुकानीं विकावीं, दुसरें कोणीं घेऊं नये व विकूं नये. याप्रमाणें करून मजपासून जीवन माफक नजर घेऊन पेस्तर सालापासून मक्ता दर साल पन्नास रुपये करार करून दिल्हा पाहिजे. म्हणोन त्याजवरून कसबे मजकुरीं मोहाचीं फुलें तूंवा आपले दुकानीं घेऊन विकावीं. दुसरे कोणी घेऊन विकूं नये. याप्रमाणें ठराव करून त्याबद्दल पेस्तर

इ० स० १८००।१८०१
इहिदे मयातैन व आलफ.
मोहरम २२

194. At the request of Dorabji Ratanji Parsi of Balsad in Gujarath, the Right of purchasing and selling Mowra flowers at Kasbe Balsad was given to him on condition of his paying a fee of Rs. 50 annually to Government.

A. D. 1800-1801.

सालापासून मक्ता दरसाल रुपये ५० पन्नास रुपये सरकारांत घ्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी कसबे मजकुरीं मोहाचीं फुलें बिछायती याजपासून घेऊन आपले दुकानीं विकीत जाणें, आणि पेस्तर सालापासून दरसाल मक्ता पन्नास रुपये सरकारांत कसबे मजकूरेच कमाविसदार यांजकडे देत जाऊन सदरील उदीम करून सुखरूप राहणें. यासंबंधें तुजकडे नजरेचा ऐवज घ्यावयाचा करार केला ते रुपये ३०० तीनशें रुपये सरकारांत भरणा करून जाब घेणें. म्हणोन पारशी मजकूर याचे नांवें छ ६ जिलकाद सनद १.

१ सदरहू अन्वयें २.

१ बाळोजी कुंजीर कमाविसदार परगणें बलसाड यास कीं, सदरहु मक्त्याचे पन्नास रुपये दरसाल घेऊन परगणें मजकुरचे हिशेबीं जमा करीत जाणें म्हणोन सनद.

१ जमीदार परगणें मजकुर यांस सदरहु अन्वयें चिटणीसी पत्र.

२ ३

रसानगी यादी.

५. गांवचे व महालाचे वतनदार.

१९५।६२ मौजे आंबे व मौजे वरखेडें परगणें वण येथील कुळकर्णी मैराळ त्रिंबक यांस

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ.
जिलकाद २४.

पोटीं संतान नाहीं असें समजोन मल्हार खंडेराव रवळगांवकर यांणीं हरदुगांवचे कुळकर्णाचा कागद करून घेतला त्यास वतनदारीचा शिरस्ता पाहतां मालीक वतनदार वतन द्यावयास सिद्ध जहाल्यावर अवलाद व अफलादीचा वंश व वतनाचा हकशाई असेल त्यास अगोदर विचारावें तें न करितां कुळकर्णाचें खरेदीखत करून घेतलें. मैराळ त्रिंबक याचे अफलादीचा वंश पाहतां जगजीवन चौडाजी याचा दोहीत्र आंबादास कुळकर्णी मौजे राजापुर व त्रिंबक जगजीवन यांचा दोहीत्र गोविंद राव निंबाजी या उभयतांस व शिवधेडे यांस न विचारितां खरेदी करून घेतलें. व जमीदार यांच्या साक्षी जबरदस्तीनें करून घेतल्या व गाईकवाड पाटील यांच्या साक्षी करून मागत होते, परंतु त्यांणीं करून दिल्या नाहींत ह्मणोन हुजूर विदित उभयतां दोहित्र यांणीं केलें. त्याजवरून हरदुगांवचे कुळकर्णाचे वतनाची जप्ती करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी कुळकर्णाची जप्ती उत्पन्नाचा आकार होईल तो सरकारांत पावता

195. Mairal Trimbak the Kulkarni of Ambe and Warkhede in Pargana Wan having no son, sold his watan to Malhar Khanderao Rawalgaumkar. The consent of the descendants of the watandar in the female line or of the watandars' kinsmen was not obtained. The descendants in the female line therefore protested against the sale. The watan was therefore ordered to be attached.

A. D. 1797-98.

करीत जाणें व खळगांवकर यांणीं कुळकर्ण घेतल्यापासून त्यांजकडे उत्पन्नाचा ऐवज गेला असेल तो माघारा घेऊन सरकारांत पावता करणें ह्मणोन बाणाजी शेव्ये पागा याचे नांवें सनद. १.

सदरहु अन्वयें चिटणीसीं पत्रें. ३

१ रामचंद्र हरि यांस.

१ व्यंकटराव गंगाधर यांस.

१ मल्हार खंडेराव खळगांवकर यांस कीं, इस्तकबीलपासून कुळकर्णाचें उत्पन्न जाहलें असेल तें देऊन तुम्हीं कागदपत्र घेऊन हुजूर येणें ह्मणोन पत्र.

३ ४

एक सनद व तीन पत्रें दिल्हीं असेत.

रसानगीयादी.

बाणाजी शेव्ये याचे नांवें जतीच्या सनदा दिल्या होत्या त्या माघाऱ्या घेऊन खंडो अनंत यांचे नांवें सनदा लिहून देणें ह्मणोन परवानगी रुबरू. रसानगी चिंतो वामन कारकून निसबत दप्तर.

---

६. इतर मुलकी नोकर.

१९६।३८ रामाजी महादेव सहस्रबुद्धे यांणीं सन अर्बातिसेनांत पाऊस पाडावयाचा नेम केला होता त्याप्रमाणें पडला. सबब दोनशें रुपये सालीना तैनातीची असामी तालुके कित्तुराकडे सालगुदस्त करार करून दिल्ही आहे. त्याप्रमाणें करार असे तरी सदरहु प्रमाणें तैनात सालीना २०० दोनशें रुपये तालुके मजकूर पैकीं पाववीत जाणें ह्मणोन आनंदराव रामचंद्र यांचे नांवें सनद. १.

इ० स० १७९६।९७
सवा तिसेन मया व अलफ
जिल्हेज २

रसानगी यादी.

१९७।६०. कारकून निसबत दप्तर यांचे तांदुळ वगैरे जिन्नस खेरीज फिरंगाण कोंकणांतून हरएक घाटें व गल्ला देशांतून खरेदी करून एकदम पुण्यास आणतील त्यांस आणूं देणें जकातीचा तगादा न करणें म्हणोन सालगुदस्ताप्रमाणें सालमजकुरीं. दस्तकें.

इ. स. १७९७।९८.
समान तिसेन मया व अलफ
जिलकाद ६.

---

196. Ramji Mahadeo predicted that there would be sufficient rainfall in A. D. 1793-94. The prediction having been fulfilled, he was given an appointment worth Rs. 200 a year in Taluka Kittoor.

A. D. 1796-97.

197. This gives a list of the Karkuns employed in the Daftar to whom passes exempting their imports from octroi were issued.

A. D. 1797-98.

निसबत चालतें दप्तर.	दस्तकें.	तांदुल वगैरे खंडी.	बैलसर.
विष्णु महादेव.	२	५	६०
गोविंदराव बाजी जोशी.	१	५	५०
त्रिंबक लक्ष्मण सिधये.	३	३८	५५
पांडुरंग कृष्ण गोडबोले.	२	३०	३००
त्रिंबकराव नारायण परचुरे यांचे तांदुळ.	२	५	५०
मोरो बापुजी फडके.	३	१८	१८०
भास्कर विश्वनाथ सोहनी.	१	१	१०
गणेश राम बापट.	१	१	१०
गंगाधर बाबाजी जोशी.	२	४	२०
रामचंद्र गोविंद पेंडसे.	१	१	१०
गोपाळ कृष्ण बिवलकर.	१	२	२०
त्रिंबक आपाजी लागु.	१	२	२०
माहादाजी बाबुराव लिमये.	१	२	२०
बाळाजी मल्हार बापट (मल्हार राम मृत्यु पावले सबब पुत्राचे नांवें.	१	३	३०
रघुनाथ सदाशिव शेवडे.	१	२	२०
बाळाजी नारायण शेवडे.	१	२॥	२५
रामचंद्र हरि ढवळे.	१	३	३०
रामचंद्र बाजी पंडित (बाजी अनंत मृत्यु पावले सबब पुत्राचे नांवें.)	१	१	१०
धोंडो केशव काळे.	१	१	१०
कृष्णाजी राम चोळकर.	१	१	१०
मोरो महादेव जोशी.	१	१	१०
महादाजी विश्वनाथ दातार.	१	१	१०
बाळाजी महादेव मोघे.	१	१	१०
शिवराम शंकर जोशी.	१	१	१०
अंताजी गोविंद आपटे.	१	२	२०
सदाशिव बल्लाळ भिडे.	१	२	२०
मोरो कृष्ण गोडबोले.	१	२	२०
कृष्णाजी तुकदेव वृद्ध जाहले सबब पुत्राचे नांवें.			

जनार्दन लक्ष्मण सहस्त्रबुद्धे.	१	१॥	१५
बाबुराव अनंत करमरकर.	१	२	२०
सदाशिव अनंत अभ्यंकर.	१	१	१०
आबाजी बल्लाळ आगाशे.	१	२	२०
मोरो महादेव गपचुप.	१	१॥	१५
दिनकर अनंत.	१	५	५०
चिमणाजी बाबाजी भट.	१	१॥	१५
नारो रामचंद्र काळे.	१	१	१०
शिवराम बल्लाळ.	१	१	१०
मोरो विष्णु गुणे.	१	१	१०
गणेश कृष्ण पेणशे यांचे तांदूळ.	२	४	४०
विसाजी भास्कर जोशी.	१	१	१०
राघो महादेव लिमये.	१	२	२०
लक्ष्मण अनंत करमरकर.	१	१	१०
काशीनाथ बाजी दात्ये.	१	१	१०
बाजी लक्ष्मण मृत्यु पावले. सबब पुत्राचे नांवें.			
बापुजी माणकेश्वर शालिग्राम.	१	१	१०
गणेश बल्लाळ फाटक.	१	२	२०
बाजी गंगाधर परचुरे.	१	१॥	१५
विठ्ठल लक्ष्मण कोकणांतून अगर मावळांतून आणतील त्याविसी.	१	२	२०
सदाशिव चिंतामण फडके.	३	३०	३००
गंगाधर भिकाजी पाळंदे.	२	१०	१००
बळवंत बाबुराव.	६	१३	१७०
राघो नारायण गुणे.	१	१	१०
धोंडो सदाशिव ओक.	१	१	१०
सदाशिव बल्लाळ लेले.	२	८॥	८५
बापुजी बल्लाळ लेले.	२	८॥	८५
रामचंद्र बल्लाळ शेवडे.	१	१	१०
महादाजी अबाजी विद्वांस.	१	१	१०
त्रिंबक शंकर सोवनी.	१	१॥	१५
बाजी नारायण आगाशे.	१	१	१०

कृष्णाजी चिंतामण सोवनी.	१	१	१०
मोरो लक्ष्मण ठाकूर.	१	३	३०
गोविंद मल्हार भाभडे.	१	२	२०
केसो विश्वनाथ टिळक.	१	२	२०
बाळाजी हरि ढवळे.	१	१	१०
विनायक मोरेश्वर मेहेंदळे.	१	२॥	२५
महादाजी नारायण बापट.	१	१	१०
लक्ष्मण बाबाजी करंदीकर.	१	१	१०
भिकाजी नारायण भातखंडे.	१	१	१०
रुद्राजी नारायण करमरकर.	१	२	२०
बापुजी नारायण परचुरे.	१	२	२०

लक्ष्मण महादेव जोशी यांचे नांवें कारकून सिलेदारीचे असामीवार दस्तक पावत होते. त्यास मशारनिल्हेची असामी सालमजकुरापासून चालते दप्तराकडे करार करून दिल्ही सबब सदरहु दस्तक दप्तरचे असामीकडे करून दिल्हे असे.

भगवंत अनंतराव.	१	१	१०
महादाजी बल्लाळ साठे.	१	९	५०
आनंदराव गोपाळ जोशी.	१	५	५०
२२६।१९१ वेदशास्त्र संपन्न राजेश्री बालशास्त्री दीक्षित टोंकेकर यांणीं हुजूर वाईचे मुक्कामीं विदित केलें कीं, त्रैलौक्यपावनीं श्रीगोदावरी प्रीत्यर्थ अनेक स्थानीं प्रतिदिनीं ब्राह्मण भोजन होऊन प्रतिवर्षीं महत् उत्सव व्हावा, या कार्याविषयीं तपोनिधि मनोहर देव पूर्णपात्रीं योजिले आहेत. तरी या खर्चाकरितां स्वराज्यांत माहालानिहाय सर्व देशीं प्रतिवर्षीं प्रतिगृहीं धान्यपुरित पूर्णपात्र व एक आणा दक्षणा याप्रमाणें सरकारांतून नेमणूक करून दिल्ही पाहिजे. ह्मणोन त्याजवरून मनास आणितां श्रीगोदावरी सेवन सर्वांशी श्रेयस्कर जाणोन हे सनद सादर केली असे. तरी श्रीगोदावरींचें पूर्णपात्र कैली एक पायलीचे घेऊन येतील त्यांस प्रतिवर्षीं प्रतिगृहीं धान्यपुरित पूर्णपात्र व एक आणा दक्षणा देत जाणें. या सनदांची प्रती लिहून घेऊन अस्सल सनदा भोगवटीयांस परतोन देणें, ह्मणोन सनदा व पत्रें.

इ. स. १८०४।१८०५
खमस मया तैन व अलफ
रविलावल ६.

२ सनदा.
१ मोकदम महालानिहाय यांस.
१ कमावीसदार वर्तमान व भावी महालानिहाय यांस.
२

१ जमीदार महालानिहाय यांस चिटणीशी पत्र.
३

226. At the request of Balshastri Dixit Tokekar orders were issued to the officers of various Mahals in the Peshwa's territory to cause each house owner to give to the devotee Manohar Dev grain sufficient to fill his pot and one anna for the purpose of feeding Brahmans and celebrating annual festivals in honour of the secred river of Godavari.

A. D. 1804-05.

रसानगीयादी.

छ० २७ जमादिलावल

वेदशास्त्र संपन्न राजेश्री बाळशास्त्री दीक्षित टोकेकर यांणीं हुजूर वाईचे मुक्कामीं विदित केलें कीं, त्रैलोक्य पावनीं श्रीगोदावरी प्रीत्यर्थ अनेक स्थानीं प्रतिदिनीं ब्राह्मण भोजन होऊन प्रतिवर्षीं महत् उत्सव व्हावा या कार्याविषयीं तपोनिधि मनोहरदेव पूर्णपात्रीं योजिले आहेत. तरी या खर्चाकरितां स्वराज्यांत महालानिहाय सर्व देशीं प्रतिवर्षीं प्रतिगृहीं धान्य पुरित पूर्णपात्र व एक आणा दक्षणा याप्रमाणें सरकारांतून नेमणूक करून दिली पाहिजे; ह्मणोन त्याजवरून मनास आणितां श्रीगोदावरी सेवन सर्वांशीं श्रेयस्कर जाणोन हे सनद सादर केली असे. तरी श्रीगोदावरीचे पूर्णपात्र केली एक पायलीचें घेऊन येतील त्यास प्रतिवर्षीं प्रतिगृहीं धान्यपुरित पूर्णपात्र व एक आणा दक्षणा देत जाणें. या सनदांची प्रती लिहून घेऊन हे अस्सल सनद भोगवटीयांस परतोन देणें ह्मणोन छ १० जमादिलाखर. सनदा पत्रें.

२४ सनदा.

१२ कमावीसदार वर्तमान व भावी यांस.

१ महालानिहाय प्रांत कोंकण.
१ महालानिहाय प्रांत गुजराथ.
१ महालानिहाय प्रांत गंगथडी.
१ महालानिहाय प्रांत खानदेश.
१ महालानिहाय प्रांत बागलाण.
१ महालानिहाय प्रांत वऱ्हाड.
१ महालानिहाय प्रांत कर्नाळा.
१ महालानिहाय प्रांत बालाघांट.
१ महालानिहाय प्रांत वांई.
१ महालानिहाय सरकार जुन्नर.
१ महालानिहाय सरकार संगमनेर.
१ महालनिहाय सरकार अमदानगर.

१२

१२ मोकदम यांस सदरीलप्रमाणें.

२४

१२ जमीदार यांस सदरीलप्रमाणें चिटणीसी.

३६

रसानगीयाद. पत्रें.

२२७।२०४ श्रावणमासचे रमण्यांतील दक्षिणेचे बंदोबस्तास सालगुदस्त सन सबा मय्यातैनाप्रमाणें सालमजकुरीं लोक आणविले असेत, तरी पोटाची बेगमी करून देऊन सदरहुप्रमाणें लोक पाठऊन देणें, ह्मणोन सुरू सन समान मय्यातैन व अलफ. सनदा.

इ० स० १८०७।०८
समान मयातैन व अलफ
रविलाखर १७.

१ बापुजी गणेश यांस कीं, श्रावणमासचे रमण्यांतील दक्षिणेचे बंदोबस्तास परशुराम पंडित प्रतिनिधि यांजकडून सालाबाद शिपाई लोक असामी ४०० चारशें सरकारांत येत असतात. त्याप्रमाणें सालमजकुरीं सदरील चारशें लोक आणविलें असेत, तरी पोटाची बेगमी करून देऊन पाठवून देणें ह्मणोन. सनद.

१ राजश्री चिमणाजी पंडित सचीव यांजकडील लोक असामी ४०० चारशें येविसी.

१ किल्ले नारायणगड निसबत बळवंतराव रामचंद्र. लोक असामी १५ पंधरा येविसी.

१ किल्ले सिंहगड निसबत गोविंदराव सदाशिव यांजकडील कारकूनाचे नांवें असामी १०० शंभर येविसीं.

१ तालुके राजमाची निसबत बळवंतराव नागनाथ लोक असामी ७५ पाऊणशें.

१ किल्ले ताथवडा निसबत गणपतराव विश्वनाथ लोक असामी २५ पंचवीस येविसीं.

१ किल्ले परळी निसबत परशराम लक्ष्मण लोक असामी ३० तीस येविसीं.

१ तालुके शिवनेर निसबत परशराम खंडेराव लोक असामी २०० येविसीं.

१ किल्ले नांदगिरी निसबत महादाजी रामचंद्र लोक असामी २५ येविसीं.

१ किल्ले विसापूर निसबत खंडेराव निळकंठ लोक असामी ६० साठ येविसीं.

१ किल्ले चंदन निसबत सदाशिव कुंजीर लोक असामी २५ पंचवीस येविसीं.

१ किल्ले चाकण निसबत नारो गोविंद लोक असामी १५ पंधरा येविसीं.

१ किल्ले वंदन निसबत गणपतराव कुंजीर लोक असामी ५० पंन्नास येविसीं.

---

227. 3590 men were brought from the verious forts and Taluka officers and from the Pratinidhi and Sachiv for keeping order at the annual ceremony of alms given in the month of Shrawan.

A. D. 1807-08.

१ किल्ले पुरंधर निसबत विठोजी गायकवाड लोक असामी २०० दोनशें येविसीं.

१ तालुके सरसगड उर्फ पाली निसबत विठोजी गायकवाड लोक असामी पंचवीस येविसीं.

१ किल्ले घनगड निसबत बाजी बल्लाळ लोक असामी १५ पंधरा येविसी.

१६ असामी १६६०

येकूण सोळा सनदा दिल्या असेत. रसानगी.

श्रावण मासा करितां रमण्याचे बंदोबस्तास गुदस्त सालाप्रमाणें सालमजकुरी तालुके व किल्ले व महालानिहाय येथील नेमणुकी शिबंदीपैकीं शिपाई लोक आणविले असेत. तरी पोटाची बेगमी करून देऊन सदरहु प्रमाणें लोक पाठऊन देणें ह्मणोन सुरूसन समान मय्या तैन व आलफ. सनदा.

२ तालुके वसई.

१ महालानिहाय निसबत परशराम खंडेराव लोक असामी १५० येकशें पन्नास येविसीं.

१ किल्लेहाय निसबत केशवराव जगन्नाथ लोक असामी १५० येकसें पन्नास येविसी.

२

१ जंजीरे अर्नाला तालुके वसई निसबत परशराम खंडेराव लोक असामी ५० पन्नास येविसीं.

१ महालानिहाय प्रांत कल्याण व तालुके नेरळ निसबत नारो गोविंद लोक असामी १०० शंभर येविसी.

१ तालुके लोहोगड निसबत खंडेराव निलकंठ लोक असामी ५० पन्नास येविसीं.

१ परगणें सांकसें निसबत चिंतो वामन लोक असामी १५ पंधरा येविसीं.

१ किल्लेहाय मामले कोहोज निसबत केशवराव जगन्नाथ लोक असामी ५० पन्नास येविसी.

१ तालुके कर्नाळा निसबत बळवंतराव नागनाथ लोक असामी ५० पन्नास येविसी.

१ प्रांत बेलापूर निसबत बळवंतराव नागनाथ लोक असामी १५ पंधरा येविसी.

१ तालुके अवचितगड व बीरवाडी निसबत राघो बल्लाळ लोक असामी ७५ पाऊणशें येविसीं

१ प्रांत राजपुरीं निसबत नारो गोविंद लोक असामी १०० शंभर येविसीं.

१ तालुके सुवर्णदुर्ग निसबत सदाशिव माणकेश्वर लोक असामी १०० शंभर येविसीं.

१ तालुके अंजनवेल निसबत विठ्ठल विश्वनाथ लोक असामी १०० शंभर येविसीं.

१ तालुके रत्नागिरी निसबत चिंतो वामन लोक असामी ७५ पाऊणशें येविसीं.

१ तालुके विजयदुर्ग निसबत धारराव जगन्नाथ लोक असामी १०० शंभर येविसीं.

१ तालुके देवगड निसबत नारो रामचंद्र लोक असामी ५० पन्नास येविसीं.

१ तालुके रेवदंडा निसबत कृष्णाजी भवानी यांजकडील कारकुनाचे नांवें लोक असामी १०० शंभर येविसीं.

१ किल्लेहाय प्रांत कल्याण निसबत नारो गोविंद लोक असामी १५ पंधरा येविसीं.

१ तालुके सोलापूर निसबत सदाशिव माणकेश्वर लोक असामी ७५ पाऊणशें येविसीं.

१ किल्ले केळंजा निसबत नारो गोविंद लोक असामी २५ पंचवीस येविसीं.

१ किल्ले त्रिंबक निसबत मनोहरागिर लोक असामी ५० पन्नास येविसीं.

१ तालुके कावनई निसबत मुरारजी येवले लोक असामी ५० पन्नास येविसी.

१ तालुके मुल्हेर निसबत धनाजी चव्हाण लोक असामी ५० पंन्नास येविसीं.

१ किल्ले महिपतगड निसबत आपाजी शिंदे लोक असामी २५ पंचवीस येविसीं.

१ तालुके घोडप निसबत शंकराजी कानवडे लोक असामी ७५ पाउणशें येविसीं.

१ किल्ले दातेगड निसबत रामचंद्र माधवराव लोक असामी १५ पंधरा येविसीं.

१ किल्ले कोरीगड निसबत बाजी बल्लाळ लोक असामी ४० चाळीस येविसीं.

१ तालुके रतनगड निलबत भिवजी कोलते यांजकडील कारकुनाचे नांवें लोक असामी ५० येविसीं.

१ तालुके पट्टा निसबत हारी शिवराम लोक असामी ५० पन्नास येविसीं

१ किल्ले माहुली निसबत त्रिंबकजी डेंगळे लोक असामी ३० तीस येविसीं.

१ किल्ले प्रतापगड निसबत खंडोजी जाधव लोक असामी २५ पंचवीस येविसी.

१ तालुके उंदेरी निसबत आपाजी बहिरट लोक असामी २९ येविशीं. असामी.

३२ १९३०

बत्तीस सनदा दिल्या असेत रसानगी.

२२८।२१६ बद्दल देणें. श्रावण मासचे दक्षिणेचे उत्साहानिमित्त पर्वतीस रमण्यांत ब्राह्मणांस व ब्राह्मणांच्या बायका व मुलें यांस इस्तकबील छ२९जमादिलावल श्रावण शुद्ध १ प्रतिपदा रविवार तागाईत छ ३ जमादिलाखर श्रावण शुद्ध चतुर्थी सौम्यवार पुढें श्रावण शुद्ध पंचमी गुरुवारीं दहा घटिका होती नंतर षष्टि लागली, याजकरितां ते दिवसीं दोन प्रहर दिवसास दक्षिणेस प्रारंभ जहाला. त्यास जमादिलावल महिना येकूणतिशी गेला. सबब श्रावण शु॥. चतुर्थी छ ३ जमादिलाखरपर्यंत चार रोजा सिधा व दक्षिणेचे ब्राह्मणांस छ ४ व छ ५ जमादिलाखर दोन रोजा फुटाणें व खुर्दा व विडे दिल्हे त्यांस वगैरे खर्च सालमजकुरीं सन तिसा मयातैनांत जाहला. तो विद्यमान चिंतो वामन सिधये कारकून निसबत दप्तर. रसानगी रुपये.

इ. स. १८०८।०९
तिसा मय्यातैन व अलफ
सवाल ७

श्रावणमास उत्साह खर्च.

३११२१॥- सिध्यास बरहुकूम सालगुदस्त रोज ५ पैकीं वजा सालमजकुरीं श्रावण शुद्ध पंचमी गुरुवारीं दहा घटिका होती. ते दिवशीं दक्षिणेस प्रारंभ केला. सबब कमी रोज १ बाकी चार रोजा शिध्यास एकंदर असामी.

१७३१०९ ब्राह्मण.
१९४२६ बायका.
१९२५३१

228 Supplies were given to the following nnmber of Brahmins, men, and women at the annual alms giving.
A. D. 1808-09.

41892	on	29th	Jamadilaval
45954	on	1st	Jamadilakhar
50767	on	2nd	Do
53918	on	3rd	Do

The subsidiary expense sexclusive of the amount of alms in connection with the ceremony was Rs 35865.

तपशील.

१४१२४४ बरहुकूम गुदस्त पांच रोजा.
५१२८७ जाजती सालमजकुरीं.

१९२५३१

यासी बयाज

४१८९२ छ २९ जमादिलावल.
४९९५४ छ १ जमादिलाखर.
५०७६७ छ २ जमादिलाखर.
५३९१८ छ ३ जमादिलाखर.

१९२५३१

तपशील दरवाजेवार.

५११७७ दरवाजा पहिला ब्राह्मण.
५०१८५ दरवाजा दुसरा ब्राह्मण.
३९४१९ दरवाजा तिसरा ब्राह्मण.
२६०३७ दरवाजा चौथा ब्राह्मण.
२५२१३ दरवाजा पांचवा ब्राह्मण.

१९२५३१

शिधा दर रोज दर असामीस नेमणूक.

वजन पक्कें.

ऽऽ|||९ तांदूळ आंबेमहूर सडीक.
ऽऽऽ९ डाळ तुरी.
ऽऽऽ=। मीठ दळीव.

ऽऽ१ऽ=।-

जिनसांचे ऐवजीं खुर्दा टके.

ऽ३ तूप.
ऽ३ भाजी.
ऽ३ लांकडें.
ऽ३ दक्षणा.

-।- रुपये.

विडा १ एकूण.
५ पानें विड्यांची हिर्वीं चुनपटीचे पानासुद्धां.
१ सुपारी.
२ कातगोळ्या.
१ चुना.

९

आकार

१६०३९ऽ- तांदूळ आंबेमहूर, असामी १९२५३१.
२२४५।= डाळ तुरी सदर.
ऽ१ मीठ सदर.

११२४६॥ खुर्दा सदर.
९०९॥। विडे, दर असामीस १ प्रमाणें विडे सुमार १९२९३१.

३११२१॥।-

२१०१॥। दक्षिणेस ब्राह्मण इस्तकबील छ ४ जमादिलाखर श्रावण शुद्ध पंचमी गुरुवार प्रारंभ दोन प्रहर दिवसापासून तागाईत छ ५ मिनहू शुद्ध षष्ठीसह सप्तमी भृगुवार अस्तमानीं तोफा सोडून दरवाजावरून ब्राह्मण गराडयांत घेतले होते. त्यांची (संख्या)? दक्षणा समाप्त होईतोंपर्यंत दुरोजा दक्षणेस एकंदर ब्राह्मण असामी.

१५७२९ दरवाजा पहिला.
१०६०७ दरवाजा दुसरा.
१५३६६ दरवाजा तिसरा.
११२३१ दरवाजा चौथा.
१०९७९ दरवाजा पांचवा.

६३९०८

तपशील.

४३१४८ बरहुकुम गुदस्त.
२०७६० जाजती साल मजकुरी.

६३९०८

रुपये.

९१७८- फुटाणे केली खंडी.
१४३६॥। खुर्दा दक्षणेस ब्राह्मण ६३९०८.
१४७॥।= विडे सुमारे.
१६२॥= हरकामीं माणसें.
२३७॥ कारकून.
३४७॥। भाडेंखर्च व हमाली.

३३६ इमारत खर्च गुजारत सिताराम यासी बुळाराम गौंडी पेठ शुक्रवार शहर पुणें यांजकडून रमण्यांत कामें करविली त्याचा मक्ता रुपये.

१९० छपरें पुण्यांत तांदूळ सडावयास व रमण्यांत दरवाज्यावरील सोप्यापुढें दुसरें बाजुनें शिधा व दक्षणा द्यावयाबद्दल वगैरे घातलीं त्यांची किंमत रुपये.

४१॥ बाजे खर्च.

५६॥।- पाट खर्च. (?)

१५ इनाम खर्च किरकोळ कामकाजास माणसें व प्यादे व कोठवळे व दास्तानाचे रखवालीस नेहमीं पाहारेकरी होते त्यांस व कर्णेकरी व शिंगाडें यांणीं रात्रंदिवस चाकरी केली, सबब एक साला इनाम दिल्हें तें तांदूळ मोठे असडी केली.

२६२॥।रोषनाई खर्च.

४९ आतस बाजी खर्च, रमण्यांत सूर्यास्तानंतर शिध्याचे व दक्षणेचे ब्राह्मण सुटते समयीं व छ ४ जमादिला खरीं रात्रौ दक्षणेचे समारंभामुळें जागा जागा उजेडा करितां हवया लाविल्या त्यांची किंमत रुपये.

६७८≡चित्रें पांचा दरवाज्यावरील सोप्याचे भिंतीस वगैरे काढविलीं ते गुजारत सदाशिव चितारी. सुमारे.

९३॥।≈लागवड खर्च रमण्यांतील दुसरे व तिसरे दरवाज्याचे सोप्यास नवें ओंमण घातलें. व पांचा दरवाज्यांचीं कौलें लाविलीं. त्यास वगैरे रुपयें.

८≈धर्मादाय, नळाचे पाणी रमण्यांतील तळ्यांत आणावयास मुहूर्त केला. तेसमयीं नारळ १.

३ नवस खर्च, श्रीगणपतीस शिध्याचा समारंभ सुशोभित झाल्यावर पेढे वांटावयाचा नवस केला होता, ते पेढे वजन ८८४॥ दर ८८१॥ प्रमाणें. रुपये.

११५ मेढा लांकडी यांचा मक्ता

१२९ बट्टा खर्च तांदूळ खरेदी करावयास घोटवडयास वगैरे जागजागा मावळांत छापी रुपया चालत नाहीं सबब बट्टाऊन कोरे चांदवड केले. ते रुपये १२५००. येकूण दर सदे १ प्रमाणें रुपये.

४४॥।-दत्फर खर्च शिध्याचे व दक्षणे कडील लिहीण्यास कागद वगैरे रुपये.

७७॥≡जिन्नस ठेवावयास वगैरे दागिने करविले त्याबाबत रुपये.

३९६०८॥। (बेरीज मिळत नाहीं कोठें तरी चूक आहे).

पैकीं वजा सूट मखलासी समयीं एकंदर बेरजेस घातली ते रुपये -॥।- बाकी ३९६०८ रुपये.

जव्हाहीर खाना याजकडे शिलकी दागिने खरेदी केले त्यांची किंमत रुपये.

३५। पितळेचे दागिने ३० येकूण.
३१ चाडी समयांची २० येकूण.
-।।।- वोगराळें तांब्याचें तुरीची डाळ द्यावयास अदपाव वजनी राहील असें घेतलें तें येकूण वजन पक्के ८८।९
२६ लोखंडी दागिने.

६२ (वरील तपशिलांत चूक आहे)

दिमत फरासखाना याजकडील डेरे राहुट्या व चांदण्या वगैरे सरंजाम रमण्यांत ब्राह्मणांस निवाऱ्याकरितां उभा करावयाबद्दल दागदोजी केली त्यास रुपये.

७६।।- ऐन जिनसांची किंमत सनंगें वगैरें खरेदी करून दिल्ही त्या बाबत.
२७।। मजूरी.

१०४

लोक कामकाजास होते त्यांस रोजमऱ्यापैकीं आदा जाहला ते रुपये.

४२ दमानची दिमत हुजुरांत
३५।। लोक माजी चंदनगडकरी यांस
१३।। लोक माजी वंदनकडकरी यांस रमण्यांत कामकाजास होते सबब खर्चास पावले ते असामी २७ दर -।।- प्रमाणें रुपये.

९१

तेरीज रुपये

३५६०८ श्रावणमास उत्साह खर्च
६२ जवाहीरखाना
१०४ दिमत फरासीखाना
९१ लोक यांस रोजमरे यांपैकीं

३५८६५

पस्तीस हजार आठशें पासष्ट देविले रुपये.

१० टपालखातें.

—:०:—

इ० स० १८०३।०४ अर्बा मयातैन व अलफ सफर १

२२९।१७४ सखाराम मल्हार कारकून यांस तुह्मांकडे पाठविले आहेत त्याविसी कलमें.

229. Sakharam Malhar was appointed news writer on pay Rs 50 per month and was deputed for duty under Keshav Balkrishna Mamlatdar of some Mahals in Karnatic, Ninety messengers were placed at the disposal of the Mamlatdar for the dispactch of the news letters.

A. D. 1803-04.

मशारनिल्हे तुह्मांजवळ राहून दिनचर्येचें वर्तमान लिहित जातील त्यास तैनात दरमहा रुपये ५० पन्नास तुह्मांजवळ दीनचर्येचें वर्तमान लिहावयाचें कामास राहतील तों पावेतों सदरहुप्रमाणें तैनात दरमहा तुह्माजवळ दाखल होतील त्या तारखेपासून देत जाणें. कलम १.

पुण्याहून तुह्मां पावेतों डांक सरकारांतून ठेवावयाकरितां जदीद जासूद असामी ९० नवद मशारानिल्हे यांस ठेवावयाची आज्ञा केली आहे. त्यांस रोजमरा दीडमाही रुपये ५४० पांचशें चाळीस करार केला असे. तरी हे सदरीलप्रमाणें जासूद ठेवून डाक बसऊन रोजमरे याची याद नांवनिशीवार तुह्मांस समजावतील त्याप्रमाणें पांचशें चाळीस रुपये रोजमरा दीडमाही तुम्हीं कारकून देऊन मशारनिल्हे यांचे गुजारतीनें जासुदाचे हातावर रोजमरे यांची वाटणी करून देत जाणें. लिहिल्याप्रमाणें रोजमरा जासूद डाकेचें कामास राहतील तों पावेतों देत जाणें. कलम १.

येकूण दोन कलमें लिहिलीं असेत तरी सदरहुप्रमाणें महालानीहाय प्रांत कर्नाटक पैकी देत जाणें. ह्मणोन केशवराव बाळकृष्ण मामलेदार महालानिहाय प्रांत मजकूर याचें नांवें छ २५ मोहोरम

सनद १.

रसानगीयादी.

११ वैद्यकी व शस्त्रक्रिया.

२३०|२०१ खाजगत खर्च. खाशांकडे औषधाबद्दल सांन्निपातभैरवमात्रा करावयास गोपाळभट वैद्य गोखले यांजकडे रसानगीयाद चिठी छ १७ जिल्हेज किंमत रुपये १६.

इ० स० १८०६।१८०७
सबा मयातैन व अलफ
जिल्हेज १८

वजन तोळेवार पैकीं मोत्यें किंमत रुपये १२.

एकूण ——— वजन तोळे.

२।।।=।। प्रतबाबत जप्ती बाळाजी जनार्दन फडणीस पैकीं मोजदाद सीत मयातैन दर तोळा रुपये३ प्रमाणें रुपये ८।।।=

पोंवळीं किंमत रुपये ४

एकूण ——— सुमार.

४२ प्रत पोंवळीं मोजदाद सीत मयातैन तोळे २ दर -।।- प्रमाणें रुपये १

१११ प्रत बाबत जप्ती बाळाजी जनार्दन फडणीस पैकीं मोजदाद सीत मयातैन १२२ पैकीं रकम ११९ रुपये ३। पैकीं किंमत ३.

वजनतोळे ३

230. Pearls and jewels were given to a medical man for the preparation of a medicinal preparation called सान्निपात भैरव मात्रा.
A. D. 1806-07

१८॥- प्रतबाबत तोतया राजमाची पैकीं
मोजदाद सीत मयातैन तोळे २॥-॥
दर ३ प्रमाणें रुपये ७॥= पैकीं
दर ३ प्रमाणें ३८= रुपये.

४

१२ टंकसाळ व नाणीं.

२३१।११७ प्रांत वाई व कराड व सातारा येथें मलकापुरीं रुपयांची चाल आहे. त्यास मलकापुरी मनस्वी खोटे रुपये पडो लागले याजमुळें चांदवडास व मलकापुरीस बट्टा बहुत पडतो. हें ठीक नाहीं याजकरितां प्रांत मजकूर येथील मलकापुरीं रुपयांची चाल मना करून चांदवडी रुपये चालावयाची आज्ञा केली असे. तरी प्रांतांतील वसूल चांदवडी रुपयांचा घेत जाणें. व शिबंदीस वगैरे खर्च करणें तो चांदवडी रुपयांचा करीत जाणें. मलकापुरी रुपये एकंदर चालूं नये. या रुपयांच्या टंकसाळा असतील त्या बंद करणें, ह्मणोन सनदा.

इ. स. १८००।०१
इहिदे मयातैन व अलफ
रजब १६

१ प्रांत वाई निसबत भवानी शंकर हैबतराव यांस.
१ प्रांत कराड निसबत श्रीनिवास शामराव यांस.
१ किल्ले सातारा सरंजामाचे गांवसुद्धां निसबत सदाशिव भास्कर यांस.
१ डौल सातारा कृष्णराव नारायण यांस.
१ पंत प्रतिनिधि यांस.

५

रसानगीयाद.

१३ निरख व मजुरी.

(अ) निरख.

२३२।२०९. बदल देणें. भाडें खर्च. स्वारीमुळें नवें भाड्याचे बैल सर २०० दोनशें.

231. The Malkapur currency rupees were useed in Prant Wai, Karad, and Satara. As many of these rupees contained debased coin considerable discount had to be paid for their acceptance. The use of these rupees was therefore ordered to be discontinued.

A. D. 1800-01.

232. Rs. 3000 were paid on acconnt of hire af 200 bulocks accompanying the Peshwa in camps at Rs 6 per month per bullock.

A. D. 1807-08.

इ. स. १८०७।०८ समान मयातैन व अलफ जिल्हेज १२

परशुराम खंडेराव यांचे गुजारतीनें केलें. त्यांचें भाडें चाकरीचे तारखेपासून दरमहा दरबैलीं रुपये ६ प्रमाणें अडीच महिन्याचे. रसानगी यादी. ३००० रुपये.

तीन हजार रुपये जकात प्रांत जुन्नर निसबत परशुराम खंडेराव यांजकडे साल मजकूरचे रसदेचा ऐवज येणें त्यापैकीं छ. २१ साबानीं देविले रुपये.

१४. गुलाम.

—:०:—

बाळोजी कुंजीरच्या कीर्दीपैकीं.

२३३।१४४ तालुके रत्नागिरी येथें शिलकी कुणबिणी फार आहेत. त्यांपैकीं सरकार

इ. स. १८००।०१ इहिदे मयातैन व अलफ मोहरम. २२

कामास जरूरातींल धडधाकट चांगल्या पाहून शिलकेस राखणें बाकी राहतील त्या चौकशीनें फ्रोक्त करणें, यांत निकामीं केवळ ह्मातार्‍या कोणी विकत न घेई अशा असतील त्या दरकदाराचे विद्यमानें सोडून देणें, ह्मणोन नारो अनंत व विठ्ठल नारायण मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवें सनद. १.

रसानगी यादी.

१५. धर्मसंबंधीं व सामाजिक.

२३४।२ अनुष्ठान खर्च. विद्यमान राजेश्री राव. पर्जन्याभिवृध्यर्थ श्री सोमेश्वर वास्तव्य

इ. स. १७९५।९६ सीत सितेन मया व अलफ रजब. २९

पाषाण यांजवर येकादश अतिरुद्र अभिषेक ब्राह्मण द्वारा केला. त्यास खर्च जाहला. तो इस्तकबील छ. १६ जिल्हेज आषाढ वद्य २ मंदवासर तागाईत छ. १८रबिलाखर आश्विन (कार्तिक?) वद्य ५ रविवार मुदत रोज १२१ एकूण, गुजारत मोरो जनार्दन वाकनिस बरहुकूम यादी. रुपये.

९२०॥ प्रत वर्णी पहिली. इस्तकबील छ. १६ जिल्हेज तागाइत छ. २६ मिनहू रोज ८११ येकूण रुपये.

233. The number of female slaves at Taluka Ratnagiri being large the officer in charge was directed to retain for Government work only as many as necessary and to sell the rest setting at liberty those who on account of their age should fail to find a purchacer.

A. D. 1800-01.

234. Certain ceremonies (pouring water on the idol of Someshwar at Pashan) were performed for moving the deity to send down rain. They lasted for 121 days from 2nd Vadya of Ashadha to 5th Vadya of Ashwin and involved an expenditure of Rs.

A. D. 1795-96.

१५	पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यास रुपये.
१।-	देवांस दक्षणा पुजन समयीं दररोज रुपये.
६७६॥	ब्राह्मण अभिषेकांस लाविले त्यांस दक्षणा रुपये.
५७।≡	खरेदी जिन्नस रुपये.
२४८≡	मजूरी रुपये.
९	भोजनदक्षणा दररोज.
१३७८-	सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यांस रुपये.
९२०॥	

९२३।- प्रत वर्णी दुसरी. इस्तकबील छ. २७ जिल्हेज तागाईत छ. ८ मोहरम रोज ८११ येकूण रुपये.

१०॥	पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यास रुपये.
१।-	देवांस दक्षणा पुजन समयीं दररोज पुजा.
६७६॥	ब्राह्मण अभिषेकांस लाविले त्यांस दक्षणा रुपये.
६२।-	खरेदी जिन्नस वजन पक्कें येकूण रुपये.
२४८≡	मजुरी रुपये.
८॥।	भोजन दक्षणा असामी.
१३९॥।	सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.
९२३।-	

९३०।- प्रत वर्णी तिसरी. इस्तकबील छ. ९ मोहरम तागाइत छ. १९ मिनहू रोज ८११ येकूण.

९॥	पुण्याहवाचन वाड्यांत केलें त्यास विद्यमान खासा. प्रारंभ दिवशीं.
१।-	देवांस दक्षणा पूजन समयीं दररोज पूजा.
६७६॥	ब्राह्मण अभिषेकांस लाविले त्यांस दक्षणा रुपये.
६७।≡	खरेदी जिन्नस रुपये.
२४८≡	मजुरी रोजमरीं ठेविले त्यांस रुपये.
८॥=	भोजनदक्षणा. आसामी.
१४२॥।-	सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.
९३०।-	

९२०॥= प्रत वर्णी चवथी. इस्तकबील छ. २० मोहरम तागाइत छ. ३० मिनहू रोज ८११.

९॥ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यांस विद्यमान खासा रुपये.
१। देवास दक्षणा पूजन समयीं दररोज पूजा.
६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
५५॥- खरेदी जिन्नस रुपये.
२४८≡ मजुरी आचारी वगैरे यांस रुपये.
८। भोजन दक्षणा दररोज असामी.
१४९८≡ सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यांस रुपये.

९२०॥=

९१०॥= प्रत वर्णी पांचवी इस्तकबील छ. १ सफर तागाईत छ. ११ मिनहू रोज ८११ येकूण रुपये.
९ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यास विद्यमान खासा.
१। देवांस दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६७६॥- ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
४४।- खरेदी जिन्नस रुपये.
२४८≡ मजुरी चाकरीस आचारी वगैरे ठेविले त्यांस रुपये.
८। भोजन दक्षणा आसामी.
१४७८= सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यांस रुपये.

९१०॥=

९०७।≡ प्रतवर्णी इस्तकबील छ १२ सफर तागाईत छ. २२ मिनहू रोज ८११ येकूण वर्णी सहावी रुपये.
१०॥ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें. त्यास, विद्यमान खासा. रुपये.
१। देवास दक्षणा पुजनसमयीं. दररोज पुजा.
६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले. त्यांस दक्षणा रुपये.
४३।= खरेदी जिन्नस रुपये.
२४८≡ मजुरी रुपये.
८॥ भोजनदक्षणा असामी.
१४२८= सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यांस. रुपये.

९०७।≡

९१६॥- प्रत वर्णी सातवी इस्तकबील छ. २३ सफर तागाईत छ. ४ रबिलावल रोज ८११ येकूण रुपये.

९॥ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यास विद्यमान खासा. रुपये.

१। देवास दक्षणा पुजनसमयीं दररोज पुजा.

६७६॥ आभिषेकास ब्राह्मण लाविले त्यांस दक्षणा. रुपये.

९२।≡ खरेदी जिन्नस. रुपये.

२४८≡ मजुरी आचारी वगैरे यांस. रुपये.

८॥ भोजन दक्षणा. असामी.

१४४८≡ सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यांस. रुपये.

९१६॥-

९२६८≡ प्रत वर्णी आठवी इस्तकबलि छ ५ रबिलावल तागाईत छ १५ मिनहू रोज ८११ येकूण रुपये.

९ पुण्याहवाचन प्रारंभदिवशीं वाड्यांत केले त्यास विद्यमान खासा. रुपये.

१। देवास दक्षणा पूजन समयीं दररोज पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा. रुपये.

५०।= खरेदी जिन्नस. रुपये.

२४८≡ मजुरी. रुपये.

८॥= भोजन दक्षणा. असामी.

१५६। सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यांस. रुपये.

९२६८≡

९३१॥≡ प्रत वर्णी नववी इस्तकबील छ १६ रबिलावल तागाईत छ २६ मिनहू रोज ८११ येकूण रुपये.

१०॥ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें, त्यास विद्यमान खासा. रुपये.

१। देवास दक्षणा पूजन समयीं दररोज. पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा. रुपये.

६६॥ खरेदी जिन्नस. रुपये.

२४८≡ मजुरी. रुपये.

८॥= भोजन दक्षणा. असामी.

१४४८= सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.

९३१॥≡

८९८॥- प्रत वर्णी दहावी इस्तकबील छ २७ रबिलावल तागाईत छ ७ रबिलाखर रोज ८११ येकूण रुपये.

११ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यास विद्यमान खासा. रुपये.

१। देवास दक्षणा पूजन समयीं दररोज.

६७६॥ ब्राह्मणांस दक्षणा अभिषेकास लाविले त्यांस रुपये.

३७।= खरेदी जिन्नस दूध वजन येकूण.

२४८≡ मजुरी रोजकरी ठेविले त्यांस रुपये.

८॥ भोजन दक्षणा असामी.

१३९॥। सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास. रुपये.

८९८॥-

९१३८- प्रत वर्णी अकरावी इस्तकबील छ ८ रबिलाखर तागाईत छ १८ मिनहू रोज ८११ येकूण रुपये.

११ पुण्याहवाचन प्रारंभ दिवशीं वाड्यांत केलें त्यास विद्यमान खासा. रुपये.

१। देवास दक्षणा पूजन समयीं दररोज पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा. रुपये.

४८।- खरेदी जिन्नस वजन पक्कें येकूण रुपये.

२४८≡ मजुरी रोजकरी ठेविले त्यांस. रुपये.

८॥ भोजन दक्षणा. असामी.

१४३।- सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास. रुपये.

९१३८-

१८।- देवाची महापूजा छ ३ जमा दिलावल कार्तिक शुद्ध पंचमीस इंदुवारीं केली त्यास. रुपये.

१०११७८≡

२३५।२९ परभु प्रकर्णी ग्रामण्य पांच सात वर्षे पडोन त्यांजकडील मुंजीवगैरे कर्मे बंद

---

285. Owing to some dispute the thred and other ceremonies among Parbhus had remained unperformed. Orders were now issued to the Brahmins of the various sacred places and to the officers of the province to allow the ceremonies to be performed as before.

A. D. 1796-97.

इ० स० १७९६।९७
सबातिसेन मया व अलफ
सवाल २

जाहली होती. त्यास पूर्वी पासोन मुंजी वगैरे कर्मे त्यांजकडे चालत आलीं त्याप्रमाणें चालवावयाची आज्ञा करून हीं पत्रें तुह्मांस लिहिलीं असेत. तरीं ज्या ज्या क्षेत्रीं वगैरे जागा परभु आहेत त्यांजकडे पूर्वी पासोन मुंजी वगैरे कर्मे चालत आलीं आहेत त्याप्रमाणें चालवणें. ह्मणून चिटणीसीं

	पत्रें.	
	ब्राह्मणांस.	मामलेदार यांस.
श्रीदेव चिंचवड.	१	०
क्षेत्र जेजूरी.	१	०
क्षेत्र नाशिक.	१	०
क्षेत्र त्रिंबक.	१	०
क्षेत्र पैठण.	१	०
क्षेत्र टोकें.	१	०
क्षेत्र पंढरपुर.	१	०
क्षेत्र वाई.	१	०
क्षेत्र माहुली.	१	०
क्षेत्र कऱ्हाड.	१	०
क्षेत्र तुळजापुर.	१	०
क्षेत्र धोम.	१	०
क्षेत्र प्रवरासंगम.	१	०
क्षेत्र करवीर.	१	०
क्षेत्र नरसीपूर.	१	०
क्षेत्र राक्षसभुवन.	१	०
क्षेत्र कुशतर्पण.	१	०
क्षेत्र महालक्ष्मी.	१	०
क्षेत्र हरेश्वर.	१	०
क्षेत्र माणकेश्वर.	१	०
क्षेत्र माहुलीसंगम.	१	०
क्षेत्र भिमाशंकर.	१	०

आणि इतर परगणें महाल व इतर कामगार यांस येकूण तीनशें तीन पत्रें दिलीं असेत.

२३६।३९ अनुष्ठान खर्च. राजश्री आपासाहेब. पर्ज्यन्याभिवृध्यर्थ श्रीसोमेश्वर वास्तव्य पा-

236. A ceremony (pouring water over the idol of Someshwar at Pashan) was performed by Appasaheb for 121 days from 7th Ashad Shudha to 8th Kartik Shudha in order that the deity might be propitiated and send down rain. The cost was Rs.

A. D. 1796-97.

10571-13.

इ० स० १७९६।९७ सबातिसेन मया व अलफ जिल्हेज २

षाण याजवर एकादश अतिरुद्र अभिषेक ब्राह्मण द्वारा केला. त्यास इस्तकबिल छ ५ मोहरम आषाढ वद्य ७ इंदुवार ते छ ७ जमादिलावल कार्तिक शुद्ध ८ मंगळवार मुदतरोज १२१ येकूण रुपये जाहला तो गुजारत मोरो जनार्दन वाकनीस बरहुकूम यादी रुपये.

९५६।- प्रतवर्णी इस्तकबील छ९ मोहरम ते छ१५ मिनहू रोज ८११येकूण रुपये.

१०॥ पुण्याहवाचन केलें त्यास विद्यमान खासा. प्रारंभ दिवसीं वाडयांत छ ५ मोहरम खर्च.

१।- देवास दक्षणा पूजन समयीं दररोज पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.

७२॥≡ खरेदी जिन्नस. रुपये.

२०॥= मजुरी खर्च.

९ भोजन दक्षणा. असामी.

१६९॥≡सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.

९५६।-

९४७।= प्रतवर्णी २. इस्तकबील छ १६ मोहरम तागाईत छ २६ मिनहू रोज ११ येकूण

९॥ पुण्याहवाचन वाड्यांत प्रारंभ दिवशीं केलें त्यास छ १६ मोहरम रुपये.

१।= देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.

७०। खरेदी जिन्नस रुपये.

२०॥=मजुरी खर्च रुपये.

९८= भोजन दक्षणा असामी.

१६० सांगता ब्राह्मणभोजन घातले त्यास रुपये.

९४७।=

९५४॥।- प्रत वर्णी ३. इस्तकबील छ २७ मोहरम तागाईत छ ८ सफर रोज ८११ येकूण रुपये.

१०॥ पुण्याहवाचन वाड्यांत प्रारंभ दिवशीं केलें त्यांस छ २७ मोहरम रुपये.

१।- देवास दक्षणा पुजनसमयीं दररोज पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.

७७॥ खरेदी जिन्नस. रुपये.

२०॥= मजुरीखर्च. रुपये.
९ भोजनदक्षणा. असामी.
१५९।= सांगतां ब्राह्मणभोजन घातले त्यास रुपये.
९५४॥।-

९८२॥।- प्रतवर्णी ४. इस्तकबील छ ९ सफर तागाईत छ. १९ मिनहू मुदत रोज ८११ येकूण रुपये.
१० पुण्याहवाचन केलें त्यास वाड्यांत रुपये.
१।- देवांस दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६९३ ब्राह्मण अभिषेकांस लाविले त्यांस दक्षणा रुपये.
८८८- खरेदी जिन्नस रुपये.
२०॥= मजुरी खर्च रुपये.
९ भोजन दक्षणा असामी.
१६०॥।- सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.
९८२॥।-

९४८।≡ प्रतवर्णी ५. इस्तकबील छ. २० सफर तागाईत छ. १ रबिलावल रोज ८११ येकूण रुपये.
९॥ पुण्याहवाचन वाड्यांत केलें त्यांस प्रारंभ दिवशीं खासा रुपये.
१।- देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
७६॥।≡ खरेदी जिन्नस रुपये.
२०॥= मजुरी खर्च रुपये.
९ भोजन दक्षणा असामी.
१५४॥- सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.
९४८।≡

९५५॥।= प्रतवर्णी ६. इस्तकबील छ. २ रबिलावल तागाईत छ. १२ मिनहू रोज ८११ येकूण.
१०॥ पुण्याहवाचन केलें त्यास छ. २ रबिलावल प्रारंभ दिवशीं वाड्यांत वि॥ खासा.
१।- देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
७१॥= खरेदी जिन्नस रुपये.
२०॥= मजुरी खर्च रुपये.

९ भोजन दक्षणा असामी.
१६६।- सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.

९९५।।।=

९७१।। प्रतवर्णी ७. इस्तकबील छ. १३ रबिलावल तागाईत छ. २३ मिनहू रोज ८११ येकूण रुपये.
१०।। पुण्याहवाचन केलें त्यास विद्यमान खासा प्रारंभ दिवशीं वाड्यांत छ. १३ रबिलावल रुपये.
१।= देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६७६।। ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
८१८- खरेदी जिन्नस. रुपये.
२०।।= मजुरी खर्च. रुपये.
९। भोजन दक्षणा. असामी.
१७७८≡सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.

९७१।।

९५८८= प्रतवर्णी ८. इस्तकबील छ. २४ रबिलावल तागाईत छ. ४ रबिलाखर रोज ८११ येकूण रुपये.
९।। पुण्याहवाचन वाड्यांत केलें. त्यास खासा विद्यमान छ. २४ रबिलावल प्रारंभ दिवशीं रुपये.
१।= देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६७६।। ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
८३।= खरेदी जिन्नस. रुपये.
२०।।= मजुरी खर्च. रुपये.
९। भोजन दक्षणा. रुपये.
१५७।। सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास. रुपये.

९५८८=

९४६।।।- प्रतवर्णी ९. इस्तकबील छ. ५ रबिलावल तागाईत छ. १५ मिनहू मुदत रोज ८११ येकूण रुपये.
१० पुण्याहवाचन वाड्यांत प्रारंभ दिवशीं केलें त्यास छ. ५ रबिलाखर रुपये.
१।= देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.
६७६।। ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.
६९।। खरेदी जिन्नस येकूण रुपये.
२०।।= मजुरी खर्च. रुपये.
९। भोजन दक्षणा. असामी.

१५९॥- सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.

९४६॥।-

९३८।- प्रतवर्णी १०. छ १६ रबिलाखर तागाईत छ २६ मिनहू मुदत रोज ८११ येकूण रुपये.

९॥ पुण्याहवाचन केलें त्यांस प्रारंभ दिवशीं छ. १६ रबिलाखर वाड्यांत विद्यमान खासा रुपये.

१।= देवास दक्षणा पूजनसमयीं दररोज पूजा.

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले त्यांस दक्षणा रुपये.

६३। खरेदी जिन्नस. रुपये.

२०॥= मजुरी खर्च. रुपये.

९। भोजन दक्षणा. असामी.

१५७॥।- सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास. रुपये.

९३८।-

९२५८= प्रतवर्णी ११. छ २७ रबिलाखर तागाईत छ ७ जमादिलावल रोज ८११ येकूण रुपये.

९॥ पुण्याहवाचन वाड्यांत केलें त्यास छ २७ रबिलाखर प्रारंभ दिवशीं.

१।= देवास दक्षणा पूजन समयीं

६७६॥ ब्राह्मण अभिषेकास लाविले यांस दक्षणा रुपये.

५२॥। खरेदी जिन्नस रुपये.

२०॥= मजुरी खर्च रुपये.

९। भोजन दक्षणा रुपये.

१५५८= सांगता ब्राह्मणभोजन घातलें त्यास रुपये.

९२५८=

८१।- छ. ८ जमादिलावल कार्तिक शुद्ध ९ सौम्यवासर समाप्तीस महापूजन केलें त्यास विद्यमान बाळंभट कर्वे उपाध्यें. रुपये.

१४॥।= दक्षणा रुपये.

६५।≡ सांगता ब्राह्मणभोजन घातलें यांस

१ अर्घ्यास

६ भूयसी ब्राह्मणांस असामी १२ दर ॥- प्र.

४ खरेदी जिन्नस रुपये.
८११-

१०५७१।।।-

तपशील.

१३।।।= मोहोर शेटशाईनाणें, येकूण रुपये.

१०५५७।।।= नक्त रुपये.

१०५७१।।।-

२३७।५१ श्रीसप्तशृंग देवीचे पर्वतावर वाघाचा उपद्रव बहुत होऊन दर्शनास माणसें जातात त्यांस वाटेंमध्यें दगा होतो. दहापांच माणसें जाया जाहलीं यामुळें श्रीची पुजा बंद जाहली आहे ह्मणोन रघुनाथ भोपा पुजारी यानें हुजूर विदित केलें. त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी तुम्हीं आपणाकडील शहाणा माणूस पाठऊन देवीपुढें चिठया टाकून वाव मारून बंदोबस्त करावा अशी चिठी निघाली तर तालुके घोडप पैकीं लोक बर्कंदास असामी २५ पंचवीस दारुगोळीची बेगमी करून देऊन श्रीचे पर्वतावर पाठऊन वाघाचा बंदोबस्त करून देवीची पुजा नेहमीं चालती होय तें करणें. वाघाचे निर्भय होई तोंपावेतों सदरहू पंचवीस लोक पर्वतावर ठेवणें. ह्मणोन बाजीराव आपाजी यांचे नांवें सनद. १.

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
रबिलावल १२

परवानगी रुबरु.

२३८।९३ वेदमूर्ति सोमेश्वर दीक्षित सोमचयन, वाजपेय, बृहस्पतीस, व सौत्रामाणित्रय, साग्निचित, पौंडरीक याजि नवपाठीं कुशतर्पणकर हे मौजे मजकुरीं गंगातीरीं त्रीसहस्त्रचयनयुक्त सर्वतोमुख यज्ञ करणार व बाराहजार ब्राह्मण भोजन यज्ञसांगता घालणार त्यास साहित्य.—

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
जमादिलाखर ९

वजनपक्कें. खंडी		कित्ता	कलमें.
३	शाकभाजी हरजिनसी.	१	यज्ञास व ब्राह्मण भोजनास मंडप व बारा शाळा घालून देणें.
१५	लांकडें जाळाऊ.		
१८		१	कुंडें घालवयास गवंडे व कामकाजास कामाठी नेमून देणें.
सुमारीं. सुमार.			
१५०००	विटा मातीच्या पक्या.	१	कुंभारकाम व बुरुडकाम कार्याकारण लागेल तें

237. A tiger appeared on the Saptashring hill and wounded some pilgrims going to that temple. Raghunath Bhopa worshipper at the temple reported that on this occount the daily worship of the deity could not be performed. Bajirao Appaji was directed to send a man to the temple and to ascertain by drawing lots before the deity whether the deity consents to the distruction of the tiger. If the consent was obtained, Bajirao was to send 25 armed men to kill the tiger and to keep them at the temple till all fear had subsided.

A. D. 1797-98.

238. Someshwar Dixit of Kushatarpan being about to perform a sacrifice the necessary provisions were ordered to be supplied to him.

A. D. 1797-98.

१९००० पत्रावळी.

व सुतार व लोहार यज्ञपात्रें करावयास.

१ समीधा व दर्भ व बेलफुलें व तुळशी लागतील त्या देणें.

१ यूपस्तंभ सुमारे ४ चार देणें.

१ चौकी पाहाऱ्यास प्यादे व वाजंत्री व नगारा वाजवावयास देणें.

६

येकूण आठरा खंडी वजन पक्कें व तीस हजार सुमारीं व सहा कलमें सदरहु प्रमाणें देविले असे. तरी फडफर्मासीचें सामान व बेगारीची माणसें मिळतील तीं देऊन बाकीचें सामान राहील तें खरेदी करून देणें. वाजवी किंमत पडेल ते मजुरा दिल्ही जाईल. ह्मणून हरि भिकाजी कमावीसदार मौजे कुशतर्पण परगणें बालकोंडा याचे नांवें सनद. १.

रसानगीयादी.

२३९।१३ क्षेत्र पंढरपूर येथें वेणुनादी विष्णुपदादी स्थांनीं श्राद्धें पेशजीपासून चालत आलीं. अलीकडे सन तिसा समानीनांत ताटे व थिटे व आराधे यांनीं सरकारांत गैरवाका समजावून श्राध्दें मना करविलीं. त्यास हल्लीं बडवे यांनीं सरकारांत विनंति केली. त्याजवरून पंढरी-

इ. स. १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
जिलकाद २८

महात्म्याचें पुस्तक आणवून सभा करून शास्त्रतः मनास आणिता ज्या ज्या क्षेत्राचें जें महात्म्य तदनुसार श्राद्धादिक तेथें होत असतात, त्याप्रमाणें या क्षेत्रीचें माहात्म्योक्त तत् तीर्थीं तत् श्राद्धादिक व्हावी. जाहल्यास शास्त्राविरोध व बाधकही नाहीं असें सिद्ध जाहलें. सबब हें पत्र सादर केलें असे. तरी पेशजी पासून चालत आल्याप्रमाणें महात्म्यानुसार चालवणें. व राडीचा खेळ व देवद्वारीं शिंपणें वगैरे सुदामत पेशजी पासून चालत आलें असेल त्याप्रमाणें करवणें. या पत्राची प्रति लिहून घेऊन हें पत्र बडवे यांजवळ परतोन देणें ह्मणोन कमावीसदार वर्तमान भावी पत्र मजकुर यांचें नांवें चिटणीसी पत्र १.

येविसीं पत्रें २.

१ समस्त बडवे यांस कीं चालत आल्याप्रमाणें महात्म्यानुसार श्राद्धादिक होत असावीं ह्मणोन.

१ ताठे व थीटे व आराधे यांस कीं चालत आल्याप्रमाणें महात्म्यानुसार श्राद्धादिक करतील त्यांस तुम्हीं दिकत न करणें ह्मणोन.

२ ३

---

239. In Tisa Samanin, the performance of certain Shradha ceremonies at Pandharpur were prohibited. The Badwas having now made a representation in the matter, a copy of Pandhari Mahatmya was obtained and a meeting of the Shastrees was convened; at which it was decided that no restiction should be placed on the performance of ceremonis prescribed in the book referred to. Orders were issued accordingly.

A. D. 1797-98.

२४०।६८ साष्टी, व मुंबईकर कसाब देशांतून गायी हरदु ठिकाणीं विकावयास न्यावयाची मनाई सरकारांतून असतां रातबीरात चोरून नेतात त्याची चौकशी हाल्लीं सरकांतून अनंत नाईक अणजुरकर यास सांगोन हें पत्र तुह्मांस सादर केलें असें, तरी महालानिहाय प्रांत कोंकण येथील नाकेंबंदीची चौकशी नाईक मजकूर करील त्यास करूं देणें, व गायी जातील त्या याचे इतल्या शिवाय जाऊं न देणें ह्मणोन चिटणीसी पत्रें.

इ० स० १७९८।९९
तिसा समसेन मया व अलफ
मोहरम १९

१ वामनाजी हरि मामलेदार तालुके वसई यांस प्रांत मजकुर येथील नाकेंबंदीचें चौकशी विषयीं.

१ सदाशिव केशव मामलेदार प्रांत कल्याण भिवंडी येथील नाकेबंदी विषयीं.

१ मोरो अनंत कमावीसदार तर्फ आठगांव येथील नाकेबंदी.

१ कमावीसदार महालानिहाय प्रांत मजुकुर यांस.

४

२४१।९२ ब्राह्मण ज्ञातीमध्यें कन्या विक्रय करितात. व नवावर्षापुढें अविवाहित कन्या ठेवितात ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी तुम्हीं गावगन्ना समस्त ब्राह्मणांचे घरीं कन्या विक्रय करूं नये व नवावर्षापुढें अविवाहित कन्या ठेऊं नये अशी निक्षून ताकीद करणें. येविशीं अंतरपडल्यास कार्यास येणार नाहीं. असें असोन जो करील त्याची चौकशी पत्राची पैवस्तगिरी पासून बारकाईनें करून कन्या विक्रयाचा पैका घेईल त्यास बहिष्कृत करणें. त्याची शुद्धता करणें ते मनास आणून हुजूर केली जाईल. ह्मणोन तालुकेहाय व महालानिहाय येथील मामलेदार यांस वगैरे; व समस्त ब्राह्मणांस कीं मामलेदारांस आलाहिदा पत्र सादर केलें असें तरी सदरहु लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन चि. पत्रें.

इ० स० १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
जिलखाद. ११

	पत्रें	मामलेदारास	समस्त ब्राह्मणांस.
तालुके अंजनवेल निसबत रघुनाथ त्रिंबक.	२	१	१
तालुके रत्नागिरी निसबत लक्ष्मणराव.	२	१	१

240. Government was informed that butchers from Salsetti and Bombay used clandestinely to take cows for sale at these places in contravantion of the orders of Government. An officer was therefore appointed in Konkan to inquire into the matter and orders were issued that no cows should be sent out without his permition.

A. D. 1798 99.

241. Government was informed that in the Brahmin caste the practice existed of selling girls (that is giving in marriage for money) and of keeping them unmarried after the age of 9 years. Orders were therefore issued to the officers of Talukas Anjanwel, Ratnagiri, Raygad, Mulheir, Trimbak, Wai, Belapur, &c, to stop the practice and to excommuuicate any person indulging in it.

A. D. 1798-99.

ताल्लुके विसापूर निसबत सदाशिव भास्कर.	२	१	१
ताल्लुके रायगड निसबत बालोजी कुंजीर.	२	१	१
ताल्लुके मुल्हेर निसबत यादो शामराज.	२	१	१
ताल्लुके त्रिंबक निसबत पांडुरंग धोंडजी.	२	१	१
प्रांत वाई निसबत भवानी शंकर हैबतराव.	२	१	१
प्रांत बेलापूर निसबत आपाजी विष्णु.	२	१	१
किल्ले कोरीगड निसबत आनंदराव भिकाजी.	२	१	१
प्रांत चौल येविसीं	२	१	१
१ बाबुराव आंगरे वजारतमाहा सवाई सरखेल यांस			
१ समस्त ब्राह्मणांस			
२	२०	१०	१०

वीस पत्रें दिल्हीं असेत.

२४२।१०५ सदाशिव बीन बाळलींग जंगम मठपति कसबे पुणें प्रांत मजकूर व गंगाराम बिन देवलींग जंगम मठपति पेठ शुक्रवार शहर पुणें यांस निवाडपत्र दिल्हें ऐसीजें तुमचा व सनमुख जंगम चरंती वांईकर व रामलींग जंगम चरंती पुणेंकर यांचा लिंगाईत जातीचे आचरणाचे वहिवाटीविसीं कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली. त्याजवरून हरदुवाद्यापासून तकरीरा लिहून घेतल्या.

इ. स. १७९९।१८००
मयातैन व अलफ
सवाल १४.

बितपसील.

तुह्मीं तकरीर लीहून दिल्ही ऐसीजे, आह्मीं वंशपरंपरेनें पंचम लिंगाईत जातीशिवाय इतर लिंगाईत जातीचे घरीं जेवित नाहीं. इतर लिंगाईत जाती पंचमाचें घरीं जेवितात. पंचम इतर जातीचे घरीं जेवित नाहीं. असें असतां सनमुख आया व रामलींग आया चरंती आह्मांस ह्मणों लागले कीं, आह्मीं सर्व

सनमुख व रामलींग जंगम चरंती यांणी तकरीर लिहून दिल्ही ऐसीजे. सर्व लिंगाईत जातींचें घरीं आम्हीं जेवितों व परस्पर लिंगाईत जाती येकमेकांचे घरीं येके पंक्तीस जेवितात. आम्हीं जंगम आपले पायाचें पाणी सर्वांचें लिंगावर घाळून मग पोटांत ध्यावयास देतों. वृद्धी क्षयाचा व रजस्वलेचा वि-

242. A dispute arose between the Pancham Lingayat and Charantijangam of Poona in regard to dining with each other and performing certain religious ceremonials. The religious books called Tantras, were referred to and it was decided.

A. D. 1799-1800.

1 That the Jangam should dine with the Lingayat of his caste and not with others.

1 That they should not throw their feet washing on the Lingas.

1 Persons in whose family a birth or death occurred and women in their monthly illness should be treated as impure and should not be touched,

लिंगाईतांचे घरीं जेवितों. तुह्मीं जेवित जाणें व चरंती जंगम आपले पायाचे पाणी वाटींत घेऊन अर्धे आपण पितात व अर्धे राहतें तें सर्वांचे लिंगावर घाळून पोटांत घ्यावयास देतात. व वृद्धी क्षयाचा व रजस्वलेचा विटाळ कोणी धरितात, कोणी धरीत नाहींत, याप्रमाणें तुह्मीं वर्तत जाणें असें बोलून तस्दी केली. त्यास आम्हीं बोललो कीं, सदरहू वहिवाटीची पुरवणी शास्त्रता करून देणें. त्याप्रमाणें वर्तत जाऊं. असें म्हणत असतां ऐकत नाहीं. याप्रमाणें खरें करून देऊं. न देऊं तर सरकारचे गुन्हेगार आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं ह्मणोन.

टाळ कोणी धरतात कोणी धरीत नाहींत. याप्रमाणें शास्त्रांत व रुढीवरून पुरऊन देऊं. न देऊं तर सरकारचे गुन्हेगार. सरकारांतून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं ह्मणोन.

येणेंप्रमाणें तकरीरा व जामीन व पुरशिसांचीं उत्तरें लिहून घेऊन चरंती जंगम यांणीं तंत्रादि पुस्तकें चार आणून दाखविलीं. त्याजवरून पंचाईत मतें मनास आणितां पंचम वाणी जात यांचे घरीं लिंगाईत जात दूर बसोन जेवितात. पंचम जात इतर लिंगाईतांचें घरीं जेवित नाहीं व इतर जात येकमेकांचे घरीं परस्परें जेवित नाहीं. याप्रमाणें इतर जाती पंचमा खेरीज आहेत त्यांनीं लिहून दिल्हें. व पंचम लिंगाईतांच्या सोयरीका जंगमांशीं आहेत. त्याजवरून लिंगाईत जातीमध्यें पंचम वाणी उत्तम असें ठरलें. पंचकलशी दीक्षा असेल तेथें सर्वांनीं जेवावें, असें चरंत्याचें बोलणें, त्याजवरून दीक्षा निर्णय शास्त्रांत पाहतां पंचम वाणी व जंगमास मात्र पंचकलशी दीक्षा असावी. इतर जातींत लिंगाईत आहेत त्यांस येककलशी दीक्षा जंगमांनीं द्यावी. ते न करितां लोभावर दृष्टी देऊन सर्वांस पंचकलशी दीक्षा देतात. ती अयोग्य. देऊं नये. याप्रमाणें सिद्ध जाहलें. सनमुखजंगम व रामलिंग जंगम यांनीं तकरीरेंत लिहून दिल्हे त्याची पुरवणी जाहली नाहीं. तेव्हां ते खोटें जाहलें. तुम्हीं लिहून दिल्याप्रमाणें पुरवणी करून देऊन खरें जाहला. सबब तुह्मीं जंगम व लिंगाईतांनीं चालवयांची कलमें.—

जंगम आपले पायाचें पाणी वाटींत घेऊन अर्धे पिऊन अर्धे राहील तें सर्वांचे लिंगावरी घाळून पोटांत घ्यावयास देतात. त्याचा निर्णय तंत्र्यादि पुस्तकांत व रूढींत पाहतां पायाचें पाणी लिंगावर घाळूं नये. जंगमाचें पायाचें उदक लिंगाईतांनीं घ्यावें. कलम १.

वृद्धी क्षयाचा व रजस्वलेचा विटाळ धरीत नाहीं हा अनाचार होतो. त्यास सदरहू विटाळ सर्वांनीं धरावा. कलम १.

वतनदार जंगम ज्या गांवीं असतील त्यांनीं आपले जातीचे लिंगाईत असतील त्यांचे घरीं जेवावें. जे, जेवावयास योग्य नव्हत

सर्व लिंगाईत जातीयांचें घरीं चरंती वगैरे जंगम जेवितात हे ठीक नाहीं. ज्या जातीचा जंगम चरंती व विरक्त व मठपति असेल त्यानें त्या जातींत जेवावें. आपली जात सोडून इतर जातीचें घरीं जेऊं नये. कलम १.

अशा जाती असतील त्यांनीं जेवावयास न घालीता मठपति वतनदार यास द्यावयाचा कायदा असेल त्याप्रमाणें द्यावें. कलम १.

जेवावयास जंगम बहुत सांगणें जाहले, तर जातीचे असतील त्यांस जेवावयास घालावें. इतर पंक्तीखेरीज त्यास शिधा द्यावा शिजलेलें अन्न देऊं नये. कलम १.

येकूण पांच कलमांप्रमाणें दीक्षा निर्णया बमोजीब तंत्रादि पुस्तकाअन्वयें चालावयाचे ठराऊन भोगवटीयास हें निवाडपत्र सादर केलें असें. तरी सदरहुप्रमाणें तुम्हीं आपले लेंकरांचे लेंकरीं वंशपरंपरेनें वर्तणूक करून सुखरूप राहणें. तुम्हीं वादास खरे जाहला सबब तुह्मांकडे हरकी रुपये ४००१ चारहजार येक रुपया ध्यावयाचे करार केले ते सरकारांत जमा असेत.

येविसी चिटणिसीं पत्रें.

३० माहालानिहाय वगैरे येथील जंगम व लिंगाईत जात यांस ताकीद करून सदरहुप्रमाणें वर्तणूक होय तें करणें ह्मणोन पत्रें.

१ प्रांत पुणें निसबत रामचंद्र नारायण यांस.
१ परगणें बिड व पाथ्री निसबत सखाराम गणेश यांस.
१ तालुके विजयदुर्ग निसबत रामकृष्ण गंगाधर यांस तालुके राजापूर येविसीं.
१ बाळाजी रघुनाथ यांस पेठ पार किल्ले प्रतापगड येविसीं.
१ क्षेत्र पंढरपूर निसबत दिवाकर गोविंद यांस.
१ प्रांत जुन्नर निसबत अनंदराव राम यांस.
१ परगणें बारशी निसबत बळवंतराव मुळे यांस.
१ तालुके रायगड निसबत बाळोजी कुंजीर यांस तालुके माहाड.
१ आबाजी महादेव यांस किल्ले वैराटगड येथील बेगमीस गांव आहेत तेथील जंगमाविसीं.
१ परगणें नाशीक निसबत कृष्णराव गंगाधर.
१ प्रांत कऱ्हाड निसबत श्रीनिवास शामराव यांस.
१ तालुके शिवनेर निसबत रामचंद्र नारायण यांस.
१ तालुके सोलापूर निसबत रामचंद्र शिवाजी यांस.
१ प्रांत वाई निसबत भवानी शंकर हैबतराव यांस.
४ तुह्मांकडील सरंजाम महालीं जंगम आहेत त्याविसीं.
  १ काशीराव होळकर.
  १ जोत्याजी व मलोजी जाधवराव.
  १ नरसी खंडेराव.

१ दौलतराव शिंदे अलीजाबाहादर.

४

१ राव रंभाजी जयवंत निंबालकर यांस त्यांजकडील तालुक्याविशीं.

१ जानराव नाईक निंबालकर यांस परगणें फलटण येविसीं.

२ बाळाजी जनार्दन फडणीस यांस परगणें चोपडे व प्रांत खानदेश येविशीं.

१ माधवराव अनंत यांस तालुके सातारा प्रांत वाई येविसीं.

१ सदाशिव चिंतामण यांस परगणें सांगोलें येविसी.

१ माधवराव कृष्ण यांस तालुके मानूर मामले बीड येविसीं.

१ राजाराम खंडेराव यांस कसबे कडेगांव प्रांत कऱ्हाड येविसीं.

१ पांडुरंग बाबुराव यास कसबे बारामती येविसीं.

१ प्रांत मिरज येविसीं.

१ चिंतावणराव पांडुरंग यांस.

१ गंगाधरराव गोविंद यांस.

२

१ परशराम पंडित प्रतिनिधी यांस त्यांजकडील महालाविसी.

१ येशवंतराव दाभाडे सेनापति यांस मोजे तळेगांव तर्फ चाकण प्रांत जुन्नर येविसी.

३०

६६ जंगम चरंती व मठपति व लिंगाईत जात महालानिहाय यांस कीं, तुम्हीं सदरहुप्रमाणें वर्तणूक करणें. दिक्कत केल्यास मुलाहिजा होणार नाहीं ह्मणोन पत्रें.

१ परगणें शेवगांव.

१ कसबे कासेगांव प्रांत मिरज.

१ कसबे खेड प्रांत जुन्नर.

१ पटवारी लोक प्रांत मदगड.

१ कसबे सासवड प्रांत पुणें.

१ परगणें आंबे जोगाईचे.

१ कसबे आऊंध यमाईचे.

१ तालुके पाटणखोरें प्रांत वाई.

१ प्रांत कऱ्हाड.

१ कसबे रहिमतपूर प्रांत वाई.

१ मौजे शिवापूर तर्फ खेडबारें.
१ परगणें चोपडें प्रांत खानदेश.
१ परगणें वेरूळ.
१ प्रांत मिरज.
१ तर्फ कडेवळीत प्रांत कडेवळीत.
१ परगणें मोहोळ.
१ तर्फ महाड तालुके रायगड.
१ परगणें चांदवड.
१ परगणें येवलें.
१ परगणें पाथरी.
१ परगणें साखरखेडलें.
१ प्रांत खटाव.
१ मामले बीड.
१ तालुके पडेगांव प्रांत कडेवळीत.
१ परगणें नाशीक.
१ कसबे तासगांव प्रांत मिरज.
१ संमतनींब प्रांत वाई.
१ परगणें ह्मसवड.
१ मौजे वैराग परगणें पानगांव.
१ तर्फ सातारा प्रांत वाई.
१ तर्फ चांभारगोंदे प्रांत कडेवळीत.
१ मौजे बावधन प्रांत वाई.
१ परगणें सांगोलें.
१ कसबे बारामती.
१ परगणें मंगळवेढे.
१ संमत कोरेगांव प्रांत वाई.
१ परगणे पाटोदे.
१ कसबे मायणी निंबसोडे.
१ मौजे वाफगांव तालुके खेड प्रांत जुन्नर.
१ शहर जुन्नर.
१ कसबे खर्डे परगणें मजकूर.
१ कसबे अवसरी तर्फ मजकूर प्रांत जुन्नर.
१ कसबे बुधपाचेगांव प्रांत खटाव.
१ मजरेवाडी जाधवाची मौजे दिवे प्रांत पुणें.
१ परगणें बारशी.
१ तर्फ मानूर मामले बीड

१ कसबे केडगांव प्रांत कऱ्हाड.
१ तालुके नगर प्रांत कडेवळीत.
१ प्रांत फलटण.
१ तर्फ तारळे.
१ मौजे जांबगांव परगणें पारनेर.
१ मौजे जेजूरी तर्फ कडेपठार.
१ प्रांत पुणें.
१ मौजे तळेगांव प्रांत जुन्नर.
१ प्रांत वाई.
१ समत वादेवली (?) प्रांत वाई.
१ कसबे पुणें प्रांत मजकूर.
१ कसबे शिखर शिंगणापूर प्रांत खानदेश.
१ परगणें राशीन.
१ परगणें करमाळे.
१ प्रांत जुन्नर.
१ तर्फ कुडाळ.
१ महालानिहाय.
१ तर्फ अवसरी प्रांत जुन्नर.
१ क्षेत्र पंढरपूर परगणें कासेंगांव.
१ तर्फ राजापूर तालुके विजयदुर्ग.
१ तालुके सोलापूर.

६६

९१

२४३।१४० श्रीविमल निर्मल तीर्थ येथें श्रीमहादेव विमलेश्वर देव व शंकराचार्य यांचे

इ० स० १८०१।२
इसने मयातैन व अलफ
सवाल २५

पादुकांचें देवालय आहे. त्या देवालयांत गुजराथी ब्राह्मण फिरस्ता माघ शुद्ध त्रयोदशीस मध्यरात्रीस दरवाजाचें कुलूप फोडून आंत शिरोन श्रीमहादेवावर गुजराथी ब्राह्मण यानें मान कापिली. त्यास गुजराथी कोण कोठील याचा ठिकाण लागला नाहीं. ऐशास देवाची अर्चा झाली पाहिजे ह्मणून तुह्मीं हुजूर विनंती केली. त्याजवरून श्रीमहादेवाची अर्चा करावयाकरितां रुपये २५० दोनशें पन्नास सालमजकुरीं येकसाला तालुके वसईपैकीं देविले असेत. तरी

243. A Gujarathi Brahmin broke open the temple of Mahadev Vimaleshwar at the holy place of Shri Vimal Nirmal, and severed his neck on the idal. Rs. 250 were sanctioned for the purification (worship ?) of the temple, out of the revenues of Bassein. The temple contains an image of Shri Shankaracharya's feet.

A. D. 1801-02.

देवाची अर्चा व ब्राह्मणभोजन तेथील शिष्ट ब्राह्मणांचे संमतें यथास्थित सदरहु ऐवजांत करणें. म्हणोन खंडेराव निळकंठ मामलेदार महालानिहाय तालुके मजकूर यांचे नांवें सनद. १.

रसानगीयादी.

२४४।२३६ ब्राह्मण जातींत कोणीं कन्येचा नक्त ऐवज वगैरे देखील कर्जवाम कांहींएक वरपक्षापासून न घेतां कन्या देऊन विवाह करावे. याप्रमाणें तुम्हीं तालुके मजकूर येथील धर्माधिकारी व जोशी व उपाध्ये व समस्त ब्राह्मण व देशमुख व देशपांडे व खोत व कुळकर्णी व महाजन यांस ताकीद करावी. ताकीद केली असतां कन्येचा नक्त ऐवज वगैरे व कर्जवाम घेऊन विवाह करितील त्यांस विवाह होतांच वरचेवर वरपक्षानें व मध्यस्थानें सरकारांत तुह्मांस समजवावें. नंतर येविशीची चौकशी तुम्हीं करून कन्यापक्षानें वरपक्षापासून घेतलें असेल तें वरपक्षास माघारे देऊन कन्यापक्षापासून तितकी गुन्हेगारी सरकारांत घ्यावी. व मध्यस्थानें घेतलें असेल तें मध्यस्थास माफ करावें. वरपक्ष व मध्यस्थ या उभयतांनीं सरकारांत न समजावितां परभारें सरकारांत समजल्यास कन्यापक्षानें वरपक्षापासून घेतलें असेल तें व तितकी गुन्हेगारी व वरपक्षापासून दुप्पट गुन्हेगारी व मध्यस्थापासून मध्यस्थीबद्दल घेतलें असेल तें व तितकी गुन्हेगारी याप्रमाणें सरकारांत तालुके मजकुराकडे घ्यावयाचा ठराव करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी वर लिहिल्याप्रमाणें ताकीद करून बंदोबस्त राखून सदरहु संबधें वाजवी चौकशीनें जो ऐवज वगैरे जमा होईल त्यास कांहींएक खर्चाची बाब न लावितां तालुके मजकुरी अमानत ठेवून हुजूर समजावणें म्हणोन मामलेदार यांस सनद.

इ० स० १८११।१२
इसने अशर मयातैन व अलफ मोहरम २५

---

244. The officers of the Talukas of Bassein, Vijaydurg, Anjanwel, and Revdanda were directed to issue orders preventing the relatives of the bride from taking any sum either as a present or as a loan from the relatives of the bride-groom. The relatives of the bride-groom or other persons settling a marriage were directed to give immidiately after the marriage, information to Government of any amount paid by them to the relatives of the brides incontravention of the above order. The following penalties were prescribed.

A. D. 1811-12.

1 The relatives of the bride receiving any such sum to return it to the relatives of the bride-groom and to pay an equal amount as fine to Government.

1 If the relatives of the bride-groom or any person settling the marriage failed to give information to Government of the amount paid to the relatives of the bride, the relatives of the bride-groom should forfeit to Government double the amount paid by them to the relatives of the bride, and the person settling the marriage double the amount received by him.

Similar orders were issued to the Talukas of Wai, Junnar, Athgaum, Sakse, and to the Talukas of Ratnagiri, Dewgad, Suvernadurga, Raygad, Rajapuri, Kalyan, Neral, &c. &c. in Konkan.

१ ताल्लुके वसई निसबत परशराम खंडेराव.

१ ताल्लुके विजयदुर्ग निसबत रामचंद्र भिकाजी.

१ ताल्लुके अंजनवेल निसबत येसाजी पवार.

१ ताल्लुके रेवदंडा निसबत आबाजीकृष्ण.

४

२० येविसी सदरहु ताल्लुक्याचे वतनदार व दरकदार वगैरे यांस चिटणीसी पत्रें,

४ धर्माधिकारी व जोशी उपाध्यें व समस्त ब्राह्मण महालानिहाय यांस कीं. तुह्मांस व देशमुख व देशपांडे व खोत व कुळकर्णी व महाजन ताल्लुके मजकूर यांस ताकीद करावयाविसीं मामलेदार यांस आज्ञा केली आहे. ते ताकीद करतील. ताकीद केली असतां वरपक्षापासून नक्त ऐवज व कर्जवाम कांहीं येक न घेता कन्या देऊन विवाह करीत जाणें. कोणी वरपक्षापासून नक्त ऐवज व कर्जवाम वगैरे कांहीं घेऊन कन्येचा विवाह कन्यापक्षानें व वरपक्षानें व मध्यस्थानें व समस्त ब्राह्मण ज्ञातीनें केल्यास मामलेदार सरकारआज्ञेप्रमाणें करतील. ह्मणोन पत्रें.

१६ देशमुख व देशपांडे वगैरे यांस कीं, जें कोणी विवाह संबंधें नक्त ऐवज व कर्जवाम वगैरे कांहीं घेऊन विवाह करतील त्यांची बातमी बारकाईनें चौकशीनें राखून मामलेदार यांस सांगोन हुजूर विनंति पत्र पाठवित जाणें ह्मणोन, पत्रें.

४ देशमुख व देशपांडें यांस.

४ खोत व कूळकर्णी व महाजन देहाय यांस.

४ दरकदार कारकून महाल व किल्लेहाय यांस.

× × × ×

१६

२०

२४

सदरहूप्रमाणें आणखीं पत्रें.

१ प्रांत वाई निसबत परशराम खंडेराव.

१ ताल्लुके आठगांव निसबत पांडुरंग रामचंद्र.

१ परगणें सांकसे निसबत चिंतो वामन यांस.
